Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक १६८ * * नागपूर *

मंगळवार, दिनांक २४ सप्टेंबर २०२४

पुरवणीसह पाने ८

किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

## चाइल्ड पॉर्नोग्राफी पाहणे, डाऊनलोड करणे गुन्हा

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २३:
चाइल्ड पॉर्नोग्राफी पाहणे किंवा स्टोअर करणे हा पॉक्सो आणि आयटी कायद्यांतर्गत गुन्हा असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी सांगितले. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जेबी पारडीवाला यांच्या खंडपीठाने मद्रास उच्च न्यायालयाचा तो निर्णय फेटाळला.

ज्यामध्ये उच्च न्यायालयाने म्हटले होते की जर कोणी चाइल्ड पॉर्नोग्राफी डाउनलोड करून एकट्याने पाहत असेल तर तो गुन्हा नाही, जोपर्यंत त्याचा प्रसार करण्याचा त्याचा हेतू नाही. न्यायमूर्ती जेबी पारडीवाला यांनीही आपल्या निर्णयात संसदेला सूचना दिल्या आहेत. चाइल्ड पोर्नोग्राफीऐवजी 'चाइल्ड सेक्शुअल एक्सप्लॉइटेटिव एंड एब्यूसिव मटेरियल' हा शब्द वापरला जावा, असे ते म्हणाले.

अग्रलेख

## खरीखरी...

# हरियाणाची दंगल

आपल्या देशातील निवडणुका एकाच वेळी घ्यायच्या, असे विधेयक लवकरच लोकसभेत येणार आहे. त्याच वेळी या देशातील चार-पाच राज्यांच्या निवडणुका आगेमागे आहेत. त्याही एका वेळी घेण्याची हिंमत निवडणूक आयोग दाखवत नाही. मग भविष्यात एकाच वेळी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचे काय होणार, हा मोठा प्रश्न आहे. असो! आता आपण सध्या ज्या दोन राज्यात निवडणुका होत आहेत त्याचा विचार करू. त्यापैकी आज हरियाणातील निवडणुकांचे वारे कोणत्या दिशेने वाहत आहेत. याचा अभ्यास केल्यावर जे दृश्य दिसते. ते केंद्र आणि हरियाणात सत्ताधारी असलेल्या भाजपसाठी आशादायक नाही. या राज्यातील निवडणूक तज्ञ भारतीय जनता पक्षाला 90 पैकी 15 च्या वर जागा घ्यायला तयार नाहीत. खुद्द पंतप्रधान मोदींच्या सभेला पाच हजार लोकही नव्हते असेही सांगतात. तर साडेनऊ वर्षे मुख्यमंत्री राहिलेल्या खट्टरांना साधी सभा घेणेही शक्य झालेले दिसत नाही. निव्वळ पाच पंचवीस लोकांसोबत त्यांची भटकंती सुरू असते अशा बातम्या येत आहेत. आपण निवडून येणार नाही. हे कळल्यावर भारतीय जनता पक्षाने तिथे काँग्रेस विरुद्ध काँग्रेसची मते खाऊ शकतील, असे उमेदवार विभिन्न पक्षांकडून उभे केले आहेत. चौधरी देवीलाल यांच्या चौटाला परिवारातील मागच्या सरकारातील उपमुख्यमंत्री यांनी चंद्रशेखर राव यांच्याबरोबर दोस्ती केलेली आहे. तर अभय चौटाला यांनी मायावती बरोबर हातमिळवणी केलेली आहे. या दोघांनाही पाच- सहाच्या वर जागा मिळणे शक्य नाही अशी हवा आहे. अनेक ठिकाणी भारतीय जनता पक्षाने अपक्ष उमेदवारही उभे केले आहेत. आजच्या घडीला काँग्रेसकडे 90% जाट समाज जो हरियाणा मध्ये 26 टक्के आहे. त्यांचाच बोलबाला आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीत ओबीसी आणि दलित मतदारांनी काँग्रेसला भरभरून मते दिली होती. त्यांचे प्रमाणही 22 टक्के आहे. या दोघांच्या सामंजस्यामुळेच लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने 10 पैकी पाच जागा जिंकल्या होत्या. आताचा खेळ असा आहे की, सत्ताधारी काँग्रेस विरुद्ध भाजप अशी लढत असली तरी अनेक ठिकाणी भारतीय जनता पक्षाला गावबंदी आहे. तिकडे काँग्रेसमध्ये माजी मुख्यमंत्री हुड्डा यांची दादागिरी सुरू आहे. 90 पैकी 62 जागी हुड्डांनी आपले उमेदवार दिलेले आहेत. खासदार कुमारी सैलजा या सुद्धा या राज्यातील काँग्रेसच्या मोठ्या नेत्या आहेत. त्यांच्या गटाला केवळ आठ जागा देण्यात आलेल्या आहेत आणि त्यांच्या दोन खास लोकांना तिकीटे देण्यात आलेली नाहीत. त्यामुळे सैलजा गेल्या आठ-दहा दिवसांपासून प्रचारासाठी उतरलेल्या नाहीत. सैलजा रुसल्या आहेत म्हणजे त्या काँग्रेस सोडतील. म्हणून खट्टर सारखे अनेक भाजपवाले त्यांना आपल्या पक्षात येण्याचे आमंत्रण देत आहेत. पण कुमारी सैलजा कुठेही काहीच बोलत नाहीत. हे त्यांचे शल्य आहे. हरियाणाच्या प्रचारासाठी आता दहा-बारा दिवस उरलेले आहेत. राहुल गांधी आणि प्रियंका गांधी प्रचारात उतरले. तर ते कुमारी सैलजांना सोबत घेतील यात शंका नाही. इकडे हुड्डा गटातील 77 वर्षांचे माजी मुख्यमंत्री हुड्डा आणि त्यांच्या पुत्रातही मुख्यमंत्री पदाबाबत मतैक्य नाही. कारण बापालाही मुख्यमंत्री व्हायचे आहे आणि पोरालाही मुख्यमंत्री व्हायचे आहे. हे सर्व काहीही असले तरी आणि काँग्रेसमध्ये कितीही मतभेद असले. तरी ही निवडणूक भाजप विरुद्ध जनता अशी आहे. हरियाणाच्या सीमेवर बसलेले शेतकरी, बृजभूषण पीडित महिला पहिलवान आणि सर्व समाजातील बेरोजगारी यामुळे हरियाणा मध्ये सर्वत्र भाजप विरुद्ध असंतोष उफाळून आलेला दिसत आहे. काहीही असले तरी काँग्रेसला 90 पैकी 55 ते 60 जागा मिळतील असा कयास आहे. एकूणच हरियाणा आणि जम्मू काश्मीर या दोन राज्यात भारतीय जनता पक्षाला बोटावर मोजता येण्याएवढ्या जागा मिळाल्या. तरी त्यांनी समाधान मानावे अशी स्थिती आहे. जनतेत वजन असणाऱ्या नेत्यांना प्रत्येक राज्यात खड्यासारखे बाजूला केल्यामुळे, राज्या राज्यातील सुंदोपसुंदी भारतीय जनता पक्षातील पक्षश्रेष्ठींना आवरता आलेली नाही. हीच परिस्थिती हरियाणात आहे. 'मतामतांचा गलबला, कुणी पुसेना कोणाला' अशी हरियाणामध्ये भाजपची परिस्थिती ऐन निवडणुकीच्या काळात झालेली आहे. त्यातच मोदीजींची अमेरिका वारी सुरू आहे. आपले शाह साहेब महाराष्ट्र आणि झारखंडच्या फेऱ्या मारत आहेत. हरियाणा आणि जम्मू काश्मीर या दोन राज्यात आपण सत्तेवर येत नाही. हे दिसून आल्यामुळे आता भाजप श्रेष्ठींनी महाराष्ट्रावर लक्ष केंद्रित केलेले दिसते. इथेही शिंदे आणि भाजप यांना कसेही करून अजित पवार गटाला स्वतंत्र लढण्यासाठी मोकळे सोडायचे आहे. पण हे छोटे पवार त्यासाठी तयार नाहीत. हरियाणाची हवा महाराष्ट्रात येऊ नये, यासाठी जीवापाड प्रयत्न सुरू आहेत. आता दोन राज्यांच्या निवडणूक निकालांचा परिणाम महाराष्ट्र आणि झारखंडवर होऊ नये, यासाठी मोर्चे बांधणी सुरू आहे. दिल्ली जवळचे हरियाणा आणि भारतातील सर्वाधिक श्रीमंत राज्य महाराष्ट्र यांची लढाई हरियाणाच्या निकालानंतर कोणत्या दिशेला जाईल. हे सांगणे अत्यंत अवघड आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# खाजगी बस पुलावरुन नाल्यात कोसळली

# दोन महिला डॉक्टरसह चौघांचा मृत्यू

## ३२ प्रवासी जखमी • अनेक गंभीर • सेमाडोहजवळ भीषण अपघात

■ महासागर प्रतिनिधी
धारणी/चिखलदरा, दि. २३:
खासगी बस पुलावरुन नाल्यात कोसळल्याने धारणीतील दोन महिला डॉक्टरसह चौघांचा मृत्यू झाला, तर ३२ प्रवासी गंभीर जखमी झाले. यामधील ७ प्रवाशांची प्रकृती चिंताजनक आहे.

ही घटना सोमवार २३ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० ते ९ वाजताच्या सुमारास चिखलदरा पोलीस स्टेशनअंतर्गत सेमाडोह लगतच्या कमान पूलावर घडली.

एमपी १२/ पी.१५५५ क्रमांकाची चावला कंपनीची ही बस नेहमी प्रमाणे सकाळी ६ वाजता अमरावती येथून मध्यप्रदेशातून खंडवा येथे जाण्याकरिता निघाली. नेहमी जाणेयेणे करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांकरिता धारणीला जाण्याकरिता ही नेहमीचीच बस आहे.

शनिवारी आपल्या घरी आलेले शासकीय अधिकारी, कर्मचारी या बसने कार्यालयीन वेळेत पोहोचण्याच्या प्रयत्नात सोमवार असल्याने नेहमीप्रमाणे या बसने धारणीकरिता निघाले होते. शासकीय कर्मचाऱ्यांसह इतर प्रवासी मिळून यावेळी ४८ जण या बसमध्ये होते.

घटांग येथे बसचा टायर पंक्चर झाल्याने वेळेत पोहोचण्याच्या नादात चालक बस भरधाव चालवित होता. मात्र ब्रिटीशकालीन कठळे असलेल्या पुलावर वेगवान बस अनियंत्रित होवून थेट नाल्यात कोसळली. ज्यामध्ये चालकाच्या बाजूने बसलेल्या प्रवाशांपैकी चार प्रवासी जागीच ठार झाले.


डॉ. पल्लवी कदम


डॉ. प्रणाली इंगळे


फुलवती काजले


राजेंद्र पाल

मृतकांमध्ये कळमखार आरोग्य केंद्रात एकात्मीत आरोग्य अधिकारी (सीएचओ) असलेल्या डॉ. पल्लवी रमेश कदम - इंगळे, (वय २८), रा. आष्टी शहिद, वर्धा, ह.मु. श्री सिद्धेश्वर प्राईड अपार्टमेंट, जुना बायपास, अमरावती, धारणी येथील आहार तज्ञ (एचएसडी) डॉ. प्रणाली रघुनाथ इंगळे (वय ३७), राधाकृष्ण मंदिराजवळ गाडगे नगर, अमरावती, धारणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयातील सेवानिवृत्त लिपीक राजेंद्र मोतीप्रसाद पाल (वय ५९), भोकरबर्डी, ह. मु. तलई कॅम्प, धारणी आणि फुलवती राजु काजले (वय ४०), रा. रोहिणीखेडा, ता.दामजीपूरा, जि. बैतुल म. प्र., यांचा समावेश आहे. हे प्रवासी अमरावती येथून बसले होते.



अपघात घडताच सेमाडोह येथील रहिवासी, मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. अपघातग्रस्त बसमधील प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. या अपघाताची माहिती परतवाडा, चिखलदरा आणि धारणी पोलिसांना देण्यात आली.

# बदलापूर प्रकरणातील आरोपीचे एन्काउंटर

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३:
बदलापूर अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे याचा एन्काउंटर करण्यात आला आहे. आज बदलापूर पोलिसांचे पथक त्याचा ताबा घेऊन पोलिस ठाण्याकडे जात असतांना त्याने पोलिसांकडून बंदूक घेऊन पोलिसांवर गोळीबार केला. त्यानंतर प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी केलेल्या गोळीबारात आरोपी अक्षय शिंदेचा मृत्यू झाला.

आरोपी अक्षय शिंदेसोबतच पोलिस अधिकारी अढकनिलेश मोरे यांनाही गोळी लागली आहे. या पोलिसाची प्रकृती गंभीर आहे. त्यांनाही रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

आधीच्या माहितीनुसार, तळोजा कारागृहातून बदलापूर पोलिस ठाण्याकडे नेत असतांना अक्षयने स्वतःवर आणि पोलिसांवर गोळीबार करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात आहे. या घटनेत अक्षय



शिंदे यालाही गोळी लागली आहे. आरोपीने तीन राऊंड फायर केल्याची माहिती होती.

आरोपी अक्षय शिंदेचा एन्काउंटर झाल्यानंतर बदलापूरकरांकडून फटाके फोडून आनंद साजरा केला आहे.

### एन्काउंटर खरा की खोटा?

बदलापूर अत्याचार प्रकरणातील नराधम आरोपी अक्षय शिंदे यांचा एन्काऊंटर मध्ये मृत्यू झाला, मात्र या प्रकरणाच्या निमित्ताने राज्याच्या कायदा सुव्यवस्थेवर काही प्रश्न निर्माण झाले आहेत. अक्षय शिंदेचा एन्काऊंटर खरा की खोटा? पोलिस कोणाला वाचवण्याचा प्रयत्न तर करत नाही ना? बदलापूर घटनेतील सूत्रधार मोकाट सुटणार तर नाही ना? शाळेच्या विश्वस्तांना क्लीनचीट तर मिळणार नाही ना? या प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्राला हवी आहेत. त्यामुळेच आजच्या एन्काउंटर प्रकरणाची निष्पक्ष न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे.

दुसरीकडे, गृहखाते किंवा सरकारकडून या एन्काऊंटरविषयी कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आली नाही.

### फरार आरोपींना वाचविण्यासाठी एन्काउंटर नाना पटोलेंचा आरोप

गोळीबार प्रकरणावर काँग्रेसच्या नाना पटोले यांनी सोशल मीडिया वर लिहिले की, बदलापूरमधील चिमुरड्यांवरील अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा पोलिस एन्काऊंटरमध्ये मृत्यू झाल्याची बातमी येत आहे.शिंदे याने पोलिसांची बंदूक हिसकावून स्वतःवर आणि पोलिसांवर गोळीबार केला व पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ केलेल्या गोळीबारात त्याचा मृत्यू झाल्याची माहिती मिळते.
या घटनेमुळे काही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.
१. बदलापूर अत्याचार प्रकरणातील शाळेच्या विश्वस्तांना अद्याप अटक झालेली नाही, ते फरार आहेत त्यांना अद्याप अटक का होऊ शकत नाही ?
२. फरार आरोपींना वाचवण्यासाठी या प्रकरणातील मुख्य आरोपीचे एन्काऊंटर करून प्रकरण संपवण्याचा प्रयत्न आहे का ?
३. हे संपूर्ण प्रकरण दाबण्याचा वरिष्ठ पातळीवरच्या प्रयत्नांचा भाग म्हणून पोलिसांमार्फत आरोपीचे एन्काऊंटर केले आहे का?
या प्रकरणाचे सत्य समोर येण्यासाठी उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींमार्फत चौकशी करावी. हे एन्काऊंटर बनावटी असल्याचे विरोधकांनी म्हटले आहे.

# सरपंच आणि उपसरपंचांच्या मानधनात दुप्पट वाढ




■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३:
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळाची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत राज्यातील विविध विषयांसंदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच यावेळी काही महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

याचवेळी राज्यातील सरपंच आणि उपसरपंचांचे मानधन दुप्पट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या संदभार्तील माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान, सरपंच आणि उपसरपंचांच्या मानधनामध्ये वाढ करण्याच्या निर्णयामुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं की, ळआम्ही सर्वसामान्यांच्या हितासाठी अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत.

राज्यातील सरपंच उपसरपंच यांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्याच्या निर्णयासह लोहगाव विमानतळाचे नाव जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणे असे करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली.

राज्यातील सरपंच उपसरपंच यांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यानुसार आता ज्या ग्रामपंचायतीची

## शरद पवारांचा राणेंना टोला



■ वृत्तसंस्था, रत्नागिरी, दि. २३:
आपल्या वादग्रस्त विधानांमुळे कायम वादात राहणारे भाजप आमदार नीतेश राणे यांचा शरद पवार यांनी सोमवारी चांगलाच समाचार घेतला.

सिंधुदुर्ग जिल्ह्याने महाराष्ट्राला एक मुख्यमंत्री दिला. पण त्यांचे चिरंजीव हल्ली ज्या पद्धतीने बोलतात, ते पाहता इतिहासात कोणत्याही मुख्यमंत्र्यांची पुढची पिढी या प्रकारची झालेली पाहिली नाही, असे पवार म्हणाले.

## वैवाहिक बलात्कारात पतींना सूट

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २३:
पत्नीसोबत बळजबरीने शारीरिक संबंध ठेवल्याप्रकरणी पतीविरुद्ध गुन्हा दाखल करायचा की नाही, यावर मंगळवार 24 सप्टेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे.

भारताचे सरन्यायाधीश चंद्रचूड आणि न्यायमूर्ती जेबी पारदीवाला यांच्या खंडपीठासमोर यावर सुनावणी होणार आहे. कर्नाटक उच्च न्यायालय आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या दोन निर्णयांविरोधात हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. याशिवाय अनेक जनहित याचिका दाखल झाल्या. हे सर्व एकत्र करून त्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. भारतीय न्याय संहितेच्या कलम 63 (बलात्कार) च्या अपवाद 2 नुसार, वैवाहिक बलात्कार हा गुन्हा मानला जात नाही. मात्र, याप्रकरणी केंद्र सरकारलाही उत्तर दाखल करायचे आहे. कायदे बदलण्यासाठी चर्चेची गरज आहे, असे केंद्राचे म्हणणे आहे.

# गोगावले एसटीचे नवे अध्यक्ष



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २३:
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार भरत गोगावले यांनी आज महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अध्यक्षपदाचा पदभार सांभाळला.

राज्यात महायुती सरकार अस्तित्वात आले तेव्हापासूनच भरत गोगावले यांना मंत्रीपद मिळणार अशी चर्चा होती. पण काही कारणांमुळे ते त्यांना मिळाले नाही. त्यामुळे ते नाराज होते. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांची एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करून त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न केला.

या पदाला राज्यमंत्रीपदाचा दर्जाही देण्यात आला आहे. त्यामुळे गोगावलेंचे मंत्रीपदाचे स्वप्नही एका अर्थाने पूर्ण झाले आहे. दरम्यान गोगावले यांनी पदभार स्वीकारताच एसटी बसस्थानकामध्ये सुधारणा करण्याचे आदेश दिलेत.

## भारतात आढळला एमपॉक्स क्लेड १ चा पहिला रुग्ण

■ वृत्तसंस्था, कोची, दि. २३:
मंकीपॉक्स च्या क्लेड 1 स्ट्रेनचा पहिला रुग्ण भारतात सापडला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने जागतिक आरोग्य आणीबाणी घोषित केलेली हीच परिस्थिती आहे. हा रुग्ण गेल्या आठवड्यात यूएईमधून केरळला परतला होता. केरळच्या आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पीडितेचे वय 38 आहे. 17 सप्टेंबर रोजी त्यांनी मंकीपॉक्सची लक्षणे दिसल्यानंतर स्वतःला क्वारंटाइन केले.

याआधी 9 सप्टेंबर रोजी देशात मंकीपॉक्सचा पहिला रुग्ण आढळून आला होता. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सांगितले होते की, परदेशातून परतलेल्या एका व्यक्तीला मंकीपॉक्सच्या संशयावरून 8 सप्टेंबर रोजी अलग ठेवण्यात आले होते. नमुने घेतले आणि तपासले गेले, ज्यामध्ये मंकीपॉक्स स्ट्रेन क्लेड 2 (क्लेड 1 नाही) ची पुष्टी झाली. दरम्यान देशभरात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# अजित पवारांच्या एक्झिटसाठी सेना, भाजपाचे चक्रव्यूह?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २३:
उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीतून बाहेर पडावा यासाठी भाजप व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेकडून जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

जागावाटपाच्या अंतिम टप्प्यात अजित पवार वेगळे झाले तर भाजप व शिवसेनेला अधिकाधिक जागा लढवता येतील असा या दोन्ही पक्षांचा डाव आहे, असा दावा करण्यात येत आहे.

वृत्तानुसार, सत्ताधारी महायुतीमध्ये भाजप, शिवसेना विरुद्ध अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस असा अंतर्गत सामना रंगला आहे. या तिन्ही पक्षांतील मतभेद टोकाला पोहोचलेत. यामुळेच अजित पवार यांनी सेना आमदार संजय गायकवाड व भाजप खासदार अनिल बोंडे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात केलेल्या आक्षेपार्ह विधानावर तीव्र नाराजी व्यक्त केली. एवढेच नाही तर भाजप आमदार नीतेश राणे यांनी नुकतेच मुस्लिमांविषयी केलेल्या विधानावरही थेट दिल्लीतील भाजपच्या नेतृत्वाकडे तक्रार करण्याचा इशारा दिला.

पण महायुतीमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीची कोंडी करण्यासाठी भाजप व शिवसेनेने ही रणनीती हेतुपुरस्सर आखल्याचा दावा केला जात आहे. भाजप व शिवसेनेचा काँग्रेस विरोधी विशेषतः कट्टर हिंदुत्वाचा अजेंडा मान्य अजित पवारांना मान्य नसेल तर त्यांना बाहेर पडण्याचा मार्ग मोकळा आहे, असा संदेश या निमित्ताने दिला जात आहे, असे सांगितले जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, महायुतीत राहिल्यास अजित पवारांना कमीत कमी जागा घेऊन निवडणूक लढवावी लागेल. ही तडजोड मान्य नसेल तर त्यांच्यापुढे वेगळे होऊ लढण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नसेल. त्यामुळेच जागावाटपातील अपेक्षाभंगाचे कारण देत अजित पवारांची राष्ट्रवादी महायुतीतून बाहेर पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीतून बाहेर पडणे हे भाजप व शिवसेनेच्या पथ्यावर पडणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीतून बाहेर पडला तर अजित पवारांना अपेक्षित असणाऱ्या 60 जागांवर शिवसेना व भाजपला आपले उमेदवार देता येतील.

# शाही परंपरा लाभलेला 572 वा जव्हारचा प्रसिद्ध उरूस मोठ्या थाटात सुरु



जव्हार, दि. २३ : प्रतिनिधी

फकीरी गादी म्हणून ओळखअसलेल्या जव्हार संस्थानला सहाशे वर्षाची परंपरा लाभली. येथील प्राचीन इतिहास हा अतिशय प्रेरणादायी आहे, या संस्थानात आदिवासी राजांनी राज्य केले.नागरिकांच्या दृष्टीने पायाभूत सुविधांची चोख व्यवस्था,ही राज घराण्यापासून करण्यात आली आहे.या संस्थानातील अतिशय प्राचीन व हिंदू मुस्लिमांच्या सामाजिक सलोख्याचा उरूस हा उत्सव अतिशय आनंदाने व श्रध्देने साजरा केला जात असतो.यंदा जव्हार शहरात पाचशे बाहत्तर वर्षांची परंपरा असलेल्या शाही उरुसाला 23 ते 25 सप्टेंबर दरम्यान उरूस जल्लोषात साजरा होणार आहे, त्यासाठी स्थानिक उरूस समिती,नगर परिषद व पोलीस प्रशासनाने जय्यत तयारी केली असल्याचे उरूस समितीचे,अल्ताफ गुलामहुसेन शेख आणि सय्यद राजिक जमीर पिरजादा यांनी सांगितले.

जव्हार शहराला संस्थानाची पार्श्वभूमी लाभली आहे,पालघर जिल्ह्याचे महाबळेश्वर तर राज्यातील मिनी महाबळेश्वर म्हणूनही या शहराचा उल्लेख आहे, परंतु प्रति महाबळेश्वराच्या उल्लेखापेक्षा संस्थानाची गौरवशाली पार्श्वभूमी लाभलेली टुमदार नगरी हा उल्लेख तमाम जव्हारकर नागरिकांच्या दृष्टीने अभिमानाचा विषय आहे. या शहराला राजाश्रय लाभल्याने अनेक चांगल्या परंपरा,रुढी येथे अनेक काळापासून आजही चालू आहेत.यात विशेष उल्लेख करायचा झाल्यास जव्हारचा सुप्रसिद्ध उरुस हा होय . मुस्लिम आणि हिंदू तसेच इतर सर्व धर्मीय बांधव एकोप्याने हा उरुस पिढ्यानपिढ्यापासून साजरा करीत आले आहेत.राष्ट्रीय एकात्मतेचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणूनही त्याची नोंद आहे.

हजरत औलिया शाह सदरोद्दीन बदरोद्दीन चिस्ती व सदानंद महाराज यांचा हा उरुस भाद्रपद महिन्यात सप्तमी, अष्टमी व नवमी या तीन दिवसांमध्ये आयोजित केला जातो,आजही या तीन दिवशी येथे उरुस.महोत्सव साजरा करण्यात येतो.लायावेळी नासिक,पालघर,मुबंई,डहाणू,तारापूर,वसई, ठाणे,आदि ठिकाणाहून भाविक येतात,तर जव्हारमधील मान्यवर व हिंदू मुस्लिम बांधवही या महोत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

> जव्हार शहरातील उरुस या उत्सवाचे महत्व प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे.या उत्सवादरम्यान नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करून उत्सवाचे पावित्र्य राखावे.
>
> **गणपतराव पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार**

# माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे शहापूरला जादा पाणीपुरवठ्यासाठी प्रयत्न

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे

शहापूर, दि. २३ : प्रतिनिधी



नागरीकरण वेगाने होणाऱ्या शहापूर शहराला जादा पाणीपुरवठा होण्यासाठी भातसा नदीतून वाढीव आरक्षण मंजूर करण्यासाठी माजी केंद्रीय पंचायती राज राज्यमंत्री कपिल मोरेश्वर पाटील यांच्याकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. या संदर्भात राज्याचे उपमुख्यमंत्री व जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घातले असून, शहापूरवासियांना दिलासा देण्याची मागणी करण्यात आली.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत शहापूरमधील वाढत्या लोकसंख्येची तहान भागविण्यासाठी नगरपंचायतीमार्फत नवी पाणीयोजना साकारण्यात आली आहे. मात्र, भातसा नदीवरुन शहापूर शहरासाठी पाणी आरक्षण कमी असल्यामुळे नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा गायत्री भांगरे, उपनगराध्यक्ष विजय भगत, भाजपाचे शहराध्यक्ष विवेक नार्वेकर, मुख्याधिकारी शिवराज गायकवाड यांच्यासह नगरसेवकांनी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांची काल शुक्रवारी भेट घेतली. त्यावेळी त्यांनी शहरासाठी वाढीव पाणीआरक्षण मंजूर करण्याची विनंती केली.

सध्या शहापूर नगरपंचायत क्षेत्रासाठी भातसा धरणातून १.१८६ दशलक्ष घन मीटर पाणी आरक्षण मंजूर केलेले आहे. शहरात प्रती माणशी दैनंदिन १३५ लिटर वापर गृहीत धरला आहे. तर वाढत्या लोकसंख्येनुसार भातसा नदीवरुन ३.१२५ दशलक्ष घनमीटर पाणी आरक्षण देण्याचा प्रस्ताव नगरपंचायतीमार्फत जलसंपदा विभागाकडे सादर करण्यात आला आहे. भातसा नदीच्या क्षेत्रातील पाणी स्थानिक नागरिकांसाठी उपलब्ध करण्याची तरतूद आहे. त्यानुसार वाढीव पाणी आरक्षणासाठी जलसंपदा विभागाकडे पाठपुरावा केला जात आहे.

शहापूरमधील नागरिकांची पाण्याची गरज भागविण्यासाठी कटीबद्ध असून, आपण या विषयावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करू. तसेच शहापूरवासियांना न्याय मिळवून देऊ, असे आश्वासन माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी शहापूर नगरपंचायतीच्या शिष्टमंडळाला दिले.

राज्यातील महायुती सरकारने सुरू केलेल्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत शहापूरमधील वाढत्या लोकसंख्येची तहान भागविण्यासाठी नगर पंचायतीमार्फत नवी पाणीयोजना साकारण्यात आली. मात्र, भातसा नदीवरुन शहापूर शहरासाठी पाणी आरक्षण कमी असल्यामुळे नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा गायत्री भांगरे, उपनगराध्यक्ष श्री. विजय भगत, भाजपाचे शहराध्यक्ष श्री. विवेक नार्वेकर, मुख्याधिकारी श्री. शिवराज गायकवाड यांच्यासह नगरसेवकांनी माझी काल शहापूर येथे भेट घेतली. तसेच शहरासाठी वाढीव पाणीआरक्षण मंजूर करण्यासाठी उपमुख्यमंत्री व जलसंपदामंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे प्रयत्न करण्याची विनंती केली. या मागणीसंदर्भात श्री. फडणवीस जी यांच्याबरोबर संपर्क साधला असून, लवकरच हा प्रश्न सुटेल. तसेच शहापुरातील प्रत्येक घरात पुरेसे पाणी उपलब्ध होईल.

# रिपब्लिकन पक्षाची उल्हासनगर जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

उल्हासनगर, दि. २३ : प्रतिनिधी

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्य मंत्री ना. रामदास आठवले यांच्या आदेशानुसार रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( आठवले) पक्षाची उल्हासनगर शहर जिल्हा कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली असून रिपाइं चे उल्हासनगर शहर अध्यक्ष भगवान भालेराव यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून रिपब्लिकन पक्षातून निलंबित करण्यात आले आहे .पक्षविरोधी कृती करीत आल्यामुळे भगवान भालेराव यांची रिपब्लिकन पक्षातून हकालपट्टी करण्यात आल्याची अधिकृत घोषणा रिपब्लिकन पक्षाचे सचिव ठाणे प्रदेश संपर्क प्रमुख व पक्ष निरीक्षक सुरेश बारशिंग यांनी केली आहे. रिपब्लिकन पक्षाचे उल्हासनगर शहर अध्यक्ष भगवान भालेराव यांना रिपब्लिकन चळवळीमुळे उपमहापौर पद प्राप्त झाले होते .मात्र अलीकडच्या काळात त्यांच्या विरुद्ध पक्ष संघटनेबाबत अनेक तक्रारी पक्षाकडे प्राप्त झाल्या होत्या.पक्षाविरुद्ध कारवाई होत असल्याचे त्यांच्यावर आरोप झाले असुन त्यामूळे पक्षशिस्तभंगाची कारवाई म्हणून भगवान भालेराव यांना पक्षातून निलंबित करण्यात आले आहे. रिपब्लिकन पक्षाची उल्हासनगर शहर कार्यकारिणी बरखास्त करण्यात अल्याची अधिकृत घोषणा सुरेश बारशिंग यांनी केली आहे.

# उद्या ग्रा.पं. संगणक परिचालक मुख्यमंत्र्याच्या ठाणे येथील बंगल्यावर मोर्चा काढणार !

मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी

ग्रामविकास व माहिती तंत्रज्ञान विभागा अंतर्गत "आपले सरकार" प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामपंचायत स्तरावर संगणकपरिचालक कार्यरत असून १२ वर्ष प्रामाणिक काम केलेल्या संगणकपरिचालकांना सुधारित आकृतीबंधानुसार ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे किंवा कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे या मागणीसाठी राज्य संघटनेच्या वतीने येत्या येत्या मंगळवारी २४ सप्टेंबर रोजी राज्यातील सुमारे २९ हजार ग्रामपंचायतीमध्ये काम करणारे २० हजार संगणकपरिचालक मुख्यमंत्री मा.ना.एकनाथरावजी शिंदे साहेबांच्या ठाणे येथील निवासस्थानावर काढण्यात येत असलेल्या मोर्चात सहभागी होत असून,मुख्यमंत्री मा.शिंदे साहेबच निर्णय देऊ शकतात ही सर्व संगणकपरिचालकांची अपेक्षा असल्याने ठाण्यात मोर्चा काढण्यात येत असून,शासन जो पर्यंत मागण्या मान्य करणार नाही तो पर्यंत ठाणे सोडणार नसल्याचा निर्धार केला असल्याची माहिती संघटनेचे राज्यअध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे यांनी दिली आहे. याबाबत सविस्तर वृत्त की,संग्राम व आपले सरकार या दोन प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील सुमारे २९ हजार ग्रामपंचायत मध्ये मागील १२ वर्षापासून संगणकपरिचालक प्रामाणिकपणे काम करत आहेत.परंतु शासनाने संगणकपरिचालकाना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा देऊन किमान वेतन देण्याच्या मागणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे,तसेच मागे संगणकपरिचालकांच्या आंदोलनाची दखल घेऊन १६ मार्च २०२४ रोजी मुख्यमंत्री ना.एकनाथरावजी शिंदे साहेबांनी ३००० रुपये मासिक मानधन वाढवल्याची घोषणा केली,परंतु सदरील मानधनवाढ राज्याच्या निधीतून न करता ग्रामपंचायतच्या निधीतून असल्याने राज्यातील ग्रामपंचायतीनी त्यास विरोध केला असल्याने त्या मानधनवाढीस अर्थ नाही,त्यातच csc –spv या कंपनीचा करार ३० जून रोजी रद्द केला व १९ जून २०२४ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडे तर १९ सप्टेंबर २०२४ रोजी रेलटेल व आईटीआईएल या कंपन्यांना आपले सरकार सेवा केंद्र प्रकल्प चालवण्यासाठी दिला,ज्या उपकंपन्यांनी संगणकपरिचालकांचे मागील १२ वर्षापासून सोशन केले,मानसिक त्रास दिला त्याच कंपन्या परत येत आहेत तसेच संगणकपरिचालकांना कामगार म्हणून नियुक्ती नाही किंवा किमान वेतन नाही,विमा नाही,पीएफ नाही,महिलांना प्रसुती रजा नाहीत,त्याच बरोबर ग्रामविकास विभागाने ११ जानेवारी २०२३ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार संगणकपरिचालकांना यावलकर समितीच्या शिफारशीनुसार कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे आवश्यक असताना त्याकडे ग्रामविकास विभाग जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे,संगणकपरिचालकांना ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन देणे या प्रमुख मागणीकडे मुख्यमंत्री मा.शिंदे साहेबांचे लक्ष वेधण्यासाठी ठाणे येथील त्यांच्या निवासस्थानावर मंगळवारी २४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मोर्चा काढण्यात येणार असून,मुख्यमंत्री साहेबच निर्णय घेतील ही अपेक्षा राज्यातील सर्व संगणकपरिचालकांना असल्यानेच ठाण्यात कोर्टनाका ते जांभळीनाका(चिंतामणी चौक) ते मा.मुख्यमंत्री साहेबांचे निवासस्थान या मार्गावर मोर्चा काढण्यात येत असून शासनाने या मोर्चाची तात्काळ दखल घ्यावी अन्यथा मागणी मान्य होईपर्यंत ठाणे सोडणार नसल्याचा निर्धार संगणकपरिचालकानी केला असल्याचे राज्यअध्यक्ष सिद्धेश्वर मुंडे यांनी सांगितले.

# नागाव परिसरात कचऱ्याच्या ढीगांसह बेवारस वाहनांचे रस्त्यावर अतिक्रमण नागरिक हैराण, उपाययोजनेची मागणी

भिवंडी, दि. २३ : प्रतिनिधी

शहरातील एस टी स्टँड ते नागाव गायत्री नगर या चोवीस तास वर्दळ असलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर बेवारस वाहन रस्त्यावर उभी करून ठेवून अडथळा निर्माण केला जात असून या रस्त्यावर ठिकठिकाणी कचरा टाकला जात असल्याने या मार्गाने प्रवास करणारे नागरीक हैराण झाले आहेत.यावर तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी काँग्रेस ओबीसी मोर्चाचे शहराध्यक्ष अनंता पाटील यांनी पालिका आयुक्त अजय वैद्य तसेच वाहतूक पोलीस विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.एस टी स्टँड ते नागाव गायत्री नगर या रस्त्याचे काँक्रिटकरण करताना या रस्त्यावरील रुंदीकरण ही केले.त्यामुळे रुंद झालेल्या रस्त्यावरून वाहतूक सुरळीत होईल अशी भावना नागरिकांची होती.परंतु या रस्त्यावर अनेक ठिकाणी बेवारस वाहन टेम्पो रिक्षा कित्येक महिने उभ्या करून ठेवल्या आहेत.त्यामुळे या मार्गाने जाणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात असल्याने या ठिकाणी दुर्गंधीचा सामना नागरिकांना करावा लगत आहे. तर रस्त्या लगतच्या दुकानदारांनी दुकानासमोर रस्त्यावर हातगाड्या लावण्यासाठी जागा उपलब्ध करून देऊन रस्ता अडवून ठेवला आहे. यामुळे या मार्गावर नेहमीच वाहतूक कोंडी होत असून त्यामुळे अनेक वेळा शालेय बसेस या वाहतूक कोंडीत अडकून पडल्याने विद्यार्थी शाळेत वेळेत न पोहचल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून या रस्त्यावरील अडथळे व कचरा हा तात्काळ हटवावा अशी मागणी अनंता पाटील यांनी आयुक्त अजय वैद्य व वाहतूक पोलिसांना निवेदन देवून केली आहे.

# जव्हार कुटीर रुग्णालय येथे पाण्याच्या टँकरव्दारे केला मोफत पाणीपुरवठा..



जव्हार, दि. २३ : प्रतिनिधी

जव्हार कुटीर हॉस्पिटल येथे लोकनियुक्त सरपंच कल्पेश विनायक राऊत हे शिवसेना पक्षा कडून डायलिसिस सेंटर मधील पेशंटला होणाऱ्या त्रासाबद्दल बदल तक्रारीची निवारण करण्यास निवेदन देण्यासाठी गेले असता त्यांना असे लक्षात आले की डायलासिस करण्यास गेलेल्या पेशंट ला पाण्याअभावी वेळ लागत होता व पाणी नसल्यामुळे डायलासिस बंद होते.हे लक्षात आल्यावर कल्पेश विनायक राऊत यांनी तात्काळ टँकर व्दारे स्वखर्चाने पाणीपुरवठा करण्यास सांगितला यावेळी कासटवाडी ग्राम. सरपंच कल्पेश विनायक राऊत,सामाजिक कार्यकर्ते ओमकार कूवरा,राहुल शेंडे, कासटवाडी ग्राम उपसरपंच त्रिंबक रावते,सदस्य कुणाल सापटा उपस्थित होते.

# प्रेमप्रकरण उघड झाल्याने 11 वर्षाच्या मुलाची आत्महत्या कल्याण- डोंबिवलीत 2 आत्महत्या

कल्याण, दि. २३ : प्रतिनिधी

कल्याण, डोंबिवली शहरातील दोन वेगळ्या घटनांमध्ये दोन तरुणांनी शुक्रवारी आत्महत्या केल्या. डोंबिवलीतील एका प्रकरणात तरुणाला मैत्रिणीने भेटण्यास नकार दिला म्हणून नैराश्य आल्याने तरुणाने मैत्रिणीच्या राहत्या घराच्या चौथ्या माळ्यावरून उडी मारून आत्महत्या केली. तर, कल्याणमधील ११ वर्षाच्या तरुणाने आपले प्रेमप्रकरण उघड झाल्याने आलेल्या तणावातून आत्महत्या केली.

डोंबिवलीतील मानपाडा, कोळसेवाडी पोलीस ठाण्यात या दोन्ही प्रकरणांच्या नोंदी आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील एक तरुण स्वप्निल अनिल धुमाळ (२३) हा डोंबिवलीत आपल्या मैत्रिणीला भेटण्यासाठी आला होता. परंतु, मैत्रिणीने त्याला भेटण्यास नकार दिला. यामधून त्याला नैराश्य आले. या नैराश्यातून त्याने मैत्रिणीच्या राहत्या घराच्या चौथ्या माळ्यावरील गच्चीवर जाऊन जमिनीवर उडी मारून आत्महत्या केली. या तरुणाला तातडीने पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात उपचारासाठी नेले. तेथे उपचार सुरू असताना त्याचा शुक्रवारी मृत्यू झाला. मानपाडा पोलीस ठाण्याचे हवालदार एस. के. आढाव यांच्या तक्रारीवरून या मृत्यूप्रकरणाची नोंद करण्यात आली आहे.

कल्याण पूर्वेतील कोळसेवाडी भागात राहत असलेल्या एका ११ वर्षांच्या मुलाने शुक्रवारी आई, वडील घरात नाहीत पाहून टिटवाळा येथील एका अल्पवयीन मुलीला घरी आणले होते. बाहेर गेलेले आई, वडील अचानक घरी आले. त्यावेळी घरात मुलगा आणि त्याची मैत्रिण होती. पालकांनी अल्पवयीन मुलाला मुलीची माहिती विचारली. ती घरी का आली होती असे प्रश्न केले. त्यानंतर पालकांनी त्या मुलीला घेऊन तिला टिटवाळा येथे तिच्या घरी सोडण्यास गेले. यावेळी अल्पवयीन मुलगा घरात एकटाच होता. आई, वडील परतल्यावर आपल्याला ओरडतील या भीतीने अल्पवयीन मुलाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. कोळसेवाडी पोलीस ठाण्यात याप्रकरणाची नोंद करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांच्या वारसांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजना ठरतेय वरदान



जव्हार, दि. २३ : प्रतिनिधी

तालुक्यात खरिपाच्या हंगामात ग्रामीण भागात शेती मोठ्या प्रमाणात केली जाते.येथे जंगल भाग अधिक आहे,शिवाय शेतकऱ्यांची शेतजमीन ही डोंगर उतार,नदी - नाले अश्या जागेत आहे, त्यामुळे शेतीच्या कामासाठी जाताना अनेकदा अपघात होतात, काहीवेळा सर्प अगर विंचू दंश होत असतो, अश्या वेळी येथील शेतकऱ्याच्या वारसाला गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात योजना वरदान ठरत आहे.

गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत मृत्यू ' पावलेल्या अथवा अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांना किंवा त्यांच्या कुटुंबीयांना अनुदान देण्यात येते. सन 2022 पासून ते 2024 पर्यंत शेतकऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी दोन लाख असे 48 लाख रुपये अनुदान वाटप करण्यात आले आहे. या योजनेतून शेतकऱ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास किंवा अपघाताने दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय व एक हात किंवा पाय निकामी झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना 2 लाख रुपयांची मदत दिली जाते. तसेच अपघाताने अपंगत्व आल्यास 1 लाख रुपयांची मदत दिली जाते. राज्य सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा विमा काढल्या जातो. शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी 2 लाख प्रमाणे अनुदान मदत दिली जाते. दरम्यान, राज्यात 2015-16 पर्यंत गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना राबवली गेली. परंतु या योजनेत अनेक त्रुटी होत्या.विमा कंपन्यांकडून दावे निकाली काढण्यात दिरंगाई केली जात होती. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळत नव्हती.2023 पासून सरकारने सानुग्रह अनुदान तत्त्वावर योजना राबण्याचा निर्णय घेतला.सध्या योजनेतून अपघाती मृत्यू झाल्यास शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना 2 लाख तर अपंगत्व आल्यास 1 लाख रुपयांची मदत दिली जाते.

रस्ता किंवा रेल्वे अपघात, पाण्यात बुडून मृत्यू,जंतुनाशके हाताळताना किंवा अन्य कारणामुळे विषबाधा,विजेचा धक्का बसल्यामुळे झालेला अपघात,वीज पडून मृत्यू, खून, उंचावरून पडून झालेला अपघात,सर्पदंश व विंचूदंश, नक्षलवाद्यांकडून झालेली हत्या,जनावरांमुळे जखमी किंवा मृत्यू,बाळंतपणातील मृत्यू,दंगल,अन्य कोणताही अपघात.

# गुरे चोरणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

मनोर, दि. २३ : प्रतिनिधी

मनोर पालघर रस्त्यावरील मासवण गावच्या हद्दीतील सूर्या नदीवरील पुलावर पोलिसांच्या गाडीला ठोकर मारून फरार झालेल्या गुरे चोरणाऱ्या टोळीतील आरोपी अश्रफ शकील शेख याला मनोर पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे.मस्तान नाका परिसरातील एका हॉटेल मधून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी याच गुन्ह्यातील आरोपी तंजीम शेख उर्फ पिल्या याला टेन नाक्यावर मोरे पाडा भागातून याला त्याच्या राहत्या घरातून अटक करण्यात आली होती.गुन्हा घडल्या दिवशी जावेद शेख आणि सनोज प्रसाद यांना घटनास्थळावरून अटक करण्यात आली होती.गुन्ह्यातील नऊ आरोपी पैकी चार जणांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. पाच आरोपी अजूनही फरार असल्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. पालघरच्या नंडोरे भागातून गुरे चोरून नेत असताना पोलिसांनी पाठलाग करून आरोपीना मनोर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मासवाण येथे थांबवताना आरोपीनी पोलिसांच्या वाहनाला धडक देऊन घटनास्थळावरून अंधाराचा फायदा घेत पळून गेले होते.दीड वर्षापूर्वी घडलेल्या गुन्ह्यातील चार आरोपीना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्यात सहभाग असलेल्या एकूण नऊ आरोपी पैकी पाच आरोपी इर्शाद शेख, गुफरान शेख,लाल्या आणि सय्यद शेख अजूनही मनोर पोलिसांच्या हाताला लागले नाहीत.

# बुधवारी जिल्हा परिषद शाळा बंद, शिक्षक संघटनांची सामूहिक रजा, जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

बदलापूर, दि. २३ : प्रतिनिधी

शासनाच्या प्राथमिक शिक्षण क्षेत्रातील चुकीच्या धोरणात विरोधात राज्यातील सर्व शिक्षक संघटनांनी शासनाविरोधात आंदोलनाचा निर्णय घेतला असून ठाणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद शिक्षक येत्या बुधवार, २५ सप्टेंबरला सामूहिक रजा घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढणार आहेत. त्यामुळे या दिवशी जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा बंद राहणार आहेत. १५ मार्च रोजी शिक्षक संच मान्यता आणि ५ सप्टेंबरच्या कंत्राटीत शिक्षक भरती संदर्भातल्या शासन निर्णयामुळे २० पट असलेल्या शाळेमध्ये एक कायम तर एक कंत्राटी शिक्षक नेमला जाणार आहे. आधारवर संचमान्यता होत असल्याने दुर्गम भागात विद्यार्थी अधिक आहे. मात्र आधार नोंदणी नसल्याने अनेक शिक्षकांची पदे कमी होणार आहे. त्यामुळे शासनाचे हे धोरण डोंगरी दुर्गम भागातील तसेच वाडी- वस्तीवर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय करणारे आहेत.



# बीओबी बॅडमिन्टन स्पर्धेत स्वाती विजेती

मुंबई, दि. २३ : प्रतिनिधी

बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागीय बॅडमिन्टन निवड चाचणी स्पर्धेमध्ये स्वाती एस. हिने महिला एकेरीचे विजेतेपद पटकाविले. दादर-पश्चिम येथील बीएसएनएल बॅडमिन्टन कोर्टवरील महिलांच्या अंतिम सामन्यात स्वातीने १२-१२ अशा बरोबरी नंतर निर्णायक क्षणी अचूक फटके साधले आणि पूजा मोरेचे जोशपूर्ण आव्हान १५-१२ असे संपुष्टात आणून स्वातीने अजिंक्यपदावर शिक्कामोर्तब केला. परिणामी प्रारंभी आघाडी घेणाऱ्या पूजाला अंतिम उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. बँक ऑफ बडोदा क्रीडा विभागाचे प्रदीप सुरवसे व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण यांनी विजेत्या-उपविजेत्यांचे अभिनंदन केले.

बँक ऑफ बडोदा-मुंबई विभागतर्फे आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने झालेल्या महिला बॅडमिन्टन स्पर्धेची उपांत्य लढत देखील अटीतटीमध्ये रंगली. पहिल्या सलग ४ गुणासह डावाच्या मध्यापर्यंत ९-८ अशी आघाडी घेणाऱ्या गरिमा श्रीवास्तवला स्वाती एस. हिने अखेर २१-१३ असे चकवून अंतिम फेरी गाठली. दुसरी उपांत्य लढत जिंकताना पूजा मोरे हिने प्रियांका उपाध्यायचा २२-२० असा निसटता पराभव केला. स्पर्धेमधून महिला विभागात स्वाती एस., पूजा मोरे, गरिमा श्रीवास्तव, प्रियांका उपाध्याय आणि पुरुष विभागात ऋषिकेश शिंदे, हनमंत सुद्रिक, प्रमोद जयस्वाल, ऋग्वेद फराडे यांची मुंबई विभागीय संघात निवड करण्यात आली असून १७ व १८ ऑक्टोबर रोजी राजकोट येथे होणाऱ्या अखिल भारतीय बीओबी बॅडमिन्टन स्पर्धेमध्ये मुंबई विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. प्रशिक्षक सचिन भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पंचाचे कामकाज सिध्देश राऊत, आदित्य कीर, साहिल, चंद्रकांत करंगुटकर, ओमकार चव्हाण, अर्जुन कालेकर, श्रीधर नार्वेकर, अविनाश महाडिक आदींनी पाहिले.

# सडक अर्जुनी येथील वाढत्या अतिक्रमणाकडे न.पं.ची डोळेझाक

■ महासागर प्रतिनिधी,
सडक अर्जुनी, दि. २३ : येथील शहरात अतिक्रमणाच्या समस्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. वाढत्या अतिक्रमणामुळे शहरातील विकासकामात अडचण निर्माण होत आहे; पण अतिक्रमणधारकांवर कुठलीच कारवाई केली जात नसल्याने शहरवासीयांनी नगरपंचायतवर रोष व्यक्त केला आहे.



सडक अर्जुनी ग्रामपंचायतचे सन २०१५-१६- मध्ये नगरपंचायतमध्ये रूपांतर झाले. त्यामुळे सडक अर्जुनी सारख्या छोट्याशा तालुक्याला नगरपंचायतचा दर्जा प्राप्त झाला. यामुळे विकास होऊन चेहरा मोहरा बदलणार, असे शहरवासीयांना वाटू लागले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र वेगळेच चित्र आहे.

सडक अर्जुनी शहरात अतिक्रमण करणाऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. शहरातील काही मोक्याच्या व शासकीय जागा व जिल्हा परिषदेवर जागेवर अतिक्रमण केले जात आहे. याचा शहरातील विकास कामांवर परिणाम होत आहे. अतिक्रमणधारकांना नगरपंचायत व प्रशासनाचा कुठलाच धाक राहिलेला नाही.नगरपंचायतने या अतिक्रमणधारकांवर वेळीच कारवाई करण्याची गरज असताना ते याकडे डोळेझाक करीत आहे. परिणामी, अतिक्रमणधारकांची हिंमत दिवसेंदिवस वाढत चालल्याचे चित्र आहे. या प्रकारामुळे शहरवासीयांनी नगरपंचायतवर रोष व्यक्त केला आहे. वेळीच पावले उचलण्याची गरजसडक अर्जुनी हे तालुक्याचे ठिकाण असून, या शहराला नगरपंचायतचा दर्जा मिळाल्याने अनेक शासकीय कार्यालय येथे येणार आहेत. त्यांना जागा उपलब्ध करून द्यायची जवाबदारी नगरपंचायत प्रशासनाची आहे. त्याशिवाय सडक अर्जुनीचा विकास होऊ शकणार नाही, त्याकरिता नगरपंचायतमध्ये दूरदृष्टी असलेले मुख्याधिकारी, अध्यक्ष व नगरसेवकांची गरज आहे. वेळप्रसंगी वाद-विवादझाला तरी त्याला सामोरे जाण्याची ठेवावी लागेल. तेव्हाच शहरातील वाढत्या अतिक्रमणाला ब्रेक लागू शकतो.नगरपंचायतचे मोकळ्या जागांकडे दुर्लक्षशहरात अनेक लेआऊटची निर्मिती झाली. त्या प्रत्येक लेआऊटमध्ये ओपन स्पेस असते. त्या ओपन स्पेसचा उपयोग बगिचा, अंगणवाडी, खेळाचे मैदान, व्यायामशाळा यासाठी करणे गरजेचे आहे. परंतु नगरपंचायतचे याकडे पूर्णतः दुर्लक्ष झाले आहे. ओपन स्पेसमधील जागा विकसित करण्यात नगरपंचायत अपयशी ठरली आहे. प्रभाग क्रमांक १७ मध्ये एका लेआऊट मालकाने ओपन स्पेसमधील प्लॉटची विक्री केल्याचा प्रकार पुढे आला होता; पण यानंतरही नगरपंचायतने कसलाच बोध घेतला नाही.

# राज्याच्या तिजोरीत ठणठणाट, तरी सरकारचा भूमिपूजनाचा सपाटा सुरू

### उमरखेड विधानसभा उबाठासाठी मागणार– नागेश पाटील आष्टीकर

■ महासागर प्रतिनिधी,
उमरखेड, दि. २३ : राज्याच्या तिजोरीत ठणठणात आहे. राज्य कर्जबाजारी झाले आहे. अशा अवस्थेत सत्ताधारी कोट्यावधी रुपयांची भूमिपूजन करत असून महायुतीच्या सरकारचा कारभार म्हणजे बोलाचाच भात बोलाचीच कडी असून आहे ती परिस्थिती बदलण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहावे,

असे आवाहन हिंगोली लोकसभेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी केले. उमरखेड तालुक्यातील पूरग्रस्त भागाचा दौरा करत असताना चालगणी येथे छोटे खाणी घेतलेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.



दि. ३१ऑगस्ट ते दि. २ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीत नदी आणि नाल्या काठावरील जमिनीचा सर्वे खर्डा म्हणून घ्या पण इतर टक्के नुकसान घेण्याच्या सूचना प्रशासनाला केल्या असल्याचे ते म्हणाले.

भाजपचे सरकार म्हणजे आंधळं दळतंय आणि कुत्र पीठ खाते असं असून आगामी काळात कामे करून घ्यायचे असेल तर सत्ता महाविकास आघाडीच्या हातात घेण्याचे आवाहन त्यांनी केले. सदर बैठकीला माजीआमदार प्रकाश पाटील देवसरकर, माजी जि. प. सभापती राम देवसरकर, साहेबराव कांबळे, काँग्रेस तालुकाध्यक्ष दत्तराव शिंदे, तालुकाप्रमुख सतीश नाईक, गजेंद्र ठाकरे शाखा भरवाडे, चालगणी सरपंच वंदना कदम, त्र्यंबक पाटील आदी उपस्थित होते.

उमरखेड विधानसभा मतदारसंघ काँग्रेसचा राखीव असून याबाबत माजी जिल्हा परिषद सभापती राम देवसरकर यांनी काँग्रेसचाच उमेदवार राहणार असे सांगितले, यावर बोलताना खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी उमरखेड विधानसभा मतदारसंघ उबाठासाठी मागणार असल्याचे सांगितल्याने काँग्रेसच्या वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# पांढरकवड्यात पालिकेचा गैरकारभार

## आरोग्याच्या समस्यांचा डोंगर वाढताच:जिल्हाधिकाऱ्यांनी दिली भेट, नागरिकांनी वाचला तक्रारींचा पाढाच

■ महासागर प्रतिनिधी,
पांढरकवड, दि. २३ :
नागरिकांच्या विविध समस्या, आरोग्यांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहर, मोहल्ला, वार्ड येथील स्वच्छ्ता व अनेक समस्यांचे निवारण करणे हे नगरपालिकेचे काम आहे. परंतू येथील नगरपालिका प्रशासकीय अधिकारी यांच्या गलथान कारभारामुळे शहरात डेंग्यू आणि मलेरियाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. यासाठी नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी पूर्णपणे बेजाबदार असल्याचा आक्रोश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या समोर युवा टायगर फोर्सचे संयोजक अंकित नैताम यांनी व्यक्त केला.



शहरातील समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्राधिकरणाशी वारंवार चर्चा व बैठका झाल्यात. या बैठकीत पालिका अधिकारी आणि एसडीओ यांनी नागरिकांना आश्वासने दिलीत. परंतु याकडे अधिकाऱ्यांनीच दुर्लक्ष करुन समस्या सोडवण्यासाठी पाठपुरावा सुद्धा केलेला नसल्याचा ठपका ठेवत जिल्हाधिकाऱ्यांसमोर कैफियत मांडली. नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी समस्या सोडवण्यासाठी दि. २४ जुलै रोजी लेखी पत्र दिले आहे. मात्र दोन महिने उलटूनही नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि मूलभूत आरोग्य सुविधा प्रदान करण्यासाठी प्रशासन खोटे ठरले आहे. नगरपालिकेचे मुख्याधिकारी हे त्यांच्या कर्तव्यात कसुर करीत असून त्यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी युवा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष मदन जिद्देवार, रितेश परचाके, मनोज भोयर, संजय झोटिंग, संजय औदार्य, किशोर कनाके, जिल्हाधिकारी यांना करण्यात आली आहे.

शहरात मलेरिया व डेंग्यूच्या साथीने जोर पकडला आहे. साफसफाई खड्डे, रस्ता, नाल्या, स्ट्रीट लाईट, विद्युत पुरवठा खंडित होणे, डास मुक्त फवारणी, मोकाट जनावरे इतर समस्यांवर नगरपालिकेने उपाययोजना न केल्यामुळे जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे.

# ५४ वर्षीय मुलाची ८० वर्षीय आईसोबत तलावात उडी घेऊन आत्महत्या



लक्ष्मण लोणारकर



लक्ष्मीबाई लोणारकर

### अमरावतीत घरगुती वादातून आयुष्य संपवल्याचा पोलिसांचा अंदाज

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २३ : येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात वरिष्ठ सहायक तथा प्रभारी अधीक्षक म्हणून कार्यरत एका ५४ वर्षीय व्यक्तीने शहरालगत असलेल्या छत्री तलावात उडी घेऊन आत्महत्या केली. याच वेळी त्यांच्या ८० वर्षीय आईनेही आत्महत्या केली असावी. कारण दोघांचेही मृतदेह रविवार, २२ सप्टेंबरला छत्री तलावातून काढण्यात आले. त्यांनी घरगुती कारणावरून आत्महत्या केली असावी असा प्राथमिक अंदाज राजापेठ पोलिसांनी वर्तवला आहे. लक्ष्मण मनोहरराव लोणारकर (५४) आणि लक्ष्मीबाई मनोहरराव लोणारकर (८०, दोघेही रा. महारुद्र अपार्टमेंट, दस्तूरनगर, अमरावती) अशी मृतांची नावे आहेत. लक्ष्मण हे विद्यापीठातील गोपनीय विभागात वरिष्ठ सहायक पदावर कार्यरत होते. तसेच अलीकडेच त्यांच्याकडे गोपनीय विभागाच्या अधीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला होता. दरम्यान, रविवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास लक्ष्मण यांच्या आई लक्ष्मी यांचा मृतदेह छत्री तलावावर तरंगताना दिसला. त्यामुळे पोलिसांना माहिती मिळताच लक्ष्मीबाईंचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढला.

आत्महत्येला मीच जबाबदार आहे. लक्ष्मण लोणारकर हे शनिवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास घरातून बाहेर पडले. त्यानंतर ते घरी परतलेच नाहीत. कारमध्ये सापडलेल्या सुसाइड नोटमध्ये माझ्या आत्महत्येला कोणीही दोषी नाही, मी स्वत: जबाबदार आहे, असा मजकूर आहे

-लक्ष्मण लोणारकर

# सोयाबीनवर तांबेरा रोग, हेक्टरी ४० हजारांच्या मदतीची मागणी



भीम ब्रिगेडच्या वतीने निदर्शने; जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २३ : जिल्ह्याच्या बहुतेक भागातील सोयाबीन पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव झाला असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ४० हजार रुपयांची मदत तातडीने देण्यात यावी, अशी मागणी भीम आर्मीने केली आहे. यासंदर्भात पदाधिकारी-कार्यकर्त् यांनी आक्रमक होत गुरुवारी जिल्हा कचेरीवर निदर्शने केली. त्यानंतर रोगग्रस्त सोयाबीन जिल्हा कचेरीतील अधीक्षकांच्या टेबलावर टाकून या विषयाचे गांभीर्य लक्षात आणून दिले. भीम आर्मीचे राजेश वानखडे यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. जिल्ह्यात सुमारे २ लाख ६० हजार हेक्टर क्षेत्रावर सोयाबीनचा पेरणी केलेली आहे.

सुरुवातीच्या काळात अनियमित पावसामुळे हे पीक अडचणीत आले होते. त्यानंतर सततच्या पावसामुळे सोयाबीनवर गंडांतर आले. आता कुठे थोडे दिलासादायक चित्र तयार झाले होते. मात्र तांबेरा रोगामुळे (येलो मोझॅक) उरलीसुरली आशाही मावळली आहे. अमरावती, वरुड, मोर्शी, दर्यापूर, चांदूर बाजार, चांदूर रेल्वे, भातकुली, तिवसा आदी तालुक्यातील शेतकरी या रोगामुळे अडचणीत आले आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या भागाचे तातडीने पंचनामे करून हेक्टरी ४० हजार नुकसान भरपाई देण्याची मागणी या वेळी करण्यात आली. शासनाने मागील वर्षी (सन २०२३-३४-) सोयाबीन व कापूस उत्पादकांना अनुदान म्हणून हेक्टरी ५ हजार रुपये जाहीर केले होते. परंतु अद्यापही शेतकऱ्यांना ती रक्कम देण्यात आली नाही. अशाप्रकारे सरकारने शेतकऱ्यांची थट्टाच चालवली आहे.

# अप्पर वर्धा धरणाची तीन दारे उघडली, प्रतिसेकंद ४७ घनमीटर पाण्याचा विसर्ग

**अमरावती :** पश्चिम विदर्भातील सर्वात मोठ्या अप्पर वर्धा धरणाची तेरा पैकी तीन दारे सोमवारी दुपारी १० सेंटिमीटरने उघडण्यात आली. त्यामधून ४७ घनमीटर प्रतिसेकंद पाण्याचा विसर्ग नदीपात्रात सोडण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला आहे. संततधार पावसामुळे नदी, नाले दुथडी भरून वाहत आहेत. परिणामी अनेक धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. अप्पर वर्धा प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता अनिकेत सावंत, मोर्शीच्या उपविभागीय अभियंता मनाली नंदागवळी, कनिष्ठ अभियंता शुभम जयस्वाल यांच्या हस्ते धरण क्षेत्रातील पाण्याची विधीवत पूजाअर्चा करून १, ७ व १३ क्रमांकाची दारे उघडण्यात आली. जिल्ह्यासाठी वरदायिनी असलेल्या अप्पर वर्धा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या चार दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे अप्पर वर्धा धरणाच्या जलसाठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. ही बाब लक्षात घेऊन सोमवारी धरणाची तीन दारे उघडण्यात आली. अप्पर वर्धा धरणाची जलपातळी जुलै अखेरपर्यंत ७४ टक्क्यांच्या खाली होती. मात्र, ५ ऑगस्ट रोजी पाणीसाठ्याची टक्केवारी ७८.५६ एवढी झाल्याने दारे उघडण्याची वेळ आली. अप्पर वर्धा धरणाची निर्धारित पाण्याची पातळी ३४२.५० मिलीमिटर एवढी ठेवण्यात आली आहे. सध्या ही पातळी ३४१.०४ मिलीमिटर झाली आहे. त्यामुळे जवळपास ७८.५६ टक्के धरण भरलेले आहे. धरणाची दारे उघडण्यात आल्याने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## गुणरत्न सदावर्तेंच्या एसटी बँकेच्या सभेत तुफान राडा! पोलिसांवर फेकल्या खुर्च्या, धक्काबुक्की



■ महासागर प्रतिनिधी,
भंडारा , दि. २३ : भंडारा येथील ड. गुणरत्न सदावर्ते यांच्या पॅनेलकडून बोलावण्यात आलेली एसटी ट्रान्सपोर्ट बँकेची सभा आज वादळी ठरली. मोठ्या गदारोळानंतर एसटी ट्रान्सपोर्ट बँकेची सभा संपवण्यात आली. यावेळी पोलिसांवर खुर्च्या फेकण्यात आल्या. एकमेकांना धक्काबुक्की करण्यात आली. सदावर्तेंवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा विरोधकांनी ठराव आणला. तर मारहाण केल्याप्रकरणी सदावर्तेंच्या समर्थकांनी भंडारा पोलिसांत तक्रार दिली. एसटी महामंडळ कर्मचाऱ्यांच्या एसटी ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेची सर्वसाधारण वी सभा भंडाऱ्यात आयोजित करण्यात आली होती. ड. गुणरत्न सदावर्ते यांच्या पॅनलकडून ही सभा आयोजित करण्यात आली होती. मात्र, एसटी कामगार कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी ही सभा अक्षरशः उधळून लावली. वार्षिक विशेषांकावर सत्ताधाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, प्रभू श्री रामचंद्र यांच्यासह नथुराम गोडसे यांचे छायाचित्र लावल्याचा मुद्दा धरत आर्थिक घोटाळा केल्याप्रकरणी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले.

यावेळी वाद वाढला आणि विरोधकांनी अक्षरशः अहवालाची पुस्तकं फाडून फेकली.तोडफोड, फेकाफेकीवाद वाढल्यानंतर एकमेकांना धक्काबुकी करत खुर्च्यांची तोडफोड करून फेकाफेकी केली. यातील काही खुर्च्या पोलिसांनाही फेकून मारण्यात आल्या. एसटी कामगार कृती समितीनं सभेतून बाहेर पडत लगतच्या दुसऱ्या सभागृहात वार्षिक सभा आटोपली. तर, पदाधिकाऱ्यांनी ही सभा तहकूब केल्याचे घोषित केले.


**MIRAE ASSET**
Mutual Fund

In order to impart an insight on mutual fund, to educate and create awareness among the investors about the financial market, Mirae Asset Mutual Fund undertakes numerous events and activities at various places across the country and in number of ways such as conducting Investor Awareness Programs (IAPs) / seminars, contents on investor awareness in print media (newspapers, magazines etc.) and programs on Mutual Funds in electronic media (TVs, radios etc.).

In this regard, please see below schedule of upcoming IAP:

| Date | Time | Address |
|---|---|---|
| September 25, 2024 | 6:30 P.M. | Haldiram's, Shankar Nagar, Nagpur - 440 010. |

**MIRAE ASSET MUTUAL FUND (Investment Manager: Mirae Asset Investment Managers (India) Private Limited.** CIN - U65990MH2019PTC324625)
**Registered & Corporate Office:** 606, 6th Floor, Windsor Building, Off CST Road, Kalina, Santacruz (E), Mumbai - 400098. ☎ 1800 2090 777 (Toll free), customercare@miraeasset.com www.miraeassetmf.co.in

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**



**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
**Tender Notice**

Commissioner NMC invites Offline tenders for the following works. These tenders can be submitted by the registered contractors of NMC. The Terms and Conditions of tenders are available in the tender form. The sale and purchase of Tender form can be done at E.E. (DPDC) Office, 5th Floor, B-Wing NMC, Nagpur.

| S.N. | Name of the work | BOQ Cost (Rs.) | EMD (Rs.) |
|---|---|---|---|
| 1 | Providing & Laying Sewer line at from Meshram to H/o Patil Panchsheel Nagar Gittikhadan in Prabhag No. 14 | 828428 | 8300 |
| 2 | Providing & Laying Sewer line at Near H/o Mulmule Bhivsenkhori in Prabhag No. 13 | 828108 | 8300 |
| 3 | Pro. & Laying Sewer line at Gittikhadan in Prabhag No. 10 | 827464 | 8300 |
| 4 | Const. of C.C. Flooring at Near H/o Raastrapal Thool Sanjay Nagar Single line in Prabhag No. 13 | 828201 | 8300 |
| 5 | Const. of C.C. flooring at H/o Patil Dhamma Nagar Gittikhadan in Prabhag No. 14 | 828556 | 8300 |
| 6 | Const. of C.C. Flooring at Near H/o Smt Kavita Dhote Bhivsenkhori in Prabhag No. 13 | 827701 | 8300 |
| 7 | Pro. & Laying Sewer line near H/o Gajbhiye at Bhivsenkhori in Prabhag No. 13 | 828118 | 8300 |
| 8 | Const of C.C. Flooring at Near H/o Chiwande Sadar in prabhag No. 14 | 829174 | 8300 |
| 9 | Pro. & Laying Sewer line & Chamber Repairing at Near H/o Madne Khatikpura in Prbahag No. 14 | 828431 | 8300 |
| 10 | Pro & fixing I-Block at near Sadar Buddha Vihar in Prabhag no. 14 | 822662 | 8300 |
| 11 | Pro & Laying Sewer line at Near H/o Sanghmitra Sakhare Sadar Buddha vihar area in Prabhag No. 14 | 827053 | 8300 |
| 12 | Const. of C.C. Flooring at Near Smt Wasnik Khatikpura in Prabhag No. 14 | 828798 | 8300 |
| 13 | Pro. & Laying Sewer line at Near H/o Sunaina Baxare Dhamma Nagar Gittikhadan in Prabhag No. 14 | 827757 | 8300 |
| 14 | Pro & Laying Sewer line at Near H/o Smt Wasnik Khatikpura in Prabhag No. 14 | 827250 | 8300 |
| 15 | Const. of Box Type Culvert & C.C. Flooring at Dhamma Nagar Gittikhadan in Prabhag No. 14 | 831011 | 8400 |
| 16 | Pro. & Laying Sewer line & C.C. Flooring at Manavata Nagar in Prabhag No. 14 | 827660 | 8300 |
| 17 | Pro. & Laying Sewer line & C.C. Flooring at Near H/o Hadke Azad Nagar Gittikhadan in Prabhag No. 14 | 826867 | 8300 |
| 18 | Pro. & Laying Sewer line & C.C. Flooring at Near H/o Bansod Taj Nagar Gittikhadan in Prabhag No. 14 | 828033 | 8300 |
| 19 | Pro & Laying Sewer line & C.C. Flooring at Telangkhedi in Prabhag No. 14 | 827901 | 8300 |
| 20 | Pro & Laying Sewer line at Near H/o Chiwande Sadar in Prabhag No. 14 | 827790 | 8300 |
| 21 | Pro. & Laying Sewer line & C.C. At Mahatma Fule Nagar Pandhrabodi in Prabhag No. 13 | 826899 | 8300 |
| 22 | Pro. & Laying Sewer line at Sudam Nagri in Prabhag No. 13 | 828198 | 8300 |
| 23 | Pro & Laying Sewer line at Pandhrabodi in Prabhag No. 13 | 828160 | 8300 |
| 24 | Pro & Laying Sewer line & Repairing of Chambers at Pandhrabodi in Prabhag No. 13 | 830247 | 8400 |
| 25 | Const. of C.C. Flooring at Pandhrabodi in prabhag No. 13 | 829033 | 8300 |
| 26 | Pro. & Laying Sewer line C.C. Flooring at near H/o Tagade Sanjay Nagar in Prabhag No. 13 | 827294 | 8300 |
| 27 | Pro & Laying Sewer line & Repairing of Chambers at Sanjay Nagar Single Line in Prabhag No. 13 | 829890 | 8300 |
| 28 | Pro. & Laying Sewer line & C.C. Flooring at Ajay Nagar in Prabhag No. 13 | 827917 | 8300 |
| 29 | Const. of Toilet Block at Sanjay Nagar Single line in Prabhag No. 13 | 829382 | 8300 |
| 30 | Pro & Laying Sewer line & C.C. Flooring at Mariyam Nagar in Prabhag No. 14 | 828361 | 8300 |
| 31 | Pro. & Laying Sewer line & C.C. Flooring at Hiltop Vasti in Prabhag No. 13 | 827401 | 8300 |
| 32 | Const of C.C. Road at Near H/o Shegaonkar Bhivsenkhori in prabhag No. 13 | 830577 | 8400 |
| 33 | Const of C.C. Road at Near H/o Tandekar Bhivsenkhori in prabhag No. 13 | 831448 | 8400 |
| 34 | Const. of C.C. road at Near H/o Raut Bhivsenkhori in Prabhag No. 13 | 832081 | 8400 |
| 35 | Const of Cement concrete road Near H/o Jambhaulkar Chitaman Nagar Bhivsenkhori In prabhag No. 13 | 830446 | 8400 |
| 36 | Pro. & Laying Swer line at Futala Vasti in Prabhag No. 13 | 827882 | 8300 |
| 37 | Const. of C.C flooring at Sanjay Nagar in Prabhag No. 13 | 829040 | 8300 |
| 38 | Const. of C.C. road at Near H/o Sakhare Bhivsenkhori in Prabhag No. 13 | 832216 | 8400 |
| 39 | Pro. & Laying Sewer line at Near H/o Mahatma Fule Nagar in Prabhag No. 13 | 827474 | 8300 |
| 40 | Conct. Of Toilet block at Pandhrabodi in Prabhag No. 13 | 829168 | 8300 |

**Note :- 1)** Cost of Blank Tender Form each Rs. 590/- **2)** Tender sale & submission start date : 23/09/2024. **3)** Tender submission and date/sales end date 30/09/2024. up to 5.00 pm. **4)** Date of opening of Tender (if possible) 01/10/2024 up to 5.00 pm. **5)** Eligibility criteria and mode of Submission shall be as stated in tender document.

**Executive Engineer (DPDC)**
**Nagpur Municipal Corporation**

**Advt No. 514 PR Date 23.09.2024**

# भेटीचे 'राज' कारण!

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे विधानसभेची निवडणूक स्वबळावर लढवणार की महायुतीत सहभागी होवून काही जागा पदरात पाडून घेणार? महायुतीचे सर्व घटक पक्ष त्यांना सामावून घेण्यास तयार आहेत का? तसे झाल्यास जागा वाटपात घटक पक्षांच्या जागा कमी होणार.. राज ठाकरे यांना महायुतीत सामिल करून न घेता महाविकास आघाडीच्या उमेदवारांची मते कापण्यासाठी त्यांना महायुतीकडून मदत केली जाईल की काय? अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. अशातच राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्याने पुन्हा एकदा राजकीय चर्चांचे गुऱ्हाळ सुरू झाले आहे.

-----------------



राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची यांच्या वर्षा या निवासस्थानी भेट घेतली. राज ठाकरे यांच्या भेटी मागचे नेमके कारण अद्याप समोर आले नाही. मात्र आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज यांच्या या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. वास्तविक पाकिस्तानी कलाकार फवाद खान या अभिनेत्याचा नवा सिनेमा भारतात प्रदर्शीत होणार आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या सिनेमाला विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर देखील राज यांच्या भेटीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीची तयारी सर्वच राजकीय पक्षांनी सुरू केली आहे. त्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सर्वाधिक आघाडी घेतली आहे. मनसेने आपल्या काही उमेदवारांची नावे जाहीर करायला देखील सुरुवात केली आहे.

विधानसभेला 200 पेक्षा जास्त जागा लागणार असल्याची घोषणा राज ठाकरे यांनी आधीच केली आहे. वास्तविक लोकसभा निवडणुकीनंतर मनसे महायुतीचा एक भाग होईल आणि राज्यातील निवडणुका लढवेल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र राज ठाकरे यांनी महाराष्ट्राचा दौरा करत आपल्या काही उमेदवारांची नावे देखील जाहीर केली आहेत.

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी देखील 3 ऑगस्ट रोजी मनसे प्रमुख राज ठाकरे मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी पोहोचले होते. तेव्हा या दोन नेत्यांमध्ये बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प, पोलिस वसाहतींचा पुनर्विकास, घरांची उपलब्धता या विषयांवर चर्चा झाली असल्याची माहिती देण्यात आली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा राज ठाकरे एकनाथ शिंदे यांच्या भेटीसाठी पोहोचले आहेत.

**वरळी मतदारसंघासाठी विशेष मोहीम**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी कालच मुंबईतील वरळी विधानसभा मतदारसंघाचा दौरा केला होता. त्याआधी वरळी विधानसभा मतदारसंघासाठी मनसेच्या वतीने विशेष मोहीम राबवण्याची घोषणा करण्यात आली.

मनसे विधानसभा निवडणूकीत या मतदार संघातून संदीप देशपांडे यांना उमेदवारी देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. वास्तविक या मतदार संघातून उद्धव ठाकरे यांचे पुत्र आदित्य ठाकरे हे आमदार आहेत. त्यामुळे सध्या या मतदारसंघाबाबत चांगलीच चर्चा रंगली आहे.

**शिंदे गटात घमासान**

मला मंत्रिपद मिळत असताना एका आमदाराने राजीनामा देण्याची धमकी दिली होती, असा गौप्यस्फोट एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेतील आमदार भरत गोगावले यांनी केला आहे. आता हा रोख नेमका कोणाकडे आहे यावर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. आमदार भरत गोगावले यांचा हा अप्रत्यक्ष रोख आमदार संजय शिरसाट यांच्यावर असल्याचे बोलले जात आहे. यावर संजय शिरसाट यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

अंबरनाथ येथे आमदार बालाजी किणीकर यांनी एका मेळाव्याचे आयोजन केले होते. यावेळी बोलताना भरत गोगावले म्हणाले, मला मंत्रिपद देण्याची वेळ आली, तेव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विचारले की शेठ काय करायचे? तेव्हा एकजण म्हणाला, तुम्ही मंत्रिपदाची शपथ घेतली की मी 12 वाजता राजीनामा देतो. म्हणून मुख्यमंत्री शिंदे यांनी त्यांना सिडकोचे अध्यक्ष केले.

दरम्यान, आता शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाठ यांना सिडकोचे अध्यक्षपद देण्यात आले आहे. त्यामुळे भरत गोगावले यांचा हा रोख संजय शिरसाठ यांच्याकडेच होता का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

पुढे बोलताना भरत गोगावले म्हणाले, नंतर एकजण म्हणाला मला मंत्रिपद नाही भेटले तर माझी बायको आत्महत्या करेल. त्याला बोललो आमच्या बायकांनी काय करायचे? असे गोगावले यांनी यावेळी हा प्रसंग सांगितला. सध्या आमदार भरत गोगावले यांची एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी वर्णी लावण्यात आली आहे. परंतु, शिंदे गटात कमालीची नाराजी पसरील असल्याचे अनेक घटनांरून दिसून येते.

●●●●●●●●●

# खारे पाणी प्यायल्याने किडनी खराब

केंद्रीय भूजल प्राधिकरणाच्या अहवालानुसार दिल्लीच्या भूजलात क्षाराचे प्रमाण सामान्यपेक्षा जास्त आहे. विश्लेषण केलेल्या नमुन्यांमध्ये 25% पेक्षा जास्त नमुन्यांमधील पाणी खारट असल्याचे आढळून आले. या बाबतीत, राजस्थाननंतर दिल्ली दुसऱ्या क्रमांकावर आहे, तेथील 30% नमुन्यांमध्ये खारट पाणी आहे.

साहजिकच लोक हे पाणी पिण्यासाठी आणि स्वयंपाकासाठी वापरतात. याचा अर्थ दिल्ली आणि राजस्थानच्या या भागात राहणारे लोक आवश्यकतेपेक्षा जास्त मीठ वापरत आहेत.

ही स्थिती केवळ दिल्ली आणि राजस्थानमध्ये नाही. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशननुसार, जगातील जवळजवळ प्रत्येकजण दररोज आवश्यक असलेल्या दुप्पट मीठ वापरत आहे. दरवर्षी सुमारे 19 लाख लोक जास्त मिठाच्या सेवनामुळे होणाऱ्या आजारांमुळे मरतात.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, निरोगी व्यक्तीने दररोज 5 ग्रॅमपेक्षा कमी मीठ (2000 मिलीग्रॅम सोडियमपेक्षा कमी) वापरावे. तर जगभरातील जवळजवळ प्रत्येकजण दररोज 10 ग्रॅमपेक्षा जास्त मीठ खातो.जवळपास संपूर्ण जगभरात लोक निश्चित केलेल्या मानकांपेक्षा अधिक मीठ खात आहेत.एका निरोगी व्यक्तीला दररोज 2000 मिलीग्रॅमपेक्षा कमी मीठाचे सेवन करायला हवे. म्हणजेच दररोज 5 ग्रॅम मीठ सेवन केले पाहिजे.मात्र, दररोज सरासरी 4310 मिलीग्रॅम मीठाचे सेवन करत आहेत.म्हणजेच लोक दररोज सरासरी 10 ग्रॅम मीठ सेवन करत आहेत.



इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च नुसार, भारतातील एक प्रौढ व्यक्ती सरासरी 8 ग्रॅम मीठ वापरत आहे, जे हूहुड ने ठरवलेल्या मानकांपेक्षा 3 ग्रॅम जास्त आहे. यामुळे आपल्या आरोग्याला हानी पोहोचत आहे.

चिमूटभर मीठ आपल्या जेवणाची चव बदलते. थोडे जास्त मीठ अन्नाची चव खराब करू शकते. हे मीठ आरोग्याची चवही बिघडवत असल्याचे जागतिक आरोग्य संघटना सांगत आहे.

जास्त मीठ खाल्ल्याने उच्च रक्तदाब होऊ शकतो. यामुळे हृदयविकार, गॅस्ट्रिक कॅन्सर आणि किडनीच्या आजाराचाही धोका संभवतो. हे सर्व आजार मृत्यूला आमंत्रण देतात.

जगभरात दरवर्षी 18.9 लाख मृत्यू हे मीठाचे अधिक सेवन केल्याने होत आहेत.मानकांपेक्षा अधिक मीठ खाल्लयाने होणारे आजार हे मृत्यूचे मुख्य कारण आहेत.यामुळे हायपरटेंशन, हृदयरोग, गॅस्ट्रिक कॅसर, लठ्ठपणा, ऑस्टियोपोरोसिस आणि किडनीचे आजार यांचा धोका वाढतो जास्त मीठ हृदय आणि मूत्रपिंडाचा शत्रू आहे

जास्त मीठ खाल्ल्याने आपल्या रक्तातील सोडियमचे प्रमाण वाढते. ते पातळ करण्यासाठी शरीराला जास्त पाणी लागते. जास्त पाणी प्यायल्याने रक्ताचे प्रमाण वाढते. त्यामुळे रक्तवाहिन्या आणि हृदयावर दबाव वाढतो.

आपल्या शरीराला माहित आहे की अतिरिक्त मीठ शरीरासाठी हानिकारक आहे. त्यामुळे, मूत्रपिंड समतोल राखण्यासाठी लगेच फिल्टर करणे सुरू करते. या कामात त्याला जास्त मेहनत करावी लागते. मिठाचे प्रमाण दुप्पट केले म्हणजे त्याचे कामही दुप्पट होते. जेव्हा मूत्रपिंड काम करताना थकतात तेव्हा ते रक्तात मीठ सोडतात.

त्यामुळे रक्ताचे प्रमाण वाढते. रक्तदाब वाढतो. या स्थितीत हृदयाला पंपिंगसाठी अधिक मेहनत घ्यावी लागते. परिणामी, हृदयविकार आणि पक्षाघाताचा धोका वाढतो.यामुळे किडनी स्टोन होऊ शकतो आणि किडनीच्या आजाराचा धोकाही वाढतो.

**जास्त मीठ खाल्ल्याने काय होते?**

मीठाला डायल्यूट करण्यासाठी जास्त तहान लागते.एक्स्ट्राच्या मीठाला फिल्टर करण्यासाठी किडनीला अधिक कार्य करावे लागते.यामुळे रक्तदाब आणि वॉल्युम वाढतो.

याकरिता हृदयाला पंपिंगसाठी अधिक मेहनत घ्यावी लागते.हृदयरोग, स्ट्रोक, किडनीचे आजार, किडनी स्टोनच्या समस्या जाणवतात.एका ठराविक वेळेनंतर किडनी मीठाला फिल्टर करता करता थकून जाते. त्यावेळी रक्तात मीठाची मात्रा वाढण्यास सुरुवात होते.

निसर्गोपचार अर्थात नैसर्गिक औषधानुसार आपले संपूर्ण अन्न वनस्पतींमधून आले पाहिजे. तर आपण जे मीठ अन्नात वापरत आहोत ते वनस्पतींमधून येत नाही. चांगल्या आरोग्यासाठी मीठ खाणे बंद करावे लागेल किंवा कमी खावे लागेल.

**अन्नातील मीठ कमी करणे महत्वाचे आहे**

आपल्या जेवणात मीठ किती आहे याबद्दल आपण सतत बोलत असतो. अशा स्थितीत तुमच्या मनात हा प्रश्न येत असेल की खात असताना मिठाचे प्रमाण जास्त असेल असे वाटत नाही. याचे कारण असे की आपल्या चवीच्या कळ्या लहानपणापासूनच जास्त मीठयुक्त आहाराने विकसित झाल्या आहेत. म्हणूनच ते आम्हाला सामान्य वाटते. तर ते शरीराला आवश्यकतेपेक्षा जास्त आहे आणि सतत आपले नुकसान करत आहे.

रोजच्या आहारात मिठाचा वापर हळूहळू कमी केला तर चवीत फारसा फरक पडणार नाही. वेफर्स, केचप आणि सॉसमध्ये अन्नापेक्षा जास्त मीठ असते. याशिवाय फास्ट फूडमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त मीठ असते. म्हणून, सर्व प्रथम त्यांना टाळणे महत्वाचे आहे.

●●●●●●●●●

# म. जोतिबा फुलेंचा सत्यशोधक समाज!

सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी बहुजनांचे कैवारी महात्मा जोतिबा फुले यांनी घटना बनविली. तद्नुषंगाने नियमावली तयार केली. मूलतः सत्यशोधक समाज एक निर्मिक, एक मानवता धर्म व एक मनुष्यजात मानणारा म्हणून स्थापन झाला. त्याची आचारसंहिता सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात दिली असून त्यात ढोबळ नियम सांगितले आहेत. त्यांनुसार समाजाच्या कार्यकारिणीत सुरूवातीस म. जोतीरावजी फुले हे चिटणीस आणि डॉ.विश्राम रामजी घोले हे अध्यक्ष होते.

-------------------

शिक्षणसम्राट महात्मा जोतिरावजी फुलेंनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. वर्षातून कार्यकारिणीच्या सर्वसाधारण चार सभा, लोकशाही पद्धतीने कार्यकारी मंडळाची निवड व बहुमताने निर्णय, अशी सर्वसाधारण सूत्रे होती. सुरूवातीस दर रविवारी डॉ. गावडे यांच्याकडे अनौपचारिकरीत्या मंडळी जमत. समाजापुढील प्रश्न, सोडवणुकीचे उपाय व सद्यःस्थिती यांविषयी चर्चा होत आणि दर पंधरा दिवसांतून एक व्याख्यान असा उपक्रम असे.



सत्यशोधक समाजातील व्यक्तींनी काही सूत्रे काटेकोरपणे पाळावीत, अशी भूमिका ठरली. त्या प्रतिज्ञा- १) ईश्वर- निर्मिक एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार व सत्यरूप आहे आणि सर्व माणसे त्याची लेकरे आहेत. या निर्मिकाशिवाय मी इतर कशाचीही पूजा करणार नाही. २) निर्मिकाची भक्ती करण्याचा पूर्ण अधिकार प्रत्येकाला आहे. त्यासाठी पुरोहित किंवा मध्यस्थाची आवश्यकता नाही. ३) माणूस जातीने श्रेष्ठ ठरत नसून कर्मगुणांनी श्रेष्ठ ठरतो. ४) निर्मिक सावयव रूपाने अवतरत नाही. ५) पुनर्जन्म, परलोक, मोक्ष, कर्मकांड, जपतप या गोष्टी अज्ञानमूलक आहेत. त्यांचा अवलंब माज्याकडून होणार नाही. ६) जनावरांना मारण्यात मी सहभागी होणार नाही. ७) दारूच्या व्यसनापासून अलिप्त राहण्याचे मी प्रयत्न करीन आणि ८) समाजाचा खर्च चालावा म्हणून मी माज्या उत्पन्नातून काही वर्गणी देईन.

"भटीण शुद्रांची करीना मजुरी।। काढणी न करी।। शेतामध्ये।।१।। शुद्रांचीया खळीं मजुरी करीना।। नखरा सोडीना।। जोती म्हणे।।४।।" (पवित्र अखंडादी काव्यरचनाः विभाग-६ - कुळंबीणः अखंड क्र.१२).

जमीनदार, शेटजी व पुरोहितांकडून होणाऱ्या अन्याय, अत्याचारापासून, गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना हक्काची जाणीव करून देणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. "निर्मिकाचा धर्म सत्य आहे एक! भांडणे अनेक कशासाठी?" हा विचार म.फुले यांनी मांडला. देवाविषयी किंवा निसर्गाविषयी निर्मिक हा शब्द वापरला, त्यावरुन सत्यशोधक समाज अर्थातच म.जोतिबा फुले आस्तिक होते, हे स्पष्ट होते.

त्यांनी कनिष्ठ वर्गातील लोकांसाठी गुलामगिरी हा उपदेशपर ग्रंथ लिहिला. त्यानंतर महाराष्ट्रात पंतोजी व शेटजींच्या मानसिक गुलामगिरीतून कनिष्ठ वर्गाला मुक्त करण्यासाठी चळवळ सुरू करण्याचा निर्धार केला. महात्मा जोतिबा फुले हे क्रांतिकारी नेते असल्याने त्यांच्या वृत्तीशी सुसंगत व धोरणाला पोषक असे तत्त्वज्ञान तथा व्यासपीठ निर्माण करणे, त्यांना अत्यंत गरजेचे वाटले. यातूनच सत्यशोधक समाजाची निर्मिती झाली.

सत्यशोधक समाजाचे तत्त्वज्ञान मानताना एकेश्वरवाद, ईश्वरभक्ती, व्यक्तीचे श्रेष्ठत्व त्याचप्रमाणे ग्रंथप्रामाण्याला विरोध असावा. सत्य हेच परम लक्ष्य व मानवी सद्गुणांची जोपासना करणे, अशाप्रकारे वैचारिक आणि प्राथमिक भूमिका घेऊन सत्यशोधक समाजाने आपले तत्वज्ञान मांडले.

ईश्वराची भक्ती ही निरपेक्ष भावनेने असावी. त्यामध्ये मध्यस्थाची अथवा बट भिक्षूची आवश्यकता नाही, याचे प्रतिपादन सत्यशोधक समाजाने केले.



कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे
रामनगर, गडचिरोली.
९४२३७१४८८३.

त्याचप्रमाणे व्यक्ती ही जन्माने श्रेष्ठ नसून ती गुणकर्मांने श्रेष्ठ ठरते. याचे स्पष्टीकरणही सत्यशोधक समाजाने दिले. पाप-पुण्य, स्वर्ग-नरक व पुनर्जन्म या गोष्टीला त्यांनी थारा दिला नाही. तर सत्य हेच परब्रह्म आहे, अशा प्रकारचा विचार सत्यशोधक समाजाने मांडला. मानवाच्या अंगी असलेल्या सद्गुणांची जोपासना व्हावी, हा विचार दृढ करण्याचा प्रयत्न सत्यशोधक समाजाने केला.

"काया पुरती लंगोटी। फिरती नांगराचे पाठी।।१।। एका घोंगड्यावांचूनी। स्त्रियां नसे दुजे शयनी।।२।। ढोरांमागे सर्वकाळ। पोरें फिरती रानोमाळ।।३।। ताक कण्या पोटभरी। धन्य म्हणे तो संसारी।।४।।"
(पवित्र म.फुले समग्र वाङ्मयः गुलामगिरीः अभंग १ला).

सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो तो हा- सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथामध्ये म.फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या विचारांना प्रस्तूत केले आहे. मानवता धर्माची शिकवण सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला गेला. सामाजिक परिवर्तनाची दिशा ठरवताना सत्यशोधक समाजाने समाजातील दीनदलित उपेक्षीत समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचा प्रयत्न केला.

सत्यशोधक समाजातर्फे 'दीनबंधू' नावाचे एक साप्ताहिक मुखपत्र म्हणून चालविले जात असे. या वृत्तपत्राचे संपादक कृष्णराव भालेराव हे होते. त्यांनी १ जानेवारी १८७७ मध्ये पुणे येथे स्थापन केले होते. हे वृत्तपत्र मराठी भाषेत होते. लोकशिक्षण व लोकजागृती प्रभावी माध्यम म्हणून दिनबंधुचा उल्लेख करावा लागतो.

"सर्वसाक्षी जगत्पती। त्याला नकोच मध्यस्ती॥" हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरी विरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. सत्यशोधक समाजातर्फे आवश्यक सुधारणा अशी करण्यात आली,पुरोहिताशिवाय विवाह लावण्यास सुरुवात केली.

त्यासाठी मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्यशोधक समाजाचे मुंबई शाखेचे अध्यक्ष नारायण मेघाजी लोखंडे हे होते. १८९०मध्ये यांनी दिनबंधु या वृत्तपत्राचे संपादन आणि मुद्रण मुंबई येथून केले.

"पोटीं बाळगून जन्म त्यास दिला।। पाजीला पोशीला।। माऊलीनें।।१।। आर्यपाखंडानें माते कष्ट देती।। अधोगती जाती।। जोती म्हणे।।४।।"
(पवित्र अखंडादी काव्यरचनाः
विभाग-१ - मानवी स्त्रीपुरुषः काव्य क्र.१६)

कमीअधिक प्रमाणात सत्यशोधक चळवळ झपाट्याने, काही वेळा मंदपणे फोफावत असली, तरी सत्यशोधक समाजाच्या वतीने तिच्या ध्येय-उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठीच चळवळीचे हे महायान सुरू होते. लोकजागरण, लोकप्रबोधन, लोकसंघटन आणि नव समाजनिर्मिती या सत्यशोधक समाजाच्या ध्येयसिद्धीसाठी हा सारा खटाटोप व उभा प्रयास होता.

१८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची म.फुले यांनी स्थापना केली, मात्र समाज अधिवेशनांची सुरूवात सन १९११पासून झाली. तर सन २००७ पर्यंत सत्यशोधक समाजाची एकूण ३५ अधिवेशने संपन्न झाली.

पहिले अधिवेशन १७ एप्रिल १९११ रोजी पुणे येथे स्वामी रामय्या व्यंकय्या अय्यावरू यांच्या अध्यक्षतेने पार पडले. त्याच्या स्वागताध्यक्ष पदी गणपतराव बिरमल होते. पस्तीसावे अधिवेशन २२ डिसेंबर २००७ रोजी गेवराई जिल्हा बीड, मराठवाडा येथे डॉ. आ. ह.साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. मराठवाडा सार्वजनिक सभेचे अध्यक्ष पद्माकरराव मुळे यांनी स्वागताध्यक्ष पद भूषविले होते. !! समस्त बहुजन वर्गातील बंधुभगिनींना हार्दिक शुभेच्छा !!

●●●●●●●●●

# पुरूषप्रधान व्यवस्थेचे बळी

अमृता खंडेराव

पिढ्यानपिढ्या बाईचं शरीर हा गोपनीय दस्तावेज मानला गेला आहे. ते सात पडद्याआड ठेवलं तरच सुरक्षित राहील हा विचार आमच्या मनावर पक्का बिंबवला गेला आहे. ते असुरक्षित कुणापासून? तर पुरूषांपासून.

बाई पुरूषापासूनच असुरक्षित आहे पण तिचा रक्षणकर्ताही पुरूषच आहे असला दुतोंडी विचार समाजमनावर ठासून पुरूषप्रधान संस्कृतीने बाईचं जगणं गुंतागुंतीचं करून टाकलं."बाई ही क्षणाची पत्नी तर अनंतकाळची माता" हे सांगणाऱ्या विद्वानाने माता होण्यासाठी आधी ती अनंतकाळची मादी असते याकडे साफ दुर्लक्ष केलं आहे. मादीपणाला मातृत्वाचं नैसर्गिक वरदान आहे पण निसर्गनियमानुसार मातासुद्धा पूर्णवेळ मादीच असते हे सोयिस्करपणे टाळलं आहे.

स्नायूंचा बळकटपणा ही पुरूषाची तर स्नायूंचा लवचिकपणा ही स्त्रीची नैसर्गिक ताकद आहे. पुरूषांच्या शरीरापेक्षा स्त्रीच्या शरीराबद्दल अधिक कुतुहल असण्यामागे महत्वाचं कारण म्हणजे मातृत्व. एका सजीवाच्या शरीरातून त्याच्यासारख्याच दुसऱ्या सजीवाची निर्मिती होणं हा निसर्गाचा अद्भुत चमत्कार आहे. हा चमत्कार हेच स्त्रीदेहाबद्दलच्या कुतुहलाचं मूलभूत कारण असलं पाहिजे. प्रजानिर्मिती करणारा देह अधिकाधिक सुरक्षित ठेवण्यासाठी त्यावर बंधने आणली गेली असली पाहिजेत.

संस्कृत्या उगम पावल्या आणि नामशेष झाल्या. शास्त्रे प्रगत होत गेली पण पुरूषाला बाळ काही होऊ शकलं नाही. पुरूष अपत्याला जन्म देत असता तर कदाचित त्याचं शरीर झाकून ठेवण्याचा कल वाढला असता. जिथपर्यंत या गोष्टी निसर्गनियमांना अनुसरून घडत होत्या तिथपर्यंत सगळंच सुरळीत राहिलं असेल. परंतु स्त्रीदेहावर मालकीहक्क दाखविणारी पुरूषप्रधानता सुरू झाल्यानंतर यात विकृत्या शिरल्या असणार. स्वतःच्या मालकीची बाई तर माझीच परंतु दुसऱ्याची पण माझीच.

राणी पद्मिनीला खिलजीने आरशात पाहिले. तिला मिळविण्यासाठी युद्ध घडले. तिने जोहार केला. या घटनांनी समाजमनावर स्त्रीदेहाच्या पावित्र्याच्या कल्पनाच लादल्या नाहीत का? तिला देवी मानून निसगार्ने तिला दिलेल्या भुका मारल्या नाहीत का? पावित्र्याचं उदात्तीकरण किती तर तिने स्वतःचा देह नवऱ्याच्या चितेत उडी मारून जाळून घ्यावा इतकं. पत्नी मेल्यानंतर (किंवा जिवंत असतानादेखील) पतीने दुसऱ्या स्त्रीशी संबंध ठेवला तर त्याचं पावित्र्य नष्ट होत नाही. त्याची इज्जत जात नाही. आबरू जात नाही. पण पती मेल्यानंतर आपल्या देहाला परपुरूषाचा स्पर्श होऊ नये म्हणून तिने जाळूनच घ्यायचं.

या अतिरेकी पावित्र्याच्या मूर्ख कल्पनांमुळे किती भयंकर घटना घडत आल्यात. पंजाबमध्ये आज अंघोळीचे व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे 8 मुलींनी आत्महत्येचा प्रयत्न केला. हेच मुलांच्या अंघोळीचे व्हिडिओ असते तर त्यांनी जीव द्यायचा प्रयत्न केला असता का?

सांगा मुलींना तुमच्यावर अन्याय झाला किंवा तुमची फसवणूक झाली म्हणून तुमचं पावित्र्य भंग होत नाही. अब्रू जात नाही. काहीच होत नाही. तुम्ही या कालबाह्य विचारांच्या बाहेर पडा. तुमचा देह कुणी पाहिला म्हणजे आभाळ कोसळलं नाही. स्वतःच्या आरोग्याची आणि चारित्र्याची काळजी घ्या पण अन्याय झाला म्हणून जीव देऊ नका. पद्मिनीचा जोहार ही पावित्र्याची परिसीमा नसून तो पुरूषप्रधान व्यवस्थेचा बळी आहे. त्याचं अनुकरण करू नका.

धाडस द्या मुलींना. त्यांना उत्तम संस्कार देताना कणखर धाडस द्यायला विसरू नका. उद्या कुणीही मुलींचे कसलेही व्हिडिओ काढून व्हायरल करतील. त्यात तांत्रिक करामती वापरून मुलींचे चेहरे भरतील. मग काय जीव द्यायचा की काय मुलींनी.

सावध रहा, सुरक्षित रहायला शिका, अनावश्यक कारणाने अनोळखी ठिकाणी जाऊ नका. स्वातंत्र्याचा सावधानतेने आनंद घ्या आणि सुंदर आयुष्य जगा.पंजाबातल्या मुलींचे व्हिडिओ कुणी काढले? का काढले? त्याची कायदेशीर चौकशी होईलच. पण आपण त्या मुलींच्या पाठीशी उभं राहून त्यांना धीर दिला पाहिजे.

●●●●●●●●●

# भारतानेही सतर्क राहावे

इस्त्राईल आणि हमास यांच्या युद्धातील नवा अंक आता सुरू झाला आहे. दोन दिवसांपूर्वी या युद्धात नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आणि संपूर्ण जगात तंत्रज्ञानाचा उपयोग आणि दुरुपयोग यावर पुन्हा चर्चा होऊ लागली. दोन दिवसांपूर्वी लेबनॉन मध्ये एकाच वेळी हजारो पेजरचा स्फोट झाला. हा स्फोट ताजा असतानाच त्याच्या दुसऱ्या दिवशी लेबनॉनमध्येच हजारो वॉकिटॉकीचा स्फोट झाला. या स्फोटात हजारो हिजबुल्ला जखमी झाले तर काहींना जीव गमवावा लागला.

जगभर या स्फोटाची चर्चा सुरू झाली. हा स्फोट इस्त्राईलची गुप्तचर संघटना मोसादने घडवून आणला असा आरोप लेबनॉनने केला. पेजर सारख्या छोट्या उपकरणाचा संहारक शस्त्र म्हणून वापर करता येऊ शकतो असा विचारच कोणी केला नाही. वास्तविक पेजर हे सध्या कालबाह्य झालेले उपकरण आहे. १९९० साली आलेले हे उपकरण एकमेकांशी संपर्क करण्यासाठी वापरले जात असे. अर्थात यात फोन प्रमाणे बोलता येत नाही तर या उपकरणाद्वारे फक्त एकमेकांना छोटे टेक्स्ट मेसेज पाठवता येतात. भारतात हे उपकरण १९९५ साली आले मात्र म्हणावे तसे हे उपकरण यशस्वी ठरले नाही.

मोबाईल आल्यानंतर तर त्याचा वापरच संपला असे असतानाही कालबाह्य झालेले हे उपकरण हिजबुल्ला का वापरत होते असा प्रश्न पडला असे ल तर त्याचे उत्तर असे आहे की पेजर वापरकर्त्याचे लोकेशन ट्रेस करता येत नाही. केवळ मेसेज पाठवला जात असल्याने मेसेज दोघांशिवाय तिसऱ्याला दिसत नाही म्हणूनच हीजबुल्लाचे कमांडर हे उपकरण वापरत होते. हे उपकरण सुरक्षित आहे असा त्यांचा समज होता मात्र हा समज तेंव्हा खोटा ठरला जेंव्हा लेबनॉन मध्ये एका पाठोपाठ एक स्फोट झाले. लेबनॉन मध्ये ज्या पेजरचा स्फोट झाला त्या पेजरमध्ये अल्पप्रमाणात पेइटीएन स्फोटकांचा वापर करण्यात आला होता.

या पेजरमध्ये ज्या बॅटरया वापरण्यात आल्या होत्या त्या आयात करण्यात आल्या होत्या. याच बॅटर्यांमध्ये हे स्फोटके लपवले होते असे म्हंटले जाते. या स्फोटानंतर जगभर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. भारतातही आता तसाच प्रश्न विचारला जात आहे कारण भविष्यातील युद्ध हे अशाच तंत्रज्ञानाचा वापर करून लढले जाणार आहे. आज जे तंत्रज्ञान वापरून इस्त्राईलने हा हल्ला केला तेच तंत्रज्ञान जर अतिरेक्यांच्या हातात लागले तर जगभर हाहाकार उडेल.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

भारतात तर अब्जावधी लोक मोबाईल वापरतात. जगात सर्वात जास्त मोबाईल भारतीय नागरिक वपरतात. आज जर पेजर, वॉकीटॉकीचा वापर बॉम्ब म्हणून केला जातो तर भविष्यात मोबाईलही बॉम्ब होऊ शकतो. भारतात जे मोबाईल वापरण्यात येतात त्याची बॅटरी ही परदेशातून आयात केलेली असते.

भारतात वापरण्यात येत असलेल्या ९० टक्के मोबाईलच्या बॅटऱ्या या चीन, तैवान आणि हाँगकाँग येथून आपण आयात करतो केवळ मोबाईल किंवा मोबाईलची बॅटरीच नाही तर दररोज पाच लक्ष इलेक्ट्रॉनिक वस्तू आपण परदेशातून आयात करतो. भारतातील संबंधित अथॉरिटी देखील मान्य करेल की देशात आयात होणाऱ्या ९० टक्के उपकरणांची कोणतीही तपासणी होत नाही. मागील काही दिवसात जम्मू काश्मीरमध्ये अतिरेकी पुन्हा सक्रिय झाले आहेत. काश्मीरमध्ये घुसखोरी वाढली आहे. सीमेवर दहशतवादी कारवाया वाढल्या आहेत. गुप्तचर संस्थांच्या चौकशीतून हे निष्पन्न झाले आहे की अतिरेकी घुसखोरी करताना मोठ्या प्रमाणात मोबाईल ॲपचा वापर करत आहेत. या ॲप चा वापर गियारोहक पर्वतावर, डोंगरावर चडण्यासाठी करतात आता याच ॲपचा वापर करत अतिरेकी घुसखोरी करत आहेत.

तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करण्यात चीनचा हातखंडा आहे. उद्या लेबनॉन स्फोटात वापरण्यात आलेले तंत्रज्ञान अतिरेक्यांच्या हाताला लागले किंवा चीन सारखा देश त्याचा वापर शस्त्र म्हणून करू लागला तर तर काय होईल याचा विचारही करवत नाही म्हणूनच भारताने याबाबत दक्ष राहायला हवे. मोबाईल, टॅब्लेट, लॅपटॉप, स्मार्ट वॉच यासारख्या गॅझेट वापरा संदर्भात सरकारने गाईड लाईन निश्चित करण्यात करावी.

प्रत्येक नागरिकांना या बाबत प्रशिक्षण द्यावे. लेबनॉन मध्ये जे झाले ते भारतात होऊ नये यासाठी सरकारने आतापासूनच दक्ष राहून योग्य ती खबरदारी घ्यावी कारण युद्धाच्या या नव्या प्रकाराचा धोका भारताला अधिक आहे. भारताने लेबनॉन पासून धडा घ्यायला हवा.

●●●●●●●●●

## अशोकायन

### नदीचे मनोगत

कारखान्याचे दुषित पाणी
सोडता तुम्ही प्रवाहात
जलचर प्राण्यांचा त्यामुळे
होतोय ना मानवा घात . .

प्लास्टीक व घाणकचरा
माझ्या पात्रात टाकता
वाढत्या रोगराईला तुम्हीच
नाहीका कारणीभूत ठरता?

खर आहे माते, आम्ही
आहोत तुझे अपराधीच
शपथ घेते यापुढे नदीपात्र
प्रदुषित करणार नाही कधीच..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# हाडाचे शिक्षक!

**शिकवण्याची आवड शिक्षकाला कोणत्याही परिस्थितीमध्ये शिकवायला भाग पाडते. अशातच मध्य प्रदेशमधील दमोह जिल्ह्यातील लिधौरा गावातल्या माधव पटेल या शिक्षकाने तेथील लहान मुलांना शिक्षणाचे धडे देण्यास सुरूवात केली. येथील प्रत्येक चौकात मुले शिक्षण घेताना दिसतात. कोणत्याही गल्लीत प्रवेश केलात तर रस्त्याच्या शेवटी भिंतीवर गणित आणि विज्ञानाची सूत्रे लिहिलेली दिसतात. संपूर्ण गावच जणू क्लासरूम झाले आहे.**

मध्य प्रदेशमधील दमोह जिल्ह्यातील लिधौरा गावातल्या माधव पटेल या शिक्षकाने तेथील लहान मुलांना शिक्षणाचे धडे देण्यास सुरूवात केली. त्यांच्या या मेहनतीचे फळ म्हणून की काय पण शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रीय पुरस्काराने पुरस्कृत केलेल्या ५० शिक्षकांमध्ये त्यांचेही नाव आहे. ४० वर्षीय माधव दमोह जिल्ह्यातील सरकारी लिधौरा मिडल स्कूलमध्ये सहावी ते आठवीपर्यंतच्या मुलांना शिकवतात. कोविडच्या काळात मुलांना शाळेत जाता आले नाही, म्हणून माधव यांना मोहल्ला क्लासची कल्पना सुचली. यासाठी त्यांनी काही ज्येष्ठ विद्यार्थ्यांना जोडले आणि त्यांना आपापल्या परिसरातील मुलांना एकत्र करून शिकवण्यास सांगितले. त्यांच्या कल्पनेतूनच मुलांची शिकण्याची पोकळी भरून काढल्याचे संपूर्ण गावकरी सांगतात.



माधव सांगतात, 'मी मुलांच्या घराभोवती फळे बनवले, जेणेकरून मुले एकमेकांशी खेळतील तेव्हा फळ्याच्या मदतीने खेळतानाही काहीतरी वाचत राहतील. आम्ही त्यांच्या घरी जाऊ शकत नव्हतो, म्हणून आम्ही त्यांच्या आजूबाजूच्या लोकांना आमच्यासोबत जोडले. ते सांगतात, 'आम्ही प्रार्थना सभेत आठवड्यातून जास्तीत जास्त दिवस शाळेत येणाऱ्या मुलाचा सन्मान करू लागलो. यामुळे इतर मुलांमध्येही सकारात्मक विचार आला की, आपली नावेही फलकावर यायला हवीत. महिनाभरात सर्वाधिक वेळा शाळेत आलेल्या विद्यार्थ्यांच्या घरी आम्ही गेलो आणि त्यांचा संपूर्ण परिसरासमोर सत्कार केला. त्यामुळे इतर पालकांनी त्यातून प्रेरणा घेतली आणि आमच्या शाळेतील उपस्थिती वाढतच गेली.

'मुल फक्त सहा तास शाळेत राहते. त्यानंतर ते घरीच असते. अशा परिस्थितीत मुलांना शाळेशिवाय शिक्षणाची गरज आहे, असे मला वाटले. मी गावातील शाळा-कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांशी बोललो. त्यांना सांगितले की तुम्ही मोकळे असाल तेव्हा मुलांना शिकवण्यात थोडी मदत करा. ते सर्वांनी मान्य केले. पण संसाधनांचा प्रश्न होता. अशा स्थितीत मी गावातील काही ठिकाणे ओळखली जिथे बसायला जागा आहे. तेथील भिंतीवर ब्लॅकबोर्ड पेंट केले. माजी विद्यार्थ्यांना खडू-डस्टर दिले. त्यामुळे आता त्याला वेळ मिळेल तेव्हा तो जवळच्या मुलांना एकत्र करून शिकवतो, असेही ते सांगतात.

अचिव्हर

माधव यांना पालकांनाही मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घ्यायचे होते. त्यामुळे शाळेतील शिक्षक पालकांच्या घरी जाऊन त्यांना भेटायचे तेव्हा ते त्यांच्या मोटरसायकलवर लायब्ररीची पुस्तके घेऊन जायचे. आई-वडिलांपर्यंत पोहोचताच ते पुस्तकं पाहू लागले. यातून त्यांना शाळेच्या ग्रंथालयात कोणत्या प्रकारची पुस्तके आहेत हे कळू लागले. ही पुस्तके आमच्या लायब्ररीतील मुलेही वाचतात, असे शिक्षकांनी पालकांना सांगितल्यावर पालकांनी पुन्हा मुलांना 'पाणी की खोज' हे पुस्तक वाचले आहे का, त्यात काय लिहिले आहे, कथा काय आहे, असे विचारण्यास सुरुवात केली. यानंतर मुलांमध्ये पुस्तके वाचण्याची उत्सुकता वाढू लागली. अशाप्रकारे, प्रथमतः पालक वाचनालयात सामील झाले, दुसरे म्हणजे मुले कारणे सांगायची आणि नाखुश होती तीही पुस्तके वाचू लागली.

ते सांगतात, 'शाळेच्या आधी आणि शाळेनंतर एक तास देणे ही काही मोठी गोष्ट नाही. आमच्याकडे ४० मिनिटांचा कालावधी आहे. आपण २५-३० मिनिटे शिकवतो आणि नंतर मुलांकडून फीडबॅक घेतो. त्यामुळे आपण दररोज पाच ते दहा मिनिटांनी शिकवण्याची वेळ वाढवली तर आपण मुलांना चांगल्या पद्धतीने शिकवू शकतो. कुठेतरी इच्छाशक्तीचा मुद्दा आहे. आपण समर्पणासाठी तयार असलो की अतिरिक्त कामाचा त्रास होत नाही, असे माधव सांगतात.




## शेर की जुबानी

मंजिल का नाराज होना भी
जायज था।
हम भी तो अजनबी राहों से
दिल लगा बैठे थे।

तुम नजर नहीं आते तो
आजकल शाम नहीं ढलती।
बस उदास सा है सबकुछ,
दिल से दिल की बात नहीं निकलती।

मन का कोई कोना अंधेरे में ना रहे,
एक चिराग भीतर भी जलाओ यारों।

## ॲप वर्ल्ड

### चॅट जीपीटीच्या मदतीने शोधा नोकरी!




आता नवीन नोकरी मिळवण्यासाठी चॅटजीपीटी मदत करणार आहे. चॅटजीपीटीच्या मदतीने तुम्ही आकर्षक आणि मुद्देसूद रिझ्यूम तयार करु शकता. यासाठी तुमच्या क्षेत्रातील कौशल्य आणि अनुभव याची माहिती चॅटजीपीटीला द्यावी लागेल. तसेच चॅटजीपीटीच्या मदतीने तुम्ही मुलाखतीची तयारी करु शकता. तुमच्या क्षेत्रात नेमके कोणते प्रश्न सर्वाधिक विचारण्यात येतात, याची उजळणी होईल. चॅटजीपीटी तुम्हाला लिंक्डइन प्रोफाईल, फेसबुक प्रोफाईल कसे आकर्षक आणि मुद्देसुद करायचे याची माहिती देईल. करियरबाबत अजूनही साशंक असाल, संभ्रम असेल तर चॅटजीपीटी तुम्हाला योग्य सल्ला देण्यास मदत करेल. तुमच्या अनुभवावरुन तुम्ही काय करायचे याची माहिती देईल.

## स्मार्ट शॉपिंग

### स्मार्टफोन घेताय?

दसरा, दिवाळीच्या निमित्ताने बरेच जण स्मार्टफोन खरेदी करतात. नवा फोन खरेदी करताना काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. सर्वात आधी तुमचं बजेट ठरवा. तुमची नेमकी गरज ओळखा. फोनमधली ऑपरेटिंग सिस्टिम तपासून घ्या. जुनी ओएस सिस्टिम असली तरी त्यात अपडेटची सोय असल्याची खात्री करून घ्या. फोन मेमरी ही सुद्धा महत्त्वाची बाब आहे. आज आपण बरीच ॲप्स डाउनलोड करतो. त्यामुळे जास्त मेमरीवाला फोन घ्या. फोनच्या कॅमेऱ्याचा दर्जाही तपासा.



## व्हॉट्स न्यू?


### जिओने वाढवलं ॲपल, गुगलचं टेन्शन!



रिलायन्स जिओ आता आपल्या ग्राहकांना १०० जीबी क्लाउड स्टोरेज मोफत देणार आहे. त्यामुळेच गुगल वन आणि आय क्लाऊडच्या वर्चस्वाला अंबानी यांनी थेट आव्हान दिले आहे. गुगल वनमध्ये १०० जीबी स्टोरेज खरेदी करण्यासाठी १३० रुपये द्यावे लागतात, तर आय क्लाऊडमध्ये ५० जीबीसाठी ७५ रुपये द्यावे लागतात. असं असताना मुकेश अंबानी यांनी क्लाउड सेवा सुरू करण्याची घोषणा केल्याने हा त्यांचा मास्टरस्ट्रोक असल्याचं म्हटले जात आहे. जिओ आपल्या ग्राहकांना दिवाळीपासून ही खास ऑफर देणार आहे.

## वेब वर्ल्ड

### ज्ञानाचं भांडार




दोस्तांनो, यू ट्यूबवर माहितीचा खजिना असतो. इथे विविध चॅनेल्स असतात. यापैकी काही चॅनेल्स बघून तुम्ही तुमचं ज्ञान वाढवू शकता. 'अ सॅप सायन्स' या चॅनेलवर विज्ञानविषयक माहिती मिळेल. 'मिंटफिजिक्स' हे चॅनेल फिजिक्सविषयक माहिती देतं. गिटार शिकायची असेल तर 'जस्टीन गिटार' हे चॅनेल फॉलो करा. फोटोग्राफीशी संबंधित माहिती हवी असेल तर 'पीटर मॅकिनॉन' चॅनेल बघा.


# ...अन्यथा लवकर म्हातारे व्हाल

दोस्तांनो, व्यायामामुळे तुम्ही तंदुरुस्त होता. वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. सकाळी छान ताजंतवानं वाटतं. हे जरी खरं असलं तरी काही चुकांमुळे तुम्ही खूप लवकर म्हातारे दिसू लागता. व्यायाम करताना कोणत्या चुका होतात ? जाणून घेऊ.

✲ व्यायाम करताना शारीरिक स्थितीचा विचार करा. जीममध्ये व्यायाम करताना चुकीच्या पद्धतीने उभं राहिल्याने, वाकल्याने तुम्हाला त्रास होऊ शकतो. यामुळे पाठीच्या कण्याला बाक येतो. मग तुम्ही वाकून चालू लागता. हे टाळण्यासाठी व्यायाम करताना शरीराच्या स्थितीकडे लक्ष द्या. चुकीच्या शारीरिक स्थितीमुळे तुम्ही म्हातारे दिसू लागता.

✲ कार्डिओ हा खूप चांगला व्यायामप्रकार असला तरी त्याच्या अतिरेकाने शरीराचं नुकसान होऊ शकतं. विशिष्ट वयानंतर हाडं आणि स्नायूंना पुरेसा व्यायाम मिळाला नाही तर त्यांच्या कार्य मंदावतं. तसंच १८ ते ५० या वयोगटातल्या व्यक्तींनी वेट लिफ्टिंग आणि स्ट्रेंथ ट्रेनिंग करावं, असं एक संशोधन सांगतं. स्ट्रेंथ ट्रेनिंगमुळे

फिटनेस फंडा



स्नायूंना बळकटी मिळते. शिवाय कॅलरीही खर्च होतात.

✲'हाय इंटेसिटी इंटरवल ट्रेनिंग' गरजेचं आहे. या व्यायामामुळे वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. शारीरिक क्षमताही वाढते. या सगळ्यामुळे आपण बराच काळ तरुण रहातो.


✲ शरीर ताणण्याच्या व्यायामाकडे दुर्लक्ष करू नये. व्यायामाआधी आणि नंतर शरीर ताणायला हवं. शरीर ताणण्याचे व्यायाम केले नाहीत तर स्नायू आणि त्यातल्या टिश्यूंवर अकारण ताण येतो. तसंच या व्यायामामुळे शरीर लवचिक होतं आणि व्यायाम करताना त्रास होत नाही.

✲ सतत जीममध्ये व्यायाम करत राहिल्याने आपण तंदुरुस्त राहू हा समज चुकीचा आहे. व्यायामाप्रमाणेच शरीराला विश्रांतीचीही गरज असते. स्नायूंची झीज भरून काढण्यासाठी शरीराला वेळ देणं गरजेचं आहे. त्यामुळे एखादा दिवस विश्रांती घ्या.

# आईसोबत खटके उडतात!

गेल्या दोन वर्षांपासून मी एका मुलीच्या प्रेमात आहे. आम्ही दोघं सध्या पीएचडी करत असून वर्षभरापासून लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये आहोत. माझ्या आईला आमचं असं 'लिव्ह इन' मध्ये रहाणं पसंत नाही. माझे तिच्यासोबत खटके उडतात. मी तीन वर्षांचा असताना माझ्या पालकांचा घटस्फोट झाला. त्यानंतर तिनेच मला वाढवलं. सध्या मी शिकतोय. त्यामुळे माझ्या शिक्षणाचा खर्च तीच उचलते आहे. पण मी लिव्ह इनमध्ये रहायला सुरूवात केल्यापासून ती सारखी माझ्यावर चिडते. दुसरीकडे माझी मैत्रीणही विचित्रच आहे. आम्ही काही काळ आमच्या कुटुंबासोबत राहून आलो की आमच्यात मतभेद होतात. त्यातच माझी मैत्रीण खूप रागीट आहे. ती नेहमीच माझ्यावर हक्क गाजवण्याचा प्रयत्न करते. आई आणि मैत्रीण यांच्यामध्ये मी अडकून पडलोय. मला नैराश्य आलंय आणि काय करावं ते कळत नाही. मला मार्गदर्शन करा.

मॅच मेकिंग



**उत्तर** : 'लिव्ह इन रिलेशनशीप' ही पूर्णपणे आधुनिक संकल्पना आहे. 'लिव्ह इन' म्हटलं की भल्याभल्यांचे डोळे विस्फारतात. आधीच्या पिढीला तर ही बाब फारशी मान्य होणार नाही. तसंच ही संकल्पना आपल्या भारतीय संस्कृतीत बसत नाही. त्यामुळे तुझ्या आईला लिव्ह इन रिलेशनशीप ही संकल्पना मान्य नसणं अगदी स्वाभाविक आहे. पण तू आईचं मतपरिवर्तन करू शकतोस. या नात्याबद्दल तू तिला सांग. तुझ्या भविष्यातल्या योजनांची माहिती दे. आई आणि पत्नी/मैत्रीण यांना जोडणारा धागा तूच आहेस. दोघींच्या कलाने घेऊन त्यांना समजावून सांग. शेवटी प्रत्येकाला आपल्या पद्धतीने जगण्याचा अधिकार आहे. पण इतरांची मतंही ऐकून घे.

# कोकणातले रम्य समुद्रकिनारे

गोव्यातले समुद्रकिनारे सुंदर आहेतच. पर्यटकांना या समुद्रकिनाऱ्यांची भुरळ पडते. यासोबतच कोकणातले समुद्रकिनारेही पर्यटकांना आकर्षित करतात. कोकणातले गणपतीपुळे, दिवेआगार, तारकर्ली हे समुद्रकिनारे प्रसिद्ध आहेत. मात्र इथल्या ऑफ बीट समुद्रकिनाऱ्यांवर फिरताना वेगळीच गंमत अनुभवायला मिळते. खूप शांत आणि रम्य वाटतं. सुट्टीत या समुद्रकिनाऱ्यांची सैर करायला हरकत नाही. कोकणातल्या अशाच काही सुंदर समुद्रकिनाऱ्यांविषयी...

✲ रत्नागिरीपासून साधारण २०० किलोमीटर अंतरावर वेलास बीच आहे. हा बीच ऑलिव्ह रिडले कासवांसाठी प्रसिद्ध आहे.

✲ दापोलीपासून २० किलोमीटर अंतरावर अंजार्ले बीच आहे. या परिसरातला कड्याचा गणपती पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे.

✲ रत्नागिरीपासून ८० किलोमीटर अंतरावर वेलनेश्वर बीच आहे. इथून जवळच असणारा अंजनवले किल्ला पहायला लोक इथे येतात.

✲ वेंगुर्ल्यापासून ८० किलोमीटर अंतरावर कोंडुरा बीच आहे. इथे विविध प्रजातींचे समुद्रपक्षी पहायला मिळतात. बरेच समुद्रपक्षी स्थलांतर करून इथे येतात.

भटकंती

✲ अलिबागपासून २० किलोमीटर अंतरावर कोरलाई समुद्रकिनारा आहे. कोरलाई किल्ला आणि दीपगृह ही इथली आकर्षणं आहेत.

✲ दापोलीतला करडे बीच डॉल्फिन्ससाठी प्रसिद्ध आहे.

✲ देवगडपासून जवळ असणाऱ्या कुणकेश्वरच्या समुद्रकिनाऱ्यावरही आल्हाददायक वाटतं. इथलं कुणकेश्वराचं मंदिर प्रसिद्ध आहे.





# ई-कॉमर्स कंपन्या देतात संधी

सध्या ई कॉमर्स कंपन्यांचा बोलबाला आहे. 'ॲमेझॉन', 'फ्लिपकार्ट'सह, 'स्वीगी', 'झोमॅटो' या कंपन्यांनी कमी वेळात खूप जास्त प्रगती केली आहे. या कंपन्यांमध्ये तरुणाईला संधी दिली जाते. मॅनेजमेंट आणि इंजिनिअरींगची पदवी मिळवलेले विद्यार्थी अशा कंपन्यांपासून करिअरची सुरूवात करू शकतात. डेटा सायन्स, प्रोडक्ट मॅनेजमेंट, डिझाइन, आयओएस आणि अँड्रॉइडचा विकास करण्याच्या प्रक्रियेसाठी या कंपन्या कुशल तरुणांची निवड करत आहेत.

फ्लिपकार्टसारखी कंपनी येत्या काळात युवा पदवीधरांच्या भरतीत ४० ते ५० टक्क्यांची वाढ करणार आहे. देशातल्या आघाडीच्या आयआयएम तसंच इंजिनिअरींग संस्थांमधल्या युवा गुणवत्तेला संधी देण्याचा या कंपन्यांचा प्रयत्न असतो. इतकंच नाही तर या कंपन्या युवांना प्रशिक्षणही देतात.

वेगळ्या वाटा

ॲमेझॉनसारख्या कंपनीनेही भारतात आपलं जाळं पसरवलं आहे. या कंपनीला भारतात जबरदस्त प्रतिसाद मिळाला आहे. म्हणूनच ही कंपनी भारतीय तरुणांची नेमणूक करण्यावर भर देते आहे. बऱ्याच कंपन्यांचा चांगले तंत्रज्ञ हवे आहेत. सर्वच कंपन्या तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करतात. म्हणूनच या बदलत्या तंत्रज्ञानाचा अभ्यास करणारे जाणकार त्यांना हवे आहेत. म्हणूनच तरुणांनी आपली कौशल्यं वाढवण्यावर भर द्यायला हवा.



# मस्त साबुदाणा भेळ


दोस्तांनो, उपवासाला साबुदाण्याची खिचडी बनवली जाते. हा झटपट होणारा पदार्थ आहे. पण प्रत्येक वेळी साबुदाणा खिचडी खाऊन खूप कंटाळा येतो. उपवासाचे इतर पदार्थ वेळखाऊ असतात. अशावेळी झटपट होणारी साबुदाणा भेळ ट्राय करून बघा.



झटपट रेसिपी

**सामग्री:** अर्धा कप साबुदाणा, एक बटाटा, दाण्याचं कूट एक चमचा, थोडे काजू, एक चमचा लिंबाचा रस, सैंधव मीठ, दोन चमचे शेंगदाणा तेल, बटाट्याचा फराळी चिवडा, चिरलेली कोथिंबिर.

**कृती:** साबुदाणा धुवून दोन ते तीन तास भिजवून ठेवा. बटाट्याचे छोटे तुकडे करून घ्या. आता गॅसवर कढई ठेवा. त्यात तेल घाला. तेल थोडं गरम झाल्यावर त्यात बटाटे घालून सोनेरी रंगावर तळून घ्या. काजूचे तुकडे करून घ्या. आता कढईत काजूचे तुकडे आणि शेंगदाणे घालून तळून घ्या. बटाटे, काजू आणि शेंगदाणे एका भांड्यात काढून ठेवा. आता याच तेलात साबुदाणा परतून घ्या. आता हा साबुदाणा भांड्यात काढा. त्यात तळलेले बटाटे, काजू आणि शेंगदाणे घाला. चवीनुसार मीठ घाला. त्यात बटाट्याचा चिवडा घालून हलवून घ्या. वरून कोथिंबिर घाला. आता लिंबाचा रस घालून मिक्स करा. यात डाळिंबाचे दाणेही घालता येतील.



# टिकवा केसांची चमक

दोस्तांनो, तुम्हीही वेगवेगळ्या हेअरस्टाईल करत असाल. आपली हेअरस्टाईल चांगली दिसावी असं तुम्हालाही वाटत असेल. मात्र यासाठी केसांची काळजी घ्यायला हवी. केस छोटे असले म्हणून काय झालं त्यांच्याकडे लक्ष द्यायलाच हवं. केसांची चमक टिकून रहावी आणि कोणतीही हेअरस्टाईल चांगली दिसावी, यासाठी काय करता येईल याविषयी...

✲ बरीच मुलं रोज केस धुतात. काही मुलं केसांना साबण लावतात. पण असं केल्याने केसांमधलं नैसर्गिक तेल नष्ट होतं. केसांच्या मुळाशी असलेल्या तेलामुळे केसांमधला ओलावा टिकून रहातो. दररोज केस धुतल्याने हे तेल नष्ट होतं आणि केस कोरडे होतात. त्यामुळे आठवड्यातून तीन वेळा केस धुवा.

✲ केसांसाठी कोणताही शँपू वापरून चालणार नाही. नैसर्गिक घटकांनी युक्त शँपू वापरणं योग्य ठरतं. तुमचा शँपू सल्फेट आणि पॅराबेन फ्री असावा.

ग्रुमिंग

✲ कंडिशनरचा वापर टाळू नका. कंडिशनरमुळे केसांना ओलावा मिळतो. केस छान मुलायम होतात.

✲ आठवड्यातून एकदा केसांना तेल लावा. यामुळे केसांमधला ओलावा टिकून राहिल. कुरळे केस असणाऱ्या मुलांनी नियमित तेल लावायला हवं.

✲ आपण घाईगडबडीत जोरात केस पुसतो. यामुळे केस गळू लागतात. म्हणूनच हलक्या हातांनी केस पुसा.

✲ केसांना शँपू लाऊन भागणार नाही. स्कॅल्पलाही नीट शँपू लावा. यामुळे स्कॅल्पवरची धूळ, घाण निघून जाईल.

✲ केसांवर फार प्रयोग करू नका. विविध उत्पादनांचा मारा करू नका. जेल किंवा स्प्रे अगदी कमी प्रमाणात लावा.

## थोडक्यात..

### मनोज जरांगे यांना तिसऱ्या आघाडीत येण्याचे निमंत्रण



■ **जालना :** मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीचे काही बरेवाईट झाले तर त्याला सरकार जबाबदार असेल, असा इशारा स्वराज्य संघटनेचे नेते संभाजीराजे छत्रपती यांनी सोमवारी राज्य सरकारला दिला.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी आंतरवाली सराटीत उपोषण सुरू केले आहे. सोमवारी त्यांच्या आंदोलनाच्या 7 व्या दिवशी संभाजीराजे छत्रपती यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी बोलताना त्यांनी मनोज जरांगेंची प्रकृती ढासळल्याचे स्पष्ट केले. तसेच त्यांच्या प्रकृतीस काही अपाय झाला तर त्याला सर्वस्वी सरकार जबाबदार असेल असे ठणकावून सांगितले.

### सिनेट निवडणूका अराजकीय व्हाव्यात

■ **मुंबई :** विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत उध्दव ठाकरे यांच्या सेनेचे उमेदवार हे विद्यार्थ्यांपेक्षा मालकाचे हित जोपासणारे असून त्यांच्याकडून निवडणूक प्रक्रियेला हरताळ फसला जात आहे, असा जाहीर आरोप मुंबई भाजपा अध्यक्ष आ.अॅड.आशिष शेलार यांनी सोमवारी येथे पत्रकारांशी बोलताना केली.

ते पुढे म्हणाले की, सिनेटच्या उद्या हाऊ घातलेल्या निवडणूका अराजकीय व्हाव्यात अशी भाजपची इच्छा असून जे उमेदवार ठाकरे गटाने दिलेत ते विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी आहेत का ? सगळ्या निवडणुकीची राजकीय बोळवण केली आहे. बोगस मतदार नोंदणी झाली तेव्हा आम्ही आक्षेप घेतला होता.आधी नोंदवले गेलेले पदवीधर सेनेच्या शाखेतून निर्माण केलेले पदवीधर होते, असा आरोपही अॅड. शेलार यांनी केला.

# कर्मचारी संपामुळे राज्यावर वीज संकट?

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:** महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीने विविध मागण्यांसाठी २५ आणि २६ सप्टेंबरला संपाची घोषणा केली आहे. त्यावर महावितरण प्रशासनाने कृती समितीला चर्चेचे आमंत्रण दिले होते. परंतु, समितीने या मागण्या शासन स्तरावरच्या असल्याचे सांगत महावितरणच्या बैठकीस जाण्यास नकार दिला. सोबतच मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन होणारच, असा इशाराही दिला आहे.




महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समिती महावितरण प्रशासनाला दिलेल्या पत्रात सांगितले की, वीज कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर अनेक आंदोलने झाली. परंतु आश्वासनापलीकडे शासनासह महावितरण, महापारेषण, महानिर्मिती या तिन्ही वीज कंपन्यांकडून वीज कामगारांना काहीही मिळाले नाही.

या मागण्यांबाबत निर्णयाचे अधिकार शासनाला आहेत. शासनस्तरावर बैठक घेऊनच या मागण्यांवर निर्णय होऊ शकतो. या स्थितीत आपल्या (महावितरण) स्तरावर चर्चा करून योग्य निर्णय होणे शक्य नाही. त्यामुळे महावितरणकडून आयोजित बैठकीला कृती समितीकडून कोणीही उपस्थित राहणार नाही.

दरम्यान महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीकडून महावितरणला शासन स्तरावर सन्मानजनक निर्णय न झाल्यास, कृती समितीच्या वतीने बजावण्यात आलेल्या नोटीसनुसार राज्यभरात २५ आणि २६ सप्टेंबरला संप होणारच, हे स्पष्ट केले गेले. महावितरण प्रशासनाला पाठवलेल्या याबाबतच्या पत्रावर महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे सरचिटणीस कृष्णा भोयर, महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महामंत्री अरुण पिवळ, सबॉडीनेंट इंजिनिअर असोसिएशनचे सरचिटणीस संतोष खुमकर, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचे सरचिटणीस आर. टी. देवकांत, महाराष्ट्र राज्य वीज कामगार कामगार काँग्रेस (इंटक)चे मुख्य सरचिटणीस दत्तात्रेय गुट्टे, महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेचे सरचिटणीस हाजी सय्यद जहिरोद्दिन यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**कृती समितीच्या मागण्या काय?**

- वीज कर्मचारी, अभियंते, अधिकारी यांना निवृत्ती वेतन द्यावे.
- महानिर्मिती कंपनीच्या सध्या ताब्यात असणारे जल विद्युत केंद्राचे खासगीकरण थांबविणे.
- महापारेषण कंपनीतील २०० कोटी रुपयांच्या वरील प्रकल्प खासगी उद्योजकांना विकसीत करण्याचे धोरण रद्द करणे.
- स्मार्ट प्रीपेड मीटरबाबतच्या केंद्र सरकारच्या धोरणाला विरोध
- स्मार्ट प्रीपेड मीटरच्या राज्यातील अंमलबजावणीला विरोध
- कंत्राटी कर्मचाऱ्यांना समान काम समान वेतन द्यावे
- कंत्राटी कर्मचाऱ्यांना ६० वर्षापर्यंत रोजगाराची हमी देत टप्पा- टप्याने कायम करावे
- कृती समितीने शासनासह वीज कंपन्यांना दिलेल्या नोटीसमधील सगळ्याच मागण्या मान्य करणे.

## लाडकी बहीण योजना २९ ला तिसरा हप्ता

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:** महिलांना दर महिन्याला थेट लाभ हस्तांतरणाद्वारे दीड हजार रुपये मिळावेत यासाठी महाराष्ट्र सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना चालू केली आहे. या योनजेसाठी राज्यभरातील कोट्यवधी महिलांनी अर्ज भरले आहेत. आतापर्यंत दोन लाखांहून अधिक महिलांना या योजनेतील सन्मान निधी मिळाला आहे.

आता या योजनेचा तिसरा हप्ता महिलांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहे. या योजनेच्या तिसऱ्या हप्त्याचं वितरण येत्या २९ सप्टेंबर रोजी केलं जाणार आहे. महिला व बालविकास कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी याबाबतची माहिती दिली आहे. म्हणजेच येत्या २९ सप्टेंबर रोजी पात्र महिलांच्या (अर्जदार) खात्यावर लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये जमा होतील.

दरम्यान, ज्या महिलांनी लाडकी बहीण योजनेसाठीचा अर्ज अद्याप भरलेला नाही, त्या महिला अजूनही या योजनेसाठी अर्ज करून योजनेचा लाभ घेऊ शकतात. लाडकी बहीण योजनेत १५ ऑगस्टपर्यंत महिलांना अर्ज भरण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र, विविध तांत्रिक अडचणी आणि कागदपत्रांमधील घोळामुळे ही मुदत ३१ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली. परंतु, ३१ ऑगस्टपर्यंत देखील अनेक महिलांनी अर्ज भरता आले नाहीत. त्यामुळे ही मुदत आता ३० सप्टेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ महिलांना मिळावा, त्यांच्या सन्मान निधीचा वापर फक्त महिलांनी स्वतःकरता करावा त्यामुळे या योजनेसाठी वैयक्तिक स्वतंत्र खात्याचा नियम करण्यात आला आहे. त्यामुळे या योजनेसाठी जॉइंट अकाऊंटधारक महिला पात्र ठरणार नाहीत.

ऑगस्ट महिन्यात अर्ज भरलेल्या पात्र महिलांना जुलै, ऑगस्ट अशा दोन महिन्यांचे पैसे मिळाले होते. त्यामुळे सप्टेंबर महिन्यात अर्ज करणाऱ्या पात्र महिलांना तीन महिन्याचे पैसे एकत्रितपणे मिळू शकतात.

## जालन्यात सकल हिंदू समाजाच्या बंदला प्रतिसाद

■ **वृत्तसंस्था, जालना, दि. २३:** जालना शहरात आज सकल हिंदू समाजाच्यावतीन पुकारण्यात आलेल्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळला. जालना शहरात चार दिवसांपूर्वी ईद ए मिलाद निमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत घडलेल्या एका घटनेच्या निषेधार्थ आजचा हा बंद पुकारण्यात आला होता.

हिंदू व्यापाऱ्यांच्या दुकानांवर झालेल्या हल्ल्याच्या व वाढत्या गोहत्याच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्या वतीने सोमवारी जालना शहर बंदची हाक देण्यात आली होती. या वेळी विराट मूकमोर्चा काढण्या आला.

दरम्यान, जालना शहरातील भाजीपाला मार्केट, काही शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. सेंट मेरीज हायस्कूलमधील सहामाही परीक्षेचा आजचा पेपर देखील पुढे ढकलण्यात आला आहे.

दोन दिवसांपूर्वी जालन्यात एका धार्मिक कार्यक्रमाच्या रॅलीदरम्यान व्यापाऱ्यांच्या दुकानावर भांडण झाले होते. या प्रकारामुळे निषेध करून जालना बंदची हाक देण्यात आली होती.

## तापमान वाढ : आपात्कालीन भारनियमन

■ **वृत्तसंस्था, भुसावळ, दि. २३:** पितृपक्षात तापमान वाढीमुळे शेतीत वीजपंपांचा वापर वाढला, परिणामी कृषी क्षेत्रातून अचानक विजेची मागणी वाढली आहे.

यामुळे महावितरणने राज्यभरातील सर्व कृषी जोडणी तसेच घरगुती अर्थात गावठाण वापराच्या जी- १, जी- २ व जी-३ या वितरण ग्रुपवर चार दिवसांपासून (१९ सप्टेंबर) आपत्कालीन भारनियमन सुरू केले आहे. राज्याची वीज मागणी गेल्या आठवड्यात २२ हजार मेगावॅटवर होती. ती गुरुवारपासून २४ हजार ८०७ ते २५ हजार ५०० मेगावॅटपर्यंत पोहोचली. दुसरीकडे महानिर्मिती व खासगी वीजनिर्मिती केंद्रातून १६ हजार ५०० ते १७ हजार मेगावॅट विजेची निर्मिती होत आहे.

राज्यात जवळपास सात हजार मेगावॅटची तूट आहे. यंदा अधिक प्रमाणात पाऊस होऊनही केवळ आगामी काळात विधानसभा निवडणूक असल्याने ऊर्जा विभागाने ३१.११ दिवस पुरेल इतका २१ लाख मेट्रिक टन कोळसा साठा केला आहे. खाणींमधून दररोज कोळसा उपलब्ध होत असल्याने यंदा टंचाई निर्माण होणार नाही, असे यशवंत मोहिते यांनी सांगितले.

## : हॅलो डॉक्टर : स्मृतीभ्रंश आजार कारण, निदान आणि उपचार

लोकारोग्य

तुम्ही कधी असा विचार केला आहे का, कि एखाद्या दिवशी सकाळी उठल्यानंतर तुम्ही कोण आहेत? किंवा कुठे आहात? हेच तुम्हाला आठवत नाही. ठराविक वयानंतर आपल्या रोजच्या जीवनातील गोष्टींचे विस्मरण वारंवार होत असेल म्हणजेच आपल्याला स्मृतीभ्रंश आजार जडलेला आहे असे समजावे.

सातत्याने विस्मरण होणे हा स्मृतीभ्रंश जडलेल्या लोकांसाठी एक अस्वस्थ करणारा अनुभव असतो. अशी स्थिती जी आपल्या स्मरणशक्तीवरच परिणाम करते आणि त्यामुळेच आपल्या सामान्य जीवनात अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. मुळात स्मृतिभ्रंश हा आजार नेमका काय आहे? या आजाराची लक्षण आहेत का? आणि स्मृतिभ्रंश आजारावर उपचार काय आहेत? हेच जाणून घेण्यासाठी मेंदूविकार तज्ज्ञ डॉ. आशिष भल्ला यांच्याशी केलेली बातचीत.

**स्मृतीभ्रंश म्हणजे नेमकं काय?**

स्मृतिभ्रंश हि एक गंभीर स्थिती आहे ज्यामध्ये मानवाची स्मरणशक्ती ठराविक वयात अचानक कमी होते. एखाद्या गोष्टीचे तात्पुरत्या काळासाठी विस्मरण होणे म्हणजे सामान्य बाब आहे मात्र सातत्याने एखादे काम विसरणे, सतत वेगळेच काहीतरी करणे, म्हणजेच स्मृतिभ्रंश होय. असे लोक अगदी साध्यासाध्या गोष्टी देखील आठवू शकत नाहीत त्यासाठी त्यांना आपल्या मेंदूला प्रचंड ताण द्यावा लागतो. स्मृतिभ्रंश हा शब्द प्राचीन ग्रीक भाषेतून आलेला आहे. ज्याचा अर्थ विस्मरण आहे.

स्मृतिभ्रंशाची लक्षण काय असतात ? स्मृतिभ्रंशाचा एखाद्या व्यक्तीच्या स्मरण शक्तीवर खोलवर परिणाम होतो,



भूतकाळातील घटना आठवण्याच्या आणि नवीन आठवणी तयार करण्याच्या क्षमतेवर परिणाम होतो.

अगदी नावे आणि चेहरे आठवण्यात अडचण येणे, स्थाने लक्षात ठेवण्यास अडचण, नवीन माहिती शिकण्यास समस्या निर्माण होणे, मागील घटनांचे स्मरण न होणे, मेंदूमध्ये एकाच वेळी अनेक गोष्टीं आठवण्याचा संघर्ष घडला कि गोंधळाची परिस्थिती निर्माण होते आणि त्याचा मानसिकतेवर देखील परिणाम संभवतो.

**स्मृतिभ्रंशाची कारणं काय?**

स्मृतिभ्रंशाची विविध कारण आहेत जी प्रामुख्याने दोन मुख्य श्रेणीमध्ये मोडतात. न्यूरॉलॉजिकल कारण हा पहिला प्रकार आहे. यामध्ये मेंदूचे नुकसान किंवा स्मृती प्रक्रियेसाठी महत्वाच्या भागांना दुखापत झाल्यामुळे स्मृतिभ्रंश होऊ शकतो. व्हायरल इन्फेक्शन किंवा स्वयंप्रतिकार प्रतिक्रियेमुळे मेंदूचा दाह होणे, सेरेब्रल हायपोक्सीया म्हणजे मेंदूला ऑक्सिजनची कमतरता निर्माण होणे, अल्कोहोलचे अतिसेवन, मेंदूतील गाठ, अल्झायमर आजार, मस्तिष्क शस्त्रक्रिया, डोके दुखापत, पार्किन्सन्स आजार, कार्बन मोनाकसाइड सारखे धातू अशा कारणामुळे स्मृतिभ्रंश होऊ शकतो.

स्मृतिभ्रंशाच्या मानसिक कारणांमध्ये सामान्यतः क्लेशकारक घटना किंवा गंभीर मानसिक त्रास यांचा समावेश होतो यासह विघटनशील विकार आणि अपघातग्रस्त डिसऑर्डर ही कारण देखील असू शकतात.

**स्मृतिभ्रंश आजारावर उपचार पद्धती काय?**

स्मृतिभ्रंशावर कोणताही एकच इलाज नसला तरी विविध पद्धती व्यक्तीला त्यांची स्थिती व्यवस्थापित करण्यास आणि त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत करू शकतात.

सज्ञानात्मक पुनर्वसन पद्धतीमध्ये थेरपिस्ट रुग्णासोबत माहिती आयोजित करण्यासाठी धोरणात्मक प्रयत्न करतात ज्यामुळे स्मृती प्रशिक्षणामध्ये नवीन ज्ञान मिळविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. मेमरी एड्स अर्थात हायटेक आणि लो टेक मेमरी एड्स स्मृतिभ्रंश असलेल्या लोकांसाठी अमूल्य असू शकतात. स्मार्ट टेक्नॉलॉजी उपचार पद्धतीमध्ये स्मार्टफोन आणि टॅबलेट यांच्या आधारे स्मरणशक्ती जागृत करण्यासाठी प्रयत्न केले जातात. लो टेक एड्स म्हणजे वोल कॅलेंडर, पिलं माईंडर्स आणि लोक आणि ठिकाणाची छायाचित्र दैनंदिन काम आणि स्मरणशक्ती साठी मदत करू शकतात. कौटुंबिक समुपदेशन आणि काही विशिष्ट प्रकारची औषध याद्वारे उपचार होऊ शकतात.

### : वनौषधी : मोहरी खाण्याचे फायदे

मोहरी हे प्रत्येक भारतीय घरात आढळणारे मुख्य अन्न आहे, जे अनेक पदार्थांची चव वाढवण्यासाठी किंवा विविध प्रकारचे पदार्थ तयार करण्यासाठी वापरले जाते. मोहरी काळ्या, पांढर्या आणि हलक्या तपकिरी रंगात येतात. प्रत्येकाची चव वेगळी असते.

मोहरीच्या दाण्यामध्ये अनेक पोषक घटक असतात. या लहान बियांमध्ये भरपूर जीवनसत्त्वे असतात. ते कॅल्शियम, सेलेनियम, लोह, फॉस्फरस, मॅग्नेशियम आणि मॅंगनीज सारख्या खनिजांनी समृद्ध आहेत. याव्यतिरिक्त, त्यात बी जीवनसत्त्वे तसेच प्रथिने आणि फायबर असतात. मोहरीचे अनेक फायदे आहेत. त्यामध्ये फायटोन्यूट्रिएंट्स आणि अँटिऑक्सिडंट्स असतात जे तुमच्या शरीराला कर्करोगापासून वाचवतात. ते त्यांच्या आरोग्य फायद्यांसाठी ओळखले जातात कारण ते कमी कॅलरी आणि भरपूर पोषण आहेत. त्यात अनेक बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि जंतुनाशक गुणधर्म आहेत. मोहरीचे दाणे केवळ शरीरासाठीच नव्हे तर मनासाठी देखील फायदेशीर आहेत, जसे की स्नायू दुखणे, नागीण आणि श्वसन रोगांपासून आराम मिळतो आणि कर्करोग आणि मधुमेहाच्या उपचारांमध्ये देखील मदत होते.



### : आरोग्यनीती : आयुष्मान भारत योजनेत सरकारने केला मोठा बदल

जनतेला मोफत आरोग्य सेवा सुविधा मिळण्यासाठी मोदी सरकारने 2018 मध्ये आयुष्मान भारत योजना सुरू केली होती. आतापर्यंत योजनेतंर्गत 34 कोटींहून अधिक आयुष्मान कार्ड तयार करण्यात आले आहे. सरकारने आता या योजनेत मोठा बदल केला आहे.

आयुष्मान भारत योजना जनतेला मोफत आरोग्य सेवा-सुविधा देणारी योजना आहे. मोदी सरकारने 2018 मध्ये आयुष्मान भारत योजना सुरू केली होती. या योजनेत 5 लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य सुविधा मिळतात. सरकार प्रत्येक नागरिकामागे इतका खर्च करते. आतापर्यंत योजनेतंर्गत 34 कोटींहून अधिक आयुष्मान कार्ड तयार करण्यात आले आहे.

सरकारने कॅबिनेट बैठकीत 70 वर्षांवरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान योजनेत सहभागी करुन घेण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, आयुष्मान भारत योजनेतंर्गत आयुष्मान कार्डच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे.

30 जून 2024 रोजीपर्यंत हा आकडा 34.7 कोटींहून अधिक झाला आहे. या कालावधीपर्यंत एक लाख कोटी रुपयापर्यंतच्या 7.37 कोटी रुग्णांच्या खचार्ला मंजूरी देण्यात आली आहे. या योजनेतंर्गत देशभरातली 29 हजारांहून अधिक सूचीबद्ध रुग्णालयात कॅशलेस आणि पेपरलेस आरोग्य सेवा पुरवण्यात येत आहे.

आयुष्मान भारत योजनेविषयी केंद्र सरकारने कॅबिनेटमध्ये मोठा निर्णय घेतला आहे. देशातील 4.5 कोटी कुटुंबातील 6 कोटी ज्येष्ठांसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार त्यांना 5 लाख रुपयांपर्यंतच्या आरोग्य सेवा मोफत देण्यात येतील.

सध्या ज्येष्ठ नागरीक या योजने व्यतिरिक्त सरकारच्या इतर आरोग्य सेवेचा फायदा घेत असेल तर त्यांचा या योजनेत आपोआप समावेश होईल.तुम्हाला या योजनेचा लाभ घ्यायचा असेल तर टोल फ्री क्रमांक 14555 वर कॉल करू शकता. त्यावरून तुम्हाला योजनेसंबंधी आणि पात्रतेसंबंधीची माहिती मिळेल. अथवा तुम्ही जवळच्या सीएससी सेंटरवर जाऊन कागदपत्रांसह अर्ज करू शकता. अर्ज करताना आधार कार्ड, निवासी पुरावा, राशन कार्ड याशिवाय एक नोंदणीकृत मोबाईल क्रमांक आवश्यक आहे.

Pradhan Mantri Jan Arogya Yojana
Ayushman Bharat
PM-JAY

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## धनगर आरक्षणासाठी परळीत रास्ता रोको



■ **वृत्तसंस्था, परळी, दि. २३:** पंढरपूर, लातूर, नेवासा या ठिकाणी उपोषणाला बसलेल्या धनगर जमातीच्या उपोषणकर्त्यांना पाठिंबा म्हणून धनगर समाजाने परळीतील ईटके कॉर्नर येथे सोमवार 23 सप्टेंबर रोजी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलकांनी बीड - परभणी - नांदेड महामार्ग रोखून धरल्यामुळे एक तास वाहतूक कोंडी झाली.

आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला एसटी प्रवगार्तून आरक्षण द्यावे, या प्रमुख मागणीसह पंढरपूर, लातूर व नेवासा येथे सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी संपूर्ण राज्यभर आ. गोपीचंद पडळकर यांच्या आवाहनाला पाठिंबा देत परळीत रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

## मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:** देशातील अनेक भागात अपेक्षेपेक्षा लवकर प्रवेश केलेल्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी (मान्सून) जाताना मात्र थोडा उशीर केला आहे. सोमवारपासून मान्सूनने परतीचा प्रवास सुरू केला आहे. पश्चिम राजस्थान आणि कच्छच्या काही भागातून त्याच्या परतीचा प्रवास सुरु झाला आहे.

मान्सूनच्या परतीच्या प्रवासादरम्यान दक्षिण आणि मध्यभारतात अनेक ठिकाणी पावसाची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे. मान्सूनच्या परतीच्या प्रवासासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्याचे भारतीय हवामान खात्याने स्पष्ट केले आहे. मान्सूनच्या माघारीची रेषा अनुपगड, बिकानेर, जोधपूर, भुज आणि द्वारकामधून जात आहे.

देशाच्या अनेक भागात यंदा मान्सून वेळेपेक्षा आधीच दाखल झाला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्येही आनंदाचे वातावरण होते. त्यामुळे त्याचा परतीचा प्रवास देखील लवकर सुरू होईल, असे वाटत होते. प्रत्यक्षात नियोजित वेळेच्या सहा दिवस उशीराने त्याचा प्रतीचा प्रवास सुरु होत आहे. गेल्यावर्षी देखील २५ सप्टेंबरला मान्सून राजस्थानातून माघारि फिरला होता. मान्सूनच्या आगमन आणि परतीच्या वेळापत्रकानुसार १७ सप्टेंबर ही मान्सूनच्या परतीच्या प्रवासाची तारीख निश्चित करण्यात आली आहे.

यावेळी केरळ आणि ईशान्य भारतात ३० मे रोजी मान्सूनचे एकाचवेळी आगमन झाले. जे आगमनाच्या सामान्य तारखेच्या दोन दिवस आधी होते. १९ मे रोजी मान्सून अंदमान निकोबार बेटावर दाखल झाला होता. तर ३० मे रोजी तो केरळमध्ये पोहोचला होता. तर सहा जूनला तो महाराष्ट्रात पोहोचला.

२३ सप्टेंबरला पश्चिम राजस्थान आणि गुजरातमधील कच्छच्या काही भागातून मान्सून परतीच्या प्रवासाला लागला. आणखी काही भागातून मान्सूनसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. २४ सप्टेंबरला पश्चिम राजस्थान आणि लगतच्या पंजाब, गुजरात, हरियाणाच्या काही भागातून मान्सून माघार घेईल.

## प्रजापिता ब्रह्माकुमारीज तर्फे मोबाईल व्यसनमुक्ती अभियान

■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. २३:** आज बदलत्या काळानुसार ऑनलाईनच्या प्रगतिशील युगात स्मार्ट मोबाईल चा वापर अतीप्रमाणात वाढला आहे. मनुष्य जीवन प्रगतिकडे वाटचाल करून सुरळीत झाले अशी समज आहे. बदलत्या काळात स्मार्ट मोबाइल नक्कीच गरजेचा आहे.

परंतु त्या मोबाईल मधील सोशल मीडिया चा गरज नसताना अतिवापर मुळे मनुष्य जीवन सुरळीत का विस्कळीत झाले असा प्रश्न आहे? कारण आज दैनंदिन मानव जीवन ऑनलाइन डिजिटल आहे. परंतु हेच मानव जीवन नात्यांमध्ये ऑफलाईन होत आहे का?

या भयंकर समस्यांवर कसे नियोजन करता येईल त्याकरिता, बुधवार २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते ७.३० दरम्यान ब्रह्माकुमारीज, किर्ती नगर, डॉ. तेलगोटे यांच्या हॉस्पीटल जवळ, जुना आर.टी.ओ. रोड, अकोला येथे मोबाईल व्यसनमुक्ती शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

नजीकच्या काळात आपणास आणि आपल्या पाल्यांना अनेक शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक आणि व्यावसायिक समस्यांना सामोर जावे लागणार आहे. मुलांना वाचवायचे असेल तर आई-बाबांना सुद्धा त्याबद्दल आजच सर्व समजुत घेणे आवश्यक आहे. त्याकरिता हे शिबीर होत आहे. प्रमुख वक्ता म्हणून पुणे येथील ख्यातनाम व्याख्याते ज्ञानेश्वर नेरकर हे मार्गदर्शन करणार आहेत. त्यांनी संपूर्ण भारतात अनेक ठिकाणी कार्यक्रम घेतले आहेत. ते आपल्या अकोला शहरात वय ८ वर्ष ते ८० वर्षापर्यंतच्या वयोगटांसाठी वरील विषयावर प्रॅक्टिकल अनुभवयुक्त मार्गदर्शन देणार आहेत.

प्रमुख अतिथी म्हणून अकोला आणि वाशिमच्या संचालिका ब्रह्माकुमारी रुक्मिणी दिदी उपस्थित राहणार आहेत. या शिबीराला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. कल्पना भागवत, डॉ. मिनाक्षी मोरे, डॉ. श्रध्दा उगले, डॉ. सोनल पाटणे यांच्यासह ब्रह्माकुमारीज परिवारातर्फे गजानन हरणे यांनी केले आहे.

पान १ वरून

## मंत्रिमंडळ बैठकीत...

लोकसंख्या २ हजार आहे, त्या ग्रामपंचायतीच्या सरपंचाचं मानधन ३ हजारांवरुन ६ हजार रुपये करण्यात आले आहे. तसेच उपसरंपचाचे मानधन देखील दुप्पट करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच २ हजार ते ८ हजारांच्या दरम्यान लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींच्या सरपंचाचं मानधन ४ हजारांवरून ८ हजार रुपये करण्यात आले, तर तेथील उपसरपंचांचं मानधन १५०० रुपयांवरून ३ हजार करण्यात आले. याबरोबरच ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या ८ हजारांपेक्षा जास्त आहे, तेथील सरपंचाचं मानधन ५ हजारांवरून १० हजारांपर्यंत करण्यात आले आहे, तेथील उपसरपंचाचे मानधन २ हजारांवरून आता ४ हजारांपर्यंत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

**मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय**

- लोहगाव विमानतळाचे नाव जगद्गुरु संत तुकाराम महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ पुणे असे करण्याचा निर्णय.
- बालगृहे निरीक्षणगृहातील कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना : शिक्षकांना वरिष्ठ निवड श्रेणी
- धान उत्पादकांना प्रतिक्विंटल चाळीस रुपये अतिरिक्त भरडाई दर
- कुणबीच्या तीन पोटजातींचा इतर मागासवर्ग यादीमध्ये समावेश
- जुन्नर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय
- शिरूर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्ग. १४८६ कोटीचा प्रकल्प
- करदात्यांचे हित लक्षात घेऊन जीएसटी अधिनियमात सुधारणा
- यवतमाळ, जळगांव जिल्ह्यातील सूतगिरणींना थकबाकी परतफेडीसाठी हप्ते
- क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे यांना सूसज्ज क्रीडा सुविधा उभारण्यासाठी वांद्रेतला भूखंड
- ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी पदांचे एकत्रीकरण करून ग्रामपंचायत अधिकारी पद
- राज्यातील सरपंच उपसरपंच यांच्या मानधनात दूप्पट वाढ
- मुंबई उच्च न्यायालयाच्या वांद्रेतील नव्या संकुलाचे बांधकाम राज्याचा महत्त्वपूर्ण प्रकल्प
- हरित हायड्रोजन धोरणात अँकर युनिटची पारदर्शकपणे निवड करणार
- एसटी महामंडळाच्या जमिनी बीओटी तत्वावर विकसित करणार : साठ वर्षाचा भाडेपट्टा करार
- ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ
- राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ
- राज्यातील १४ आयटीआय संस्थांचे नामकरण
- छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथील विधी विद्यापीठांना सात कोटी रुपये
- अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना थेट नियुक्ती देण्याच्या निर्णयात सुधारणा
- जलसंपदा कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी
- श्रीरामपूर तालुक्यातील मौजे हरेगाव येथील शेती महामंडळाच्या जमिनी मुळ मालकांना परत करणार दूध अनुदान योजना सुरु राहणार, उत्पादकांना गायीच्या दूधासाठी लीटरमागे सात रुपयांचे अनुदान
- महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण जाहीर

नागपूर
महासागर
वृत्तसागर
मंगळवार ■ दि. २४ सप्टेंबर २०२४

## २९ ऑक्टोंबरला ओबीसी महासंघाची बैठक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:** राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे विदर्भातील ११ जिल्हात संवाद सभा आयोजित करणे तसेच राष्ट्रीय ओबीसी महासंघाने सातत्याने आंदोलने, अन्नत्याग आंदोलने मोर्चे काढून सरकारवर दबाव वाढवून सरकार कडून विविध मागण्या मान्य करून घेतल्या.

काही मागण्या प्रलंबित असून यावर विचार मंथन करणे तसेच महासंघाच्या संघटनात्मक बाबीवर चर्चा करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांची सभा २९ ऑक्टोंबरला रोज रविवारला धनवटे नॅशनल कॉलेज रूम न. १० मध्ये,अजनी रेल्वे स्टेशन जवळ नागपूर येथे दुपारी १२.३० वाजता ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे.

सभेत केंद्र व राज्य सरकारशी संबंधित मागण्यांवर विचार विनिमयआणि दिनांक ४ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर पर्यंत होणाऱ्या विदर्भातील ११ जिल्हात संवाद सभा आयोजनावर चर्चा केली जाईल. सभेला राष्ट्रीय ओबीसी महासंघ, महिला महासंघ, किसान महासंघ, युवा/युवती महासंघ, विद्यार्थी महासंघ, कर्मचारी महासंघ, वकील महासंघ सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजूरकर यांनी केले आहे.

## केंद्रीय गृह सचिवांना महाराष्ट्र नेत्रतज्ज्ञ संघटनेचे पत्र
# लेझर लाइटचा डोळ्यांवर गंभीर परिणाम

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:** गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीतील लेझर लाइटचा वापर तरुणांच्या डोळ्यांवर होवू लागला आहे. दृष्टिपटलावर म्हणजेच रेटिनावर रक्तस्राव होऊन काही तरुणांना एका डोळ्याने दिसण्यात गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत.

२०२३ मध्येही अशा प्रकारच्या तक्रारीत वाढ झाली होती. हे लक्षात घेता महाराष्ट्र नेत्रतज्ज्ञ संघटनेने केंद्रीय गृह सचिवांना पत्र लिहून लक्ष वेधले आहे. अमेरिकन नेत्रतज्ज्ञ संघटनेच्या अहवाला नुसार पाच मिलि वॉटपेक्षा जास्त क्षमतेच्या लेझर लाइटमुळे मुख्यत्वे नेत्रपटल खराब होवून कायमस्वरूपी अंधत्व येण्याची शक्यता असते.

लेझर लाइटचा झोत आकाशाकडे असणे अपेक्षित असताना हा झोत थेट गर्दीवर फिरवला जातो. थेट डोळ्यांवर आल्यामुळे रक्तस्रावाचा धोका होवून दिसणे कमी होवू शकते. या करीता लेझर लाइट शोच्या नियमांची कठोर अंमलबजावणी व्हावी, लेझरचा झोत आकाशाच्या दिशेने वर असावा, आदी मागण्या महाराष्ट्र नेत्रतज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष संतोष अग्रवाल व सचिव अतुल कठाणे यांनी गृहसचिवांना लिहिलेल्या पत्रातून केली आहे.



गणेश विसर्जन मिरवणुकीतील लेझर बीममुळे अनेकांच्या डोळ्यांना इजा झाल्याचे समोर आले आहे. यंदा विसर्जन मिरवणुकीदरम्यान अनेक गणेश मंडळांनी रथावर लेझर बीमचा वापर केला होता. त्याच्या प्रखर झोतामुळे डोळ्यांना इजा झाल्याच्या तक्रारी घेऊन अनेक तरुण मागील काही दिवसांत नेत्रविकार तज्ज्ञांकडे येत आहे असे महाराष्ट्र नेत्रतज्ज्ञ संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ. विनीत अरोरा यांनी सांगितले.

लेझर बीम हा तीव्र प्रकाशझोत असतो. तो डोळ्यावर पडल्यानंतर डोळ्यांवर ताण येऊन बाहुली आकुंचन पावते आणि डोकेदुखी सुरू होते. अपस्माराचे झटके येण्याचा त्रास असलेल्या रुग्णांना अशा प्रकारच्या प्रखर प्रकाशझोतांमुळे हा त्रास वाढण्याची शक्यता अधिक असते. लेझर बीममुळे डोळ्यावर होणारा परिणाम तपासण्याची आवश्यकता आहे असे डॉ. अरोरा यांनी सांगितले.

यंदा काही मंडळांनी नियम धाब्यावर बसवून सर्रास डीजेचा वापर केला. सोबतच लेझर लाइटचाही मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला. मिरवणुकीत लेझर लाइटच्या थेट संपर्कात आलेल्या काही तरुणांमध्ये आता गंभीर दृष्टिदोष आढळून येत असल्याचे त्यांनी प्रकर्षाने सांगितले.

## महाराष्ट्रात सत्ताबदल हे एकच लक्ष्य!

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २३:**



भाजपला सत्तेतून हटवणे एवढेच महाविकास आघाडीचे लक्ष आहे. आता यावर कुठलीही चर्चा होणार नाही. निवडणूक निकालानंतरच महाविकास आघाडी त्या संदर्भात चर्चा करेल, असे काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी नागपूरमध्ये सांगितले.

चंद्रपूर येथे झालेल्या पूर्व विदर्भातील पक्षाच्या आढावा बैठकीपूर्वी चेन्नीथला नागपूरमध्ये माध्यमांशी बोलत होते. चेन्नीथला म्हणाले, सरकार बनवने एवढंच आमचे उद्दिष्ट आहे. या निवडणुकीत कोणीच लहान भाऊ नाही, अन् मोठा भाऊ नाही. या निवडणुकीत अनेक छोट्या पार्टी आहे. या सर्वांना सोबत घेऊन आम्ही पुढे जात आहोत.

संपूर्ण महाराष्ट्र सत्ता परिवर्तन जनतेला अपेक्षित आहे. पण आयोग जाणीवपूर्वक निवडणुका जाहीर करीत नाही. वन नेशन वन इलेक्शनवर बोलणारे लोक हरियाणा जम्मू-काश्मीरसोबत महाराष्ट्रात निवडणूका का घेत नाही? महाराष्ट्रात काय सुरू आहे. लवकरात लवकर निवडणुका घोषित झाल्या पाहिजे. जनता सत्ता परिवर्तन करून महाविकास आघाडीला समर्थन देईल, असे चेन्नीथला म्हणाले.

महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपा संदर्भात तीन दिवसांपासून चर्चा सुरू आहे येणाऱ्या काही दिवसात सर्व पक्षाचे लोक अंतिम निर्णय करतील. विदर्भ काँग्रेसचा गड आहे. इंदिरा गांधीच्या काळापासून विदर्भ काँग्रेसच्या सोबत राहिलेला आहे. यावेळी सुद्धा राहील. लोकसभेतही विदर्भाने काँग्रेसला साथ दिली आहे. जागावाटपाच्या वेळेस या सगळ्या गोष्टी लक्षात ठेऊ, असे चेन्नीथला म्हणाले.

विदर्भात विधानसभेच्या एकूण ६२ जागा आहेत. त्यापैकी किमान ४५ ते ५० जागा काँग्रेसला मिळाव्या, अशी मागणी काँग्रेस नेते व विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. काँग्रेसला ४५ जागा दिल्यास उरलेल्या १७ जागांमध्ये शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्यात विभागणी करण्यात येईल.ती वरील दोन्ही पक्षांना मान्य होणार का? असा प्रश्न आहे.

तिरुपती बालाजी मंदिरातील लाडूमध्ये भेसळीचा मुद्दा सध्या गाजत आहे. हा गंभीर प्रकार आहे. लोक श्रद्धने मंदिरात जातात. त्यामुळे सरकारने यावर स्पष्टीकरण दिले पाहिजे, असे चेन्नीथला म्हणाले.

## आठवलेंसाठी महायुतीत कोणाचा बळी?

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. अशातच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी देखील आता जागांची मागणी केली आहे. विधानसभा निवडणुकीसाठी १० ते १२ जागा द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे.

त्यातही विदर्भातील ४ जागा आठवलेंनी मागितल्या असल्याने, महायुतीमधील कोणत्या चार उमेदवारांचा बळी दिला जाणार? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. एका पुरस्कार सोहळ्यासाठी नागपुरात आलेले रामदास आठवले यांनी सांगितले की, आम्ही लोकसभेला २ जागा मागितल्या होत्या, मात्र मिळाल्या नाहीत. आता विधानसभा निवडणुकीत आम्हाला १२ जागा द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. महाराष्ट्रात आम्ही १८ जागांची यादी केली आहे. त्यापैकी १२ जागा द्याव्यात तसेच



विदर्भात किमान ४ जागा पाहिजे असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

माझ्या पक्षासोबत मोठ्या प्रमाणात दलित मतदार आहेत. आम्हाला भाजपच्या कोट्यातून मानू नये, तर भाजप, शिंदे आणि अजित पवारांच्या कोट्यातून ४-४ जागा द्याव्या, म्हणजे आम्हाला १२ जागा मिळतील. येणाऱ्या एनडीए सरकारमध्ये आम्हाला मंत्री पद द्यावे, तसेच २ महामंडळ द्यावे, अशी मागणी आठवले यांनी केली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चतुर नेते आहेत. ते आमची ताकद ओळखतील, असा विश्वासही त्यांनी दाखवला आहे.

विदर्भातील विधानसभेच्या ६६ जागांपैकी केवळ दहा जागा अनु. जाती प्रवर्गासाठी राखीव असून, रामदास आठवले कोणत्या जागांवर दावा ठोकतात? याबाबत सद्धया निश्चिती नाही.

भंडारा विधानसभा मतदारसंघात २०१४ मध्ये भाजपाचा उमेदवार निवडून आला असतानाही नंतरच्या निवडणुकीत ही जागा रामदास आठवले यांच्या रिपब्लीकन पक्षासाठी सोडण्यात आली होती. मात्र, आठवले यांच्या पक्षाच्या नावावर भाजपाचे अरविंद भालाधरे यांना उमेदवारी देण्यात आली. आता आठवले यांनी विदर्भातील चार जागांची मागणी केली असून, त्यात भंडारा येतो की इतर जिल्ह्यातील राखीव जागांची मागणी ते लावून धरतात? याकडेही महायुतीमधील नेते आणि विद्यमान आमदारांचे लक्ष लागले आहे.

## मध्ये रेल्वेच्यावतिने भव्य वृक्षारोपण मोहीम

■ **नागपूर, दि. २३:** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण मोहीम राबवली. अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (प्रशासन) पी. एस. खैरकर यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण विभागात एक हजार रोपे लावण्यात आली.

यासाठी रेल्वेचे अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.




## पौर्णिमा दिवसनिमित्त क्रीडा चौकात जनजागृती

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:** नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने माजी महापौर व माजी आमदार प्रा.अनिल सोले यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या पौर्णिमा दिवस अभियानांतर्गत क्रीडा चौक परिसरात जनजागृती करण्यात आली.

नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने क्रीडा चौक येथे पौर्णिमा दिवस' साजरा करण्यात आला. याप्रसंगी माजी आमदार प्रा. अनिल सोले, ग्रीन व्हिजिल फाऊंडेशनचे कौस्तव चॅटर्जी, कु सुरभी जयस्वाल, मेहुल कोसुरकर, कु, शीतल चौधरी, बिष्णुदेव यादव, कु. प्रिया यादव, पार्थ जुमड, कु, पिनाकी बनिक, अपूर्व देव आदींनी जनजागृती केली.या अभियानाला दुकानदार, नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला. दुकानदार व नागरिकांनी देखील त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला.

## राजे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २३:** कळमेश्वर शहरात राजे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री उध्दव बाळासाहेब ठाकरे यांचे शुभ हस्ते रविवार दिनांक २९/९/२०२४ ला दुपारी ५ वाजता अनावरण होणार आहे. ही माहिती माजीमंत्री सुनील केदार यांनी पत्रपरिषदेत दिली.

या कार्यक्रमाला खासदार संजय राऊत, आ. भाष्करराव जाधव, आ. आ.अनिलबाबु देशमुख, खा. श्यामकुमार बर्वे, आ. मिलींद नार्वेकर, माजी खासदार प्रभाशभाऊ जाधव, बाळाभाऊ राऊत, हर्षल काकडे व अन्य पदाधिकारी उपस्थित राहतील. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळ्याचा स्थापनेचा ठराव घेवून त्या दिशेने प्रयत्न सुरू झाले परंतु सर्वोच्च न्यायालयाने सन २०१७ मध्ये आदेश काढून मार्गदर्शक तत्वांनुसार पुतळ्याची स्थापना करावी असा आदेश काढला. त्यामध्ये चॅरिटेबल ट्रस्टच पुतळा स्थापन करेल. सावित्रीबाई फुले ज्ञानवर्धन ग्रंथालय व समाज शिक्षण संस्था कळमेश्वर द्वारा पुतळ्याचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले.

राजे श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याची उंची जमीनीपासून २५ फुट असून कळमेश्वर शहराला शोभनिय आहे. असे पत्र परिषदेत आमदार सुनील केदार यांनी सांगितले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख ग्रामीण उत्तम कापसे, किशोर कुमेरिया यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## सव्वा कोटींनी ग्राहकांची फसवणूक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:** व्यंकटेश बिल्डर ॲन्ड डेव्हलपर्सचे संचालक किशोर हंसराज झाम (70) आणि राजगोपाल सिकंदर झाम (50) रा. रामबाग, मेडिकल चौक विरुद्ध इमामवाडा पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे.

आरोपींनी कळमना परिसरात रो हाऊस बनविण्याचा प्रकल्प सुरू करून लोकांशी सौदा केला. त्यांच्याकडून 1.38 कोटी रुपये घेतले. मात्र रो हाऊस न देत फसवणूक केली. शेषराव रामचंद्र चोपणे (65) रा. गोंदियाच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

2012 साली व्यंकटेश बिल्डर ॲन्ड डेव्हलपर्सने कळमना परिसरात रो हाऊस प्रकल्प सुरू केला होता. मेडिकल चौकाजवळ असलेल्या कार्यालयातून त्यासाठी बुकिंग केली जात होती. चोपणे यांनी 65 आणि 66 क्रमांकाचे रो हाऊस खरेदीचा सौदा केला होता. त्यांच्याप्रमाणेच इतर 8 जणांनीही रो हाऊसचा सौदा करून एकूण 1.32 कोटी रुपये आरोपींना दिले. 12 वर्ष लोटल्यानंतरही रो हाऊस तयार झाले नाही आणि ना कोणाला विक्रीपत्र करून दिले. अनेक दिवसांपासून पीडित न्यायासाठी भटकत होते. पोलिस तपास सुरूच होता. आता पोलिसांनी किशोर आणि राजगोपालविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे.

**झामचे वादाशी जुने नाते**

किशोर झाम यापूर्वीही वादात अडकला आहे. क्रिप्टो करंसीमध्ये गुंतवणुकीच्या नावावर लोकांची कोट्यवधी रुपयांनी फसवणूक केल्याची तक्रारही दाखल झाली आहे. झामकडून पैसे उकडण्यासाठी गतवर्षी कळमना ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक आणि व्यावसायिकावरही गुन्हा नोंद झाला होता. झाम कुटुंबातील इतर सदस्यांवरही फसवणुकीचे अनेक गुन्हे नोंद आहेत. व्यंकटेश सिटी आणि कन्हैया सिटीच्या नावावर शेकडो लोकांची फसवणूक करण्यात आली आहे.

## ११३ वर्षांपासून साजरा होतोय नागपुरातील बंगाली दुर्गोत्सव

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २३:** १७५० मध्ये ओदिशातून बेंगाली सरदार दुर्लभराम यांना युद्धबंदी म्हणून नागपुरात आणण्यात आले होते. नागपुरात येणारे पहिले बेंगाली म्हणून त्यांची नोंद आहे. त्यानंतर १६१ वर्षांनंतर म्हणजे १९११ मध्ये नागपुरातील धंतोली भागातील पटवर्धन ग्राऊंडवर बेंगाली दुर्गोत्सव साजरा झाला.

तत्कालीन भोसले राजे रघुजी यांनी त्याचे उद्घाटन केले होते. त्या नंतर १९१८ पासून आता असलेल्या शाळेत साजरा केला जात असल्याची माहिती बेंगाली मराठी शब्दकोशाच्या लेखिका आणि अभ्यासक मंदिरा गांगुली यांनी दिली. बेंगालीकरीता दुर्गोत्सव हा आनंदाचा उत्सव असतो. सासरी गेलेली मुलगी मुलाबाळांसह माहेरी येते. बंगाली मान्यतेनुसार तिच्यासोबत गणेश, कातीर्केय ही मुले आणि लक्ष्मी आणि सरस्वती या मुली असतात. म्हणून नवे कपडे घेणे, गोडधोड खाणेपिणे आणि आनंद साजरा केला जातो. जणू काही दिवाळीच असते असे गांगुली यांनी सांगितले.

१७९३ ते १७९८ या कालावधीत राधाकांत मुन्शी हे भोसले राजाशी तहाची बोलणी करण्यासाठी आले होते. त्या नंतर १८५५ मध्ये येथील ब्रिटिश रेसीडेन्ट जॉर्ज प्लाउडेन यांचे दिवाण म्हणून गोविंदचंद्र मुन्शी आले. त्याच दरम्यान श्रीनाथ



चटोपाध्याय, समदत्त आदी बेंगालीही आले. १८७४ मध्ये बिपीनकृष्ण बाशु गव्हर्नमेंट ॲडव्होकेट म्हणून आले होते. त्यांच्या समवेत तेव्हा १०० बेंगाली होते. मॉरिस कॉलेज व नागपूर विद्यापीठाच्या संस्थापकांपैकी बिपीनकृष्ण बाशू एक होते. येथून नागपुरच्या लोकजीवनात बंगाली रूजले. हिंदुंची घटस्थापना आश्विन शु. १ ला होते. यावर्षी गुरूवार ३ ऑक्टोबर रोजी घटस्थापना आहे. तर बेंगाली घटस्थापना षष्ठीला होते. यावर्षी षष्ठी ९ ऑक्टोबर रोजी आहे. त्या दिवशी रात्री बेंगाली दुगेर्ची प्राणप्रतिष्ठा होईल. रात्रीला प्राणप्रतिष्ठा होण्यामागे प्रभू रामाची कथा सांगितली जाते.

रावणाचा पराभव करण्यासाठी प्रभू रामचंद्राने देवीची पूजा करून तिला जागवले. पण, त्यावेळी देवीचा शयनकाल सुरू होता. रामाने देवीला अवेळी जागवले म्हणून तिची प्राणप्रतिष्ठा रात्री केली जाते अशी मान्यता असल्याचे मंदिरा गांगुली यांनी सांगितले. या पूजेला "अकाल बोधन' असे म्हटले जाते. अकाल म्हणजे अवेळी आणि बोधन म्हणजे जागवणे असा अर्थ होतो. षष्ठी, सप्तमी, अष्टमी, नवमी व दशमीला विसर्जन केले जाते.

धंतोलीतील दिनानाथ हायस्कूलच्या बंगाली दुर्गोत्सवाला ११३ वर्षे, मोतीबाग बंगाली दुर्गोत्सवाला ७५ वर्षे आणि बंगाली कल्चरल सोसायटी अंतर्गत सार्वजनिक दुर्गोत्सव, काटोल रोड येथे ६४ वर्षे पूर्ण झाली. सीपीडब्ल्यूडी कॉलनी, वसंत पंचमी मैदानात हा दुर्गोत्सव षष्ठी ऐवजी पंचमीला म्हणजे ८ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. विसर्जन रविवार १३ रोजी होईल.

## एसटीच्या ताफ्यात येणार आणखी अडीच हजार बसेस

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २३:** आर्थिक कोंडीत सापडलेल्या एसटी महामंडळाची स्थिती हळूहळू रुळावर येत आहे. २०२४- २५ मध्ये एसटीच्या ताफ्यात २,५०० बसगाड्या वाढणार आहेत. २०२५-२६ मध्ये नवीन २,५०० बसेस घेण्याचे महामंडळाचे नियोजन असून तसा प्रस्ताव शासनाला पाठवण्यात आला आहे.

प्रथम करोना व त्यानंतर एसटी कर्मचाऱ्यांनी केलेल्या बेमुदत संपामुळे एसटीची आर्थिक स्थिती पूर्णपणे कोलमडली होती. त्यामुळे महामंडळाकडून नवीन बस खरेदीही थांबली होती. दरम्यान आर्थिक कोंडीमुळे महामंडळाला जुन्या बसगाड्याही चालवणे कठीन झाले होते. दरम्यान शासनाने



वेळोवेळी महामंडळाला केलेल्या आर्थिक मदतीमुळे कशातरी बसेस रस्त्यावर प्रवासी सेवा देत होत्या. दरम्यान या सर्व कोंडीमुळे एसटीच्या बसेसची संख्या राज्यात मोठ्या प्रमाणावर घटली होती.

दरम्यान, शासनाने एसटीत महिला व ज्येष्ठ नागरिकांना विविध सवलत जाहीर केल्या. या सवलतींच्या अंमलबजावणीमुळे राज्यभरात एसटी बसेसमध्ये प्रवासी संख्या वाढली. परंतु, एसटीमध्ये बसगाड्यांची संख्या कमीच होती. त्यामुळे महामंडळाने यापूर्वीच त्यांच्या स्तरावर शासनाच्या निधीतून २ हजार २०० बसगाड्या घेण्यास सुरुवात केली.

त्यापैकी ५० बसगाड्या पुढच्या आठवड्यात मिळणार असून नोव्हेंबरमध्ये ३०० व त्यानंतर टप्पा- टप्प्याने सर्व बसगाड्या मिळणार आहेत. आता एसटीने १ हजार कोटीतून २०२४- २५ मध्ये आणखी नवीन २ हजार ५०० बसेस घेण्याचे नियोजन केले आहे. तसा प्रस्तावही शासनाला दिला आहे. मंजुरी मिळताच निविदा प्रक्रिया राबवली जाणार असल्याचे उपाध्यक्ष डॉ. माधव कुसेकर यांनी सांगितले.

> एसटी महामंडळाने यंदा २,२०० बसगाड्या खरेदीचे नियोजन केले असून टप्पा- टप्पाने या बसगाड्या मिळतील. २०२५ मध्येही सुमारे अडीच हजार बसेस घेण्याचे नियोजन असून तसा प्रस्ताव शासनाला दिला आहे.
> **डॉ. माधव कुसेकर**
> व्यवस्थापकीय संचालक
> एसटी महामंडळ, मुंबई.

# ट्रकमधून टमाटरची वाहतूक करण्याच्या नावाखाली गायीची तस्करी

## २ आरोपींना अटक, २८ जनावरांची सुटका



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, २३ :

नागपूर-जबलपूराष्ट्रीय महामार्गावर अवैध गोवंश वाहतुकीच्या घटना वाढत आहेत. कारवाई टाळण्यासाठी आरोपी नवनवीन डावपेच अवलंबत आहेत. टमाटरची वाहतूक करण्याच्या नावाखाली गोवंशाची तस्करी करणारे वाहन देवलापार पोलिसांनी रविवारी पकडले.

मिळालेल्या माहितीनुसार, गस्तीदरम्यान देवलापार पोलिसांना जबलपूर-नागपूमहामार्गावर गुरांची अवैध वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्या आधारे पोलीस ठाण्यासमोर नाकाबंदी करण्यात आली. तपासणी दरम्यान ट्रक अनुक्रमांक -४०, - १२३५ थांबवण्यात आला. आरोपींनी दिशाभूल करण्यासाठी ट्रक मध्ये टमाटरच्या पेट्या ठेवल्या आणि आत जवळपास २८ गुरे निर्दयीपणे दोरीने बांधलेली दिसली.

पोलिसांनी ट्रकचालक अलाउद्दीन रज्जाक भाई शाह (वय ४०) आणि अस्लम खान अन्वर खान (वय ३४, रा. सारंगपूर, जिल्हा राजगड (मध्य प्रदेश) यांना अटक केली. २८ जनावरे व वाहनांसह एकूण १९ लाख २० हजार रुपयांचा माल जप्त करण्यात आला. ही जनावरे जय श्री कृष्ण गौरक्षण संस्था घोडेगाव, नरखेड येथे संवर्धनासाठी पाठविण्यात आली. दोन्ही आरोपींविरुद्ध देवलापार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, रामटेकचे उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकते यांच्या मार्गदर्शनाखाली देवलापार पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक नारायण तुरकुंडे, पोलीस हवालदार रवींद्र मेश्राम, सचिन येलकर, केशव फड, मनीष चौकसे आदींनी केली.

## काटोल येथे विदर्भ शाहीर कलाकार परिषदेच्या मेळाव्यात सलील दादा गरजले

# आमचे सरकार आले तर ५००० ऐवजी १५ हजार रुपये कलाकारांना देणार





काटोल तालुका प्रतिनिधी

काटोल जिल्हा नागपूर च्या वतीने कलावंताचा भव्य मेळावा लक्ष्मी मंगल कार्यालय व सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता

या वेळी विदर्भ शाहीर कलाकार परिषदचया वतीने आयोजित खडीगंमत, भारुड, कीर्तन, कविता, गीत, नृत्य, संगीत, नाटक व भजन मंडळ या मेळाव्यात जवळपास ३०९ मंडळांनी कार्यक्रमात नाविन्यपूर्ण सादरीकरण केले. माननीय मनीषजी भिवगडे केंद्रीय अध्यक्ष विदर्भ शाहीर कलाकार परिषद तसेच उद्घाटक जिल्हा परिषद सदस्य श्री सलीलदादा देशमुख हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून शाहीर अलंकारजी टेंभुर्णे कार्याध्यक्ष विदर्भ शाहीर कलाकार परिषद व माजी आमदार प्रकाशजी गजभियेसाहेब हे होते व प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद माजी सदस्य शंकरराव चहांदे, विदर्भ प्रमुख यादवराव कानोलकर, विदर्भ संघटक अरुणजी सहारे, माजी सरपंच रिधोरा नरेंद्र डोंगरे, पत्रकार युवराज मेश्राम विलो इलेक्ट्रॉनिक मीडिया विदर्भ ब्युरो चीफ, निर्भीड पत्रकार संजय खांडेकर, विदर्भ महिला प्रतिनिधी संगीताताई भक्ते, जिल्हा प्रतिनिधी मायाताई गणोरकर, जिल्हा महिला प्रतिनिधी सोनालीताई गोंडाने, काटोल तालुका अध्यक्ष नानाजी तायवाडे शाहीर, नरखेड तालुकाध्यक्ष सुधाकर खजुरीये, कळमेश्वर तालुका अध्यक्ष राजेश श्रीखंडे, हिंगणा तालुका अध्यक्ष पुरुषोत्तम निघोट, महिला प्रतिनिधी कळमेश्वर तालुका सुनंदाताई ठाकरे, कार्याध्यक्ष शंकरराव श्रीखंडे कळमेश्वर तालुका यांचा विशेष सत्कार करण्यात आला. जिल्हा परिषद सदस्य सलील दादा देशमुख यांनी उद्घाटनिय भाषणात सांगितले की, कलावंताकरिता मानधन १५००० प्रति महिना प्रमाणे करू. मनीषजी भिवगडे यांनी अध्यक्ष भाषणात कलावंताच्या मागण्या मांडल्या व येणाऱ्या विधानसभेवर भव्य मोर्चा काढून तुम्हाला न्याय मिळवून देण्याकरता मी प्रयत्नशील आहोत असे संबोधित केले. माननीय अलंकार टेंभुर्णे यांनी आपल्या भाषणात शायरीशैलीत कलावंताची मने जिंकून टाळ्या घेतल्यात. या कार्यक्रमात प्रास्ताविक विदर्भशाहीर कलाकार परिषद काटोलचे अध्यक्ष नानाजी तायवाडे यांनी केले. विदर्भ शाहीर कलाकार परिषदेचे कळमेश्वर तालुक्याचे कलावंत श्री भास्कर खाटके व मधुकरराव खटके यांच्या नृत्यांनी प्रेक्षकांना आकर्षित केले. कार्यक्रमाचे संचालन आकाशवाणी, दूरदर्शन कलावंत प्रबोधनकार अरुणभाऊ सहारे, अरुणभाऊ वाहने जिल्हा सरचिटणीस, जिल्हा प्रतिनिधी सोनालीताई गोंडाने यांनी केले तर आभार प्रदर्शन बाबुराव पाटील यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीते करण्याकरिता प्रदीपजी देशमुख, धनराजजी राऊत, वासुदेवराव ठाकरे, रामदासजी बडोदेकर, आशाताई मेंढे, निर्मलाताई रेवतकर, संगीताताई वाडबुदे, श्रद्धाताई कांबळे, उर्मिलाताई वाडी, सुलोचनाताई ठाकरे, दुर्गाताई नासरे, पुष्पाताई लोणगाडे, सुनंदाताई मोहितकर व काटोल व नरखेड येथील कार्यकारणी सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले.



# सिद्धी विनायक मंदीरात पंधरवाडा हरिनाम

वाडी, सप्टेंबर

येथील कोहळे लेआऊट मधील सिद्धी विनायक मंदीरात गणेश चतुर्थी पासुन संकष्ट चतुर्थीपर्यंत पंधरवाडा हरिनामाची संकष्ट चतुर्थीच्या दिवशी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. दररोज सकाळ संध्याकाळ, पुजाअर्चना, महाआरती हरिपाठ व भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. शनिवार सप्टेंबर रोजी गुरूकृपा साई महिला भजन मंडळातर्फे काल्याचे भजन पार पडले. भजनात संवादीनीवर सज्जनराव कनेरकर, तबला वादन बागडे, टाळकरी अरुणा देशमुख, मंगला कडू, संध्या वाघमारे, मंगला बोंडे, वंदना गोरे, शालू देवरे, गीता धोटे, ज्योती खोब्रागडे, ज्योत्सना सगणे, रेणू धोटे, वर्षा साठवणे, रेणू शेळके आदींनी साथसंगत केली. आयोजनासाठी सिद्धी विनायक गणेश मंदीर पंचकमेटीच्या महिला व पुरुष पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

# मोवाड येथे सिमेंट रोडचे इस्टिमेट नुसार होणारे कामे रद्द करण्याची मागणी

## साखळी उपोषणाला बसलेले मोवाडवासी नागरिक

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, २३ :

वित्तीय वर्ष २०२४-२५मधील नगरपरिषद मोवाड येथे काही नवीन रोडचे टेक्निकल शोसन होत आहे मागील वर्षीय वित्तीय २०२३-२०२४ मध्ये सुद्धा अशाच प्रकारचे सिमेंट रोडचे काम झालेले आहे ते रोड अर्धवट सोडण्यात आलेले आहे ते रोड केल्यानंतर एक महिन्याच्या आत तयार केलेले रोड खराब झाले येथे काळी माती असल्यामुळे सिमेंट रोड यशस्वी होत नाही याचा मला व गावातील नागरिकांना चांगलाच अनुभव आलेला आहे त्यामुळे आपण अगोदर बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्ता प्रत्यक्ष पाहणी करून निर्णय घ्यावा व सदरच्या प्रस्ताव स्थगिती चौकशी होईपर्यंत देण्यात यावे जेणेकरून रोडची रुंदी सुद्धा जागेवरच राहील जुने बांधण्यात आलेले रोड सुद्धा अरुंद आहे एक गाडी उभी राहिल्यावर दुसरी गाडी जात नाही जर आपण सदर कामावर स्थगिती दिली नाही तर मी व सदर वार्डातील नागरिक नगर परिषदेसमोर दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोज सोमवार पासून गावातील नागरिक साखळी उपोषणाला बसणार आहेत उपोषण मागे घेण्यास हटणार नाही साखळी उपोषण निर्णय रद्द होईपर्यंत करण्यात येईल व होणाऱ्या कोणत्याही नुकसानीस प्रशासन जबाबदार राहील अशा प्रकाराचे निवेदन मोवाड शिवसेना शहर प्रमुख( एकनाथ शिंदे गट) निरज कळंबे यांनी लेखी निवेदनातून मुख्याधिकारी नगरपरिषद मोवाड, पोलीस अधीक्षक साहेब नागपूर, कार्यकारी अभियंता साहेब सिव्हिल लाईन नागपूर, उपविभागीय अधिकारी काटोल, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन नरखेड, यांना देण्यात आले आहे.




# मनसे जिल्हाध्यक्ष शेखर दुंडे यांनी केली शाखाध्यक्षांची नियुक्ती



रामटेक :(-प्रतिनिधी ) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांचा विचारधारेवर विश्वास ठेवून पारशिवनी तालुक्यातील गुंढरी पंडे या गावात शाखेचे फलक लावून. शाखाध्यक्षाची नियुक्ती करण्यात आली.मनसे जिल्हाध्यक्ष शेखरभाऊ दुन्डे यांनी आकाश सहारे यांची शाखाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. तसेच भागेमाहेरी शाखाध्यक्ष म्हणून शुभम उकेबोंदरे व उपशाखा अध्यक्ष म्हणून अभिषेक उकेबोंदरे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी असंख्य महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.या सर्व शाखाध्यक्ष आणि महाराष्ट्र सैनिकाना जिल्हाध्यक्ष शेखरभाऊ दुंन्डे पक्षबांधणी बद्दल मार्गदर्शन केले. यावेळी मनसे उपजिल्हाअध्यक्ष रोशन फुलझले,रामटेक विधानसभा सचिव सुरज भाऊ दुंन्डे, मनसे सेल जिल्हासंघटक रतनभाऊ वासनिक, रुचिक दाते,फैज खान,प्रज्वल उकेबोंदरे,नितेश उकेबोंदरे, साहिल उकेबोंदरे,श्रीधर उकेबोंदरे, प्रशांत वाडिवे, निखिल उकेबोंदरे, साहिल क्षीरसागर, सुजल भुजाडे,चेतन उकेबोंदरे,खुशाल क्षीरसागर तसेच सर्व शाखाध्यक्ष महाराष्ट्र सैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.

# अतीवृष्टी धारकाना त्वरीत भरपाई मिळावी

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, २७ :



२०२४ कामठी शहर व ग्रामीण भागात २६ जुलाई २०२४ ला झालेल्या अतीवृष्टीने नागरिकांचे अतोनात आर्थिक नुकसान झाले .त्या साठी कामठी शहर काँग्रेसने मागील १८ जुलाई ते २० जुलाई २०२४ ला झालेल्या मुसळधार पावसाने कामठीतील खोलगट भागात ज्याप्रमाणे बागडोर नाल्यांच्या परिसरात व इतर ठिकाणी अतोनात नुकसान झाले .याकरिता नगर काँग्रेस व ग्रामीण काँग्रेस च्या वतीने तहसिलदार निवेदन दिले .या निवेदनावर नगर परिषद प्रशासनाच्या माध्यमांतुन मौका चौकशी तसेच ग्रामीण भागात पटवारि व मंडल अधिकाऱ्यांच्या मार्फत सर्वे करण्याचे सांगितले .आज पर्यंत पीडितांना ना खावटि ना आर्थिक मदत मिळाली नसल्याने म्हणणे आहे .याकरिता महा युती निषेध करत पत्र परिषदेतुन महायुती सरकार ला सात दिवसात अतीवृष्टी धारकाना आर्थिक मदत मिळाली नाही तर शहर काँग्रेस व ग्रामीण काँग्रेसच्या वतीने मोठे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला .यांची जबाबदारी महायुती सरकार व प्रशासनावर राहील असेही सांगण्यात आले . यापत्र परिषदेला म .प्रदेश काँग्रेस कमेटीचे महासचिव व माजी नगर परिषद अध्यक्ष हाजी षकुर नागानी यांनी संबोधित केले .याप्रसंगी प्रदेश काँग्रेस महासचिव प्रसन्ना (राजा भाऊ )तिडके , जि प सदस्य नाना भाऊ कंभाले , शहर काँग्रेस अध्यक्ष रमेश दुबे , उपाध्यक्ष व कार्यालय प्रभारी लक्ष्मण संगेवार , माजी नगराध्यक्ष नीरज यादव इत्यादी उपस्थीत होते .

# जीवित व मृत ग्राम विद्युत व्यवस्थापकांना न्याय मिळवून द्यावा

## किमान वेतन लागु करून वेतन आम्हच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे

**कन्हान :** महाराष्ट्र शासनाच्या आदेशाने तुटपुज्या मानधनावर कार्यरत ग्राम विधृत व्यवस्थापकाना किमा न वेतन लागु करून वेतन आम्हच्या बँक खात्यात जमा करून दवाखान्याची सुविधा आणि जीवित हानी झाल्यास त्यांच्या परिवारास नुकसान भरपाई देण्याची तरतुद करून जीवित व मृत ग्राम विद्युत व्यवस्थापकां ना न्याय मिळवुन देण्याची मागणी मा. चंद्रशेखर बावनकुळे साहेब भाजपा प्रदेशाध्यक्ष व विधान परिष द आमदार तसेच माजी ऊर्जा उत्पादन शुल्क आणि जिल्हा पालकमंत्री नागपूर हयाना ग्राम विधृत व्यवस्था पक तांत्रिक संघटना व्दारे निवेदन देऊन करण्यात आली आहे.

आम्ही महाराष्ट्र शासनादेश क्र. व्ही.पी.एम.-/प्र.क्र./पं.रा.-,दि. ऑक्टोबर च्या अनुसार महावितरण करिता तूटपुंजा च्या पगा रावर तास प्रमाणे काम करणारे. ग्राम विद्युत व्यवस्थापक महावितरणचे नवीन मीटर लावणे, रीडिंग घेणे, फ्युज टाकणे, कनेक्शन कापणे व इतर देखरेखीचे काम करणे करिता आम्ही कार्यरत असतो. महावितरणच्या आर्थिक उन्नती करता आम्ही तास अग्रेसर आहोत. तरीही देखील आमच्या जिवाजी



पर्वा न महावितरणला आहे, ना शासनाला आहे. कारण गेल्या काही दिवसात अनेक दुर्घटनेचा सामना ग्राम विद्युत व्यवस्थापकांनी केलेला आहे जे तीन लोक निलेश कोहळे अमरावती, आकाश खाडे दर्यापूर, सागर ठाकरे नागपुर हे मृत्यूमुखी पडले तसेच निखिल बावणे सावनेर नागपुर, शुभम निमोणे खंडाळा नागपूर, दिनेश चींचुलकर रामटेक नागपुर यांचा करंट लागुन अपघात झाला. आता ताजे उदाहरण जुन ला भिवापूर (उटी) नागपूर या गावात डीपीचे मेंटेनन्स करत असताना 'सागर ठाकरे' पाचगाव निवासी ग्राम विद्युत व्यवस्थापकाचा करंट लागून मृत्यू झाला. त्याचप्रमाणे (दि.८) जुन २०२४ ला शुभम निमोणे राह. खंडाळा नागपुर ग्राम व्यवस्थापकाचा डी.ओ. वर काम करीत असताना करंट लागुन अपघात झाला त्याची परिस्थिती अत्यंत नाजूक आहे. या व्यतिरिक्त (दि.) मार्च २०२३ ला दिनेश चिंचुलकर राह. रामटेक याचा देखील विद्युत करंट लागून अपघात झाला होता. ग्राम विद्युत व्यवस्थापकांची परिस्थिती इतकी दयनीय असल्याने दवाखान्याची सुविधा द्यावी, जीवित हानी झाल्यास त्यांच्या परिवारास नुकसान भरपाई देण्याची तरतुद करून आम्हा ग्राम विद्युत व्यवस्थापकांना किमान वेतन लागु करून वेतन आम्हच्या बँक खात्या त जमा करून सुविधा तत्काळ देण्यात यावी. अशी नम्र विनंतीचे निवेदन मा चंद्रशेखर बावनकुळे साहेबा ना आम्हा लावारिश ग्राम विधृत व्यवस्थापकाचे जन्म दाते चंद्रशोखर बावनकुळे असे लिहलेले टी शर्ट घालुन ग्राम विद्युत व्यवस्थापक तांत्रिक संघटना नाग पुर जिल्हा अध्यक्ष दिनेश चिंचुलकर, उपाध्यक्ष शशि कांत झोडापे, पोर्णिमा बलावे, निखिल बावने, विजु कुंबले, पवन झाडे सह इतर ग्राम विद्युत व्यवस्थापक प्रामुख्याने उपस्थित राहुन मागणी केली आहे.

# अनिल भगत वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्याची गस्त सुरू.....

## वनकर्मचारी तैनात गस्त सुरू

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, २३ :

दिनांक २२-९-२४पारशिवनी वनपरिक्षेत्रातील गाव शिवारात वाघाने धुमाकूळ घातला असून दि.१९ सप्टेंबर ला पेठ परसोडी गावातील शेतकरी आपल्या म्हशी काल भैरव परीसरात चारत असताना दुपारच्या वेळी अचानक पट्टेदार वाघाने जिवघेणा हल्ला चढवला होता. त्या हल्यात शेतकरी चंद्रकांत इंगळे हा गंभीर रित्या जखमी झाला असून सध्या नागपूर येथील मेडीट्रीना रुग्णालय मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

या परीसरातील भागेमहारी पेठ परसोडी, पाला सावळी व ईतर गावांमध्ये वाघाने धुमाकूळ घातलाय त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूर मोठ्या प्रमाणावर दहशतीत असुन शेतकरी व शेतमजूर शेतात जाण्यासाठी हिंमतच करीत नसल्याने व वनविभागाच्या अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात रोष व्यक्त करीत आहेत. वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल भगत यांनी तात्काळ निर्णय घेऊन वाघाने धुमाकूळ घातलेल्या ग्रामीण व जंगला शेजारच्या गावातील नागरिकांना भयमुक्त करण्यासाठी व शेतकरी शेतमजूराना संरक्षण करण्यासाठी २५ वनकर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

तैनात वनकर्मचारी दिवसा सकाळी व संध्याकाळी सदर परीसरात गस्त घालत आहेत.

तर शेतकरी व शेतमजूर शेतात जाण्याच्या व वाटेवर संरक्षण करण्यासाठी व शेतात जाऊन फटाके वाजवून वाघाची दहशत कमी करण्यासाठी अहोरात्र परिश्रम करून वाघाच्या दहशतीतुन शेतकरी शेतमजूर व नागरिकांना भयमुक्त करण्याचा प्रयत्न करीत आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल भगत व वनरक्षक स्वप्नील डोंगरे सह महिला व पुरुष वनकर्मचारी तैनात करण्यात आले आहे असे वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल भगत यांनी सांगितले.

नागरिकांनी, शेतकरी व शेतमजूरानी आक्रमक पवित्रा घेण्यापेक्षा वनकर्मचारी यांना सहकार्य करावे असे वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल भगत यांनी आव्हान केले आहे.

### परीसरात कॅमेरा डॅप लावून वाघाच्या हालचाली वर लक्ष केंद्रित

वाघाने धुमाकूळ घातलेल्या क्षेत्रात वनविभागाच्या वतीने जागोजागी कॅमेरे बसविण्यात येत आहे. त्यामुळे वाघाच्या हालचाली वर लक्ष केंद्रित करून घेण्यासाठी वनकर्मचारी करीत आहे.

### नागरिकांना संरक्षण देणे हेच आमचे ध्येय

वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल भगत यांनी बोलताना सांगितले की वाघाच्या रक्षणासाठी व नागरिकांना संरक्षण करण्यासाठी वनकर्मचारी सदैव कार्यरत आहेत.नागरिकांनी घाबरून जाण्यापेक्षा वनकर्मचारी यांनी दिलेल्या सुचनांचे पालन करणे आवश्यक आहे.



# येरला ग्रा.पं. तर्फे सत्कार सोहळा

वाडी, २३ सप्टेंबर

येरला ग्रामपंचायत तर्फे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या नागरीकांचा सत्कार सोहळा सरपंच अनिल काळमेघ यांच्या अध्यक्षतेखाली रविवार २२ सप्टेंबर रोजी करण्यात आला. नवनियुक्त तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष मोरेश्वर भोयर यांचा सत्कार सरपंच अनिल काळमेघ यांच्या हस्ते, जि.प. शाळेतील आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त दिवाकर गणवीर यांचा सत्कार उपसरपंच राजेंद्र अखंड यांच्या हस्ते तर नागपूर तालुका (ग्रामीण) शेतकी खरेदी विक्री सहकारी संस्थेवर देवकुबाई मिसाळ यांची अविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार लाव्हा पंचायत समिती सर्कलच्या सदस्या प्रीतीताई अखंड यांच्या हस्ते करण्यात आला. सर्व सत्कारमुर्तींचे शाल, श्रीफळ व



पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी ग्रा.पं.सदस्य प्रशांत तभाने, लता कुंभरे, कल्पना हेलोंडे, पूनम दहात ,भगवान मिसाळ, शिवदास चेके, पांडुरंग वाघ, रुईकर शेवाळे, यादवराव टांगले, कमलाकर हेलोंडे, मनोहर काळमेघ, दादाराव बुकाडे, प्रभाकर चौधरी, नागोराव शेवाळे, अरविंद यादव, विजय बोढे, प्रमोद मिसाळ, मोरेश्वर भोयर, इंद्रजीत राऊत, राजू दवंडे, जयंता काळमेघ, सुधीर काळमेघ, बाबुलाल कावळे, अमोल काळे, रजत वानखेडे, प्रशांत काळमेघ, बादल ढोके, निलेश राऊत, अनिल मेश्राम, पंकज वर्मा, हर्षल पेठे, शाम बुकाडे, प्रकाश तभाने, दुर्गेश दिग्रासे, प्रमोद डोंगरे, राहुल बोढे, मंगेश जुनघरे, अमोल जुनघरे, मयूर चेके, अनिकेत शेवाळे, हर्ष कावळे उपस्थित होते.

# एकसष्टी निमित्त सुधीर दिवे यांचा जाहीर सत्कार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:**
कामाचा प्रचंड आवाका, विषयाची जाण, धडाडी वृत्ती आणि प्रशासनाचा अनुभव असलेले सुधीर दिवे हे उत्तम व कुशल संघटक आहेत असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

सुधीर दिवे यांचा सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील अनुभव मला राजकीय जीवनात काम करत असताना कामाला आला आणि त्यातूनच मोठमोठ्या निर्णय प्रक्रियेत मला मदत झाली अशी भावना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली. येथील सॉलिटेअर सभागृहात एकसष्ठी समारंभ निमित्त आयोजित भव्य सत्कार सोहळ्यात हे दोन्ही नेते बोलत होते.

यावेळी मंचावर संत सयाजी महाराज, माजी खासदार रामदास तडस, आमदार प्रतापराव अडसड, आमदार विकास कुंभारे, आमदार दादाराव केचे, आमदार मोहन मते, आमदार प्रवीण दटके, माजी आमदार आशिष देशमुख, अनिल सोले, सुधीर पारवे, विजय जाधव माजी खासदार सुरेश वाघमारे, विश्वास पाठक यांच्यासह अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.



पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, दिवे परिवाराची संघ आणि भारतीय जनता पार्टी बद्दलची निष्ठा मी अनेक वर्षांपासून ओळखतो. मिळालेली प्रत्येक जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडून ती यशस्वी करून दाखवण्यात सुधीर दिवे यांची हातोटी आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या राजकीय प्रवासामध्ये सुधीर दिवे यांचा प्रशासकीय सहभाग अत्यंत मोलाचा आहे असेही फडणवीस यावेळी म्हणाले.

सामाजिक क्षेत्रात संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलच्या माध्यमातून त्यांनी केलेली रुग्णसेवा आणि शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सुरू केलेले विविध उपक्रम निश्चितच समाजाला उपकारक आहेत.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी अतिशय भावनिक विषयांना हात घालत सुधीर दिवे यांनी माझ्या राजकीय आणि सामाजिक जीवनामध्ये मोलाची साथ दिल्याचे उपस्थितांसमोर सांगितले. विशेषतः साखर कारखाने, ऊस उत्पादन, दूध उत्पादन, एम एस एम ई अंतर्गत राबविण्यात आलेले उपक्रम या सर्वांच्या अंमलबजावणीमध्ये सुधीर दिवे यांचा वाटा मोलाचा असल्याचे यावेळी नितीन गडकरी म्हणाले.

आजच्या युगात परिवार एक संघ ठेवून सर्वांना सोबत घेऊन काम करणे अवघड असताना सुधीर दिवे यांनी कौटुंबिक सलोखा राखत संत अच्युत महाराज सेवा संस्थेच्या माध्यमातून मोठे सामाजिक कार्य देखील केले याचे मला अत्यंत कौतुक वाटते. यापुढेही त्यांच्या कार्याला असेच बळ मिळत राहील अशा सदिच्छा ना नितीन गडकरी यांनी यावेळी व्यक्त केल्या.

सत्काराला उत्तर देताना सुधीर दिवे यांनी दिवे कुटुंबीयांची राजकारणाची सुरवात गंगाधरराव फडणवीस, श्रीमती सुमतीताई सुकळीकर व प्रा. योगानंद काळे यांचे मार्गदर्शनाखाली झाली आणि इतकेच नव्हे तर मला शासकीय नौकरी लागल्यावर ती केलीच पाहिजे असा आदेश मा. गंगाधरराव फडणवीस यांनी दिला व ती घटना माझ्या आयुष्याला दिशा देणारी ठरली असे भावनीक कबुली दिली.

नितीन गडकरी हे माझ्यासाठी पितृतुल्य असून त्यांच्या योगदानाशिवाय किंवा त्यांच्या सहकार्याशिवाय मी आजपर्यंत कोणताही उपक्रम यशस्वी करू शकलो नसतो अशी भावनिक उद्गार काढले.

दिवे परिवारासाठी नितीन गडकरी आधारस्तंभ आहेत असेही ते म्हणाले. यापुढे सामाजिक जीवनात ज्या ज्या जबाबदाऱ्या देवेंद फडणवीस व नितीन गडकरी यांच्याकडून मिळतील त्या समर्थपणे पूर्ण करण्यासाठी मी कटिबद्ध राहील व सदैव तत्पर राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

समारंभाचे प्रास्ताविक नगरसेवक श्री दिलीप दिवे यांनी केले तर कौस्तुभ दिवे यांनी सर्वांचे आभार मानले. मंच संचालन नितीन कुलकर्णी यांनी केले.

## युएसएच्या माईन एक्सपोमध्ये वेकोलीचे द्विवेदी यांचा समावेश



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:**
अमेरिकेच्या लासवेगास येथे आयोजित करण्यात आलेल्या माईन एक्सपोमध्ये वेकोलिचे सीएमडी पी. द्विवेदी सहभागी होणार आहेत. या माइन-एक्स्पोमध्ये खाणींमध्ये वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित केले आहे आणि 20 देशांचे प्रतिनिधी यात सहभागी होणार आहेत.

या माइन-एक्स्पोची महत्त्वाची बाब म्हणजे यामध्ये खाण क्षेत्रातील कंपन्या, संशोधन संस्था आणि या क्षेत्रातील पुरवठादार इत्यादींचा समावेश असेल, जेणेकरून या एकाच कार्यक्रमात जगभरातील कोळसा खाणकामात वापरले जाणारे अद्ययावत तंत्रज्ञान आणि संशोधन उपलब्ध होईल आणि माहिती मिळेल.

या माइन-एक्स्पोमध्ये कोल गॅसिफिकेशनच्या विविध पैलूंवर सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. 30 सप्टेंबर 2024 रोजी द्विवेदी भारतातील कोल इंडियाचा परिचय आणि गॅसिफिकेशनचे व्यावसायिकीकरण या विषयावर आयोजित सत्रात वक्ते म्हणून सहभागी होतील. यावेळी पी. द्विवेदी खाण बंद करण्यावर आधारित अभ्यास दौऱ्यातही सहभागी होणार आहेत. हा अभ्यास दौरा अमेरिकेतील ईस्टर्न ॲपलाचिया भागात आयोजित करण्यात आला आहे. द्विवेदी अमेरिकेला रवाना झाले आहेत.

# अशोक चक्रावर झाडूच्या चित्रावरून वाद

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:**
नागपूर महापालिकेच्यावतीने स्वच्छता दौड पार पाडली. दौडच्या प्रसिद्धीकरिता लावण्यात आलेल्या होर्डिंगवर राष्ट्रीय चिन्ह अशोक चक्रावर उभा झाडू दर्शवण्यात आला आहे. यावरून वाद निर्माण झाला असून राज्याचे माजी मंत्री आणि उत्तर नागपूरचे कॉंग्रेस आमदार डॉ. नितीन राऊत यांनी आक्षेप घेतला.




त्यांनी या प्रकरणी सदर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आणि राष्ट्रीय गौरव अपमान निवारण अधिनियम १९७१ च्या कलम २ अन्वये दोषी अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

यावेळी बोलताना राष्ट्रीय चिन्ह अशोक चक्राला महापालिकेने पायदळी तुडवत असल्याचे होर्डिंगवर दाखविले आहे. यावरून देशाचे, राष्ट्रीय झेंड्याचे, राष्ट्रीय चिन्हाचे महत्व कमी करण्याचा हा प्रयत्न भारतीय जनता पार्टी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ समर्थित नागपूर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सूडबुद्धीने केला असल्याचे डॉ. राऊत म्हणाले. भारताच्या राष्ट्रध्वजावर सन्मानाने फडकणाऱ्या अशोक चक्रावरील २४ आऱ्यांवर भारतवासीयांच्या वेगवेगळ्या भावना व अधिकार दर्शवलेले आहेत. याच पवित्र अशोक चक्राच्या चिन्हावर झाडूचे चिन्ह दर्शवून नागपूर महापालिकेला कोणता संदेश पोहोचवायचा आहे? असा देखील प्रश्न डॉ. राऊत यांनी यावेळी उपस्थित केला.

महापालिकेने अशोक चक्राला चुकीच्या स्वरूपात शहरातील लाखो नागरिकांसमोर सादर केले. अशोक चक्राच्या विद्रुपीकरणामुळे देशावर प्रेम करणा?यांच्या आणि एका विशिष्ट समाजाच्या धार्मिक भावना दुखावणारे आणि भडकावणारी चित्र होर्डिंगवर प्रदर्शित करण्यात आली असून लाखो नागरिकांच्या अस्मितेला ठेच पोहचली आहे. यावरून मागील १५ वर्षांपासून महापालिकेची सत्ता भोगणाऱ्या भारतीय जनता पार्टीचे मनुवादी विचारधारेतील मनसुभे पुन्हा एकदा उघड झाले असल्याचे यावेळी डॉ. राऊत म्हणालेत. त्यांनी महापालिकेच्या या कारस्थानाचा तीव्र निषेध केला आहे.

आकाशवाणी चौकात सिग्नलवर डॉ. नितीन राऊत यांची गाडी थांबली असता काही तरुण त्यांच्याकडे आले व त्यांनी एका होर्डिंगवर, महापालिकेने केलेला अशोक चक्राचा अवमान दाखविला.

महापालिकेद्वारे आयोजित स्वच्छता दौडमध्ये मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल, पोलीस उपायुक्त निमित गोयल यांनी सहभाग घेतला परंतु यांनी अशोक चक्राच्या झालेल्या अवमानाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. दरम्यान महापालिकेने हा आरोप फेटाळून लावला आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छता दौड आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी अभियानाच्या माध्यमातून चित्र उपलब्ध करून देण्यात आले होते, तेच चित्र होर्डिंग्जवर दर्शवण्यात आले आहे.

# शहरात चोरी-घरफोडीत प्रचंड वाढ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:**
शहरात चोरी आणि घरफोडीच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. दररोज तीन ते चार ठिकाणी चोरीच्या घटना पुढे येत आहेत. पोलिसांचे कायदा-सुव्यवस्था राखण्याचे सर्व दावे फोल ठरत आहेत. नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे.

**साडेचार लाखांचे ऑटो पार्ट चोरी**

कपिलनगर ठाण्यांतर्गत टेकानाका परिसरात चोरांनी एक गोदाम फोडून 4.50 लाख रुपयांचा माल चोरी केला. या प्रकरणी पोलिसांनी मोहम्मद शाहिद खान (38) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. टेकानाका परिसरात राय उद्योग बिल्डिंगमध्ये शाहिद यांचे ऑटो पार्ट स्क्रॅपचे गोदाम आहे. ते रात्रीला गोदाम बंद करून घरी गेले होते. मध्यरात्रीला अज्ञात चोरांनी गोदामाचे शटर मध्यभागातून उचकवत आत प्रवेश केला. 4.50 लाख रुपये किंमतीचे ऑटो पार्ट चोरी करून पसार झाले.

**डॉलर आणि दागिन्यांवर डल्ला**

दुसरी घटना मानकापूर ठाण्यांतर्गत आशिर्वादनगर परिसरात घडली. पोलिसांनी अक्षय गुलाब बावणे (31) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. शनिवारी अक्षय घराला कुलूप लावून कुटुंबासह सदरच्या अंबाबाई धर्मशाळेत आयोजित सत्संगाच्या कार्यक्रमाला गेले होते. या दरम्यान चोरांनी कुलूप तोडून घरात प्रवेश केला. कपाटातील 200 अमेरिकन डॉलर आणि 1.30 लाख रुपयांच्या दागिन्यांवर डल्ला मारला. अक्षय घरी परतल्यावर ही घटना उघडकीस आली आणि पोलिसांना माहिती देण्यात आली.

तिसरी घटना कळमना पोलिस ठाण्यांतर्गत विजयनगर परिसरात घडली. पोलिसांनी लताबाई लीलाधर ठोसर (60) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. रात्री 9.30 वाजताच्या सुमारास लता घराचे दार टेकवून झोपल्या होत्या. मध्यरात्रीला अज्ञात आरोपीने त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील 35 हजार रोख आणि सोन्याचांदीचे दागिने असा 1.35 लाखाचा माल चोरी करून पसार झाला.

**पुजाऱ्याला डांबून मंदिरात चोरी**

चोरीची एक घटना कळमना ठाण्यांतर्गत सूर्यनगर परिसरातील साई मंदिरात घडली. एका तरुणाने महिलेसोबत मिळून पुजा?याला खोलीत डांबले आणि मंदिरात चोरी केली. पोलिसांनी मंदिर ट्रस्टचे सचिव अनिल विठ्ठल वंजारी (54) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

साई सेवा ट्रस्टकडून मंदिराची देखरेख केली जाते. या मंदिरात प्रिंस पांडे हे पुजारी असून मंदिरामागे असलेल्या खोलीत राहतात. गत 15 सप्टेंबरला सकाळी पांडे मंदिर उघडण्यासाठी उठले असता दार बाहेरून बंद होते. बऱ्याच प्रयत्नानंतर त्यांना दार उघडण्यात यश आले. मंदिराच्या गेटजवळ गेले असता कुलूप तुटलेले होते. मंदिरातील पितळेच्या दोन समई, पंच आरती आणि इतर वस्तू गायब होत्या. पांडे यांनी वंजारी यांना घटनेची माहिती दिली. 20 वर्षे वयोगटातील तरुण आणि 40 वर्षे वयोगटातील महिला चोरी करताना दिसत आहेत. दोघांनी दानपेटी फोडण्याचाही प्रयत्न केला होता. मात्र यश आले नाही. वंजारी काही कामाने शहरातून बाहेर गेले होते. त्यामुळे त्यांनी रविवारी नागपूरला परतल्यानंतर पोलिसात तक्रार दाखल केली.

# आठ महिन्यात नागपुरात ६८३९ गुन्ह्यांची नोंद

## वडेट्टीवारांचा फडणवीसांवर हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २३:**
नागपूर मध्ये वाढणाऱ्या गुन्हेगारीच्या प्रमाणाबाबत विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे.



दिव्याखाली अंधार ही म्हण फडणवीस यांनी खरी करून दाखवली असल्याची टीका त्यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी नागपूर येथील गुन्हेगारीच्या वाढत्या प्रकरणाची आकडेवारी सादर केली.

विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी या संदर्भात एक पोस्ट शेअर केली आहे. नागपूर मध्ये एक जानेवारी ते 31 ऑगस्ट दरम्यान 6839 गुन्ह्यांची नोंद झाली असल्याची माहिती यामध्ये त्यांनी दिली आहे. विशेष म्हणजे यामध्ये विनयभंग आणि बलात्कार यासारख्या महिलांच्या बाबतीतील गुन्ह्याचे सर्वाधिक प्रमाण असल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. तसेच लहान मुलांवरील अत्याचाराचे प्रमाण देखील वाढले असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

राज्यात होणाऱ्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच विरोधी पक्षांच्या वतीने सरकारी पक्षातील नेत्यांवर आरोप केले जात आहेत. यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सर्वाधिक हल्ले करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून या आरोपाकडे पाहिले जात आहे. कॉंग्रेसच्या काळात सुंदर नागपूर सुरक्षित नागपूर ही ओळख आता गुन्हेगारांची चलती असलेले नागपूर अशी झाली असल्याची टीका केली आहे.

या संदर्भात विजय वडेट्टीवार यांनी म्हटले की, गृहमंत्री फडणवीस, आमदार आणि पालकमंत्री असलेल्या नागपुरात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. 1 जानेवारी ते 31 ऑगस्ट पर्यंत नागपुरात 6839 गुन्ह्यांची नोंद झाली आहे. यामध्ये महिलांचे विनयभंग आणि बलात्कार यासारखे महिलांशी संबंधित गुन्हे अधिक आहे. तसेच लहान मुलांवरील अत्याचार प्रकरणाचे एकूण 172 गुन्ह्यांची नोंद झाली आहे. नागपूर शहराची ओळख आज " गुन्हेगारांची चलती असलेलं भयभीत नागपूर" अशी झाली आहे.

# पुढचा मुख्यमंत्री विदर्भातीलच?

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २३:**
मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्यावरून महाविकास आघाडीतून विविध दावे-प्रतिदावे करण्यात येत असताना नागपुरातील कॉंग्रेस नेत्यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हेच पुढील मुख्यमंत्री असतील, असा दावा केला आहे.

नागपूर शहरातील सहाही विधानसभा मतदारसंघांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत बहुतांश नेत्यांनी विधानसभा निवडणुकीत विदर्भातून कॉंग्रेसला सर्वाधिक जागा मिळतील व पटोले हेच मुख्यमंत्री होतील, अशी भूमिका उघडपणे मांडली. कॉंग्रेसची नागपूर विधानसभा आढावा बैठक रजवाडा पॅलेस येथे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि पक्षाचे प्रदेश उपप्रभारी कुणाल चौधरी यांच्या उपस्थितीत पार पडली. लोकसभेत कॉंग्रेसला मोठे यश मिळवून दिले होते. विधानसभेत ते राज्यात करिष्मा करतीलच. मात्र, विदर्भात सर्वात जास्त जागा जिंकून देतील व तेच मुख्यमंत्री असतील, असा विश्वास कॉंग्रेसच्या बहुतांश नेत्यांनी व्यक्त केला.

अतुल लोंढे, अभिजित वंजारी, अनीस अहमद यांनी हा मुद्दा मांडला व नितीन राऊत, सतीश चतुर्वेदी यांनीदेखील याला दुजोरा दिला. दरम्यान, अद्याप महाविकास आघाडीचा जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर झाला नसला, तरी नागपुरातील सहाही जागांवर कॉंग्रेसचेच उमेदवार लढतील, असादेखील नेत्यांचा सूर होता.

नाना पटोलेंनी मेहनत घेतली, विधानसभा अध्यक्षपद सोडून संघटनेचे पद घेतले, दारोदारी फिरले, राज्यात फिरले आणि कॉंग्रेसला चांगले दिवस आले. नाना पटोलेंमुळे हे यश मिळाले असून त्याचे बक्षीस त्यांना द्यायला हवे. नाही मिळाले तर विदर्भवाले हिसकावून घेऊ. जो मेहनत करेल त्याला फळ मिळायला हवे, ती लढाईही आपल्याला लढावी लागेल असे सांगत विकास ठाकरेंनी मुख्यमंत्रिपदावर भाष्य केले.

येणाऱ्या विधानसभेत कॉंग्रेस नागपूरच्या सहाही जागांवर विजय मिळवेल असा विश्वास नाना पटोले यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांनी राज्यातील महायुती सरकारवर टीका केली.




# रामटेक येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितिची भव्य कार रॅली

■ **महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. २३:**
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस)च्या उत्तर नागपूर शाखेच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त नागपूर ते रामटेक कार रॅली चे आयोजन २१ सप्टेंबर करण्यात आले होते. रामटेक शहरात भव्य स्वागत करण्यात आले.

रामटेक शाखेचे उपाध्यक्ष नानाभाऊ उराडे, कार्याध्यक्षा कांचनमाला माकडे व त्यांच्या संपूर्ण टीम ने या कार रॅली चे भव्य स्वागत केले. गांधी चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पर्यंत रॅली काढण्यात आली. नंतर संविधान उद्धेशीकेचे वाचन करण्यात आले. समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रामटेक शाखेच्या कार्याध्यक्षा कांचनमाला माकडे, उपाध्यक्ष नानाभाऊ उराडे, भागवत सहारे, राज्य अनिस सदस्य रामभाऊ डोंगरे, अलका सेलोकर, सुरेखा उराडे, कृपासागर भोवते, दिनेश मून, उमेश फुलबेल, सुरेश धाबर्डे उपस्थित होते.

राज्य अनिस कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी कार रैलीची भूमिका विशद केली. या प्रसंगी बोलताना कांचनमाला म्हणाल्या कि अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी जनजागृती करणे गरजेचे आहे. आजही तळागळातील समाजात अंधश्रद्धा फोफावतांना दिसत आहे. त्यानंतर जोतिबा का संघर्ष या प्रसिद्ध नाटकाचे ६५ वा प्रयोग सादर करण्यात आला. त्यात म. फुलेंच्या भूमिकेत गौतम मघाडे, सावित्री च्या भूमिकेत वर्षा शहारे, पंडितच्या भूमिकेत अजय राहटे व देवानंद बडगे, काशीबाई च्या भूमिकेत चंदा मोटघरे तर हिरम शास्त्री च्या भूमिकेत रुपेश घोनमोरे यांनी काम केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन विभूतीचंद्र गजभिये तर आभार नानाभाऊ उराडे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.